
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित





सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १९२ | पाने १२ | किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



ॐ कारात जी सामाजिक शक्ती दडलेली आहे ती सर्वांच्या अनुभवाची बाब आहे. जात, पंथ, प्रांत, भाषा आदी भेद मिटवून सर्व हिंदूंना एकतेच्या सूत्रात बांधणारा हा ऐक्याचा मंत्र आहे. वैयक्तिक साधनेत सुद्धा याचे महत्त्व आहे. या मंत्राचा उच्चार करत ध्यान करण्याची आपली परंपरा आहे.

**- स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# देशाच्या ५० टक्के भागांत दुष्काळी संकट

- १८० शास्त्रज्ञांचा इशारा
- ऐन हिवाळ्यात उन्हाच्या झळा
- सरासरीपेक्षा ४ अंश सेल्सिअसने वाढणार तापमान
- सरकारला उपाययोजना करण्याचे आवाहन
- मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

**नवी दिल्ली, २० सप्टेंबर**

**देशात उशिरा आलेल्या मान्सूनला एल निनोमुळे अडथळा आला, पर्यायाने कुठे जोरदार तर काही भागांत पावसाने ओढ दिली. देशातील जवळपास ४८ टक्के भागात यावर्षी नद्यांना पूरच आला नाही. अशातच मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला, सध्या राजस्थान, सौराष्ट्रमधून मान्सून परतला असून, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तर भारत आणि इतर राज्यातून त्याचा परतीचा प्रवास सुरू झाल्याचे भारतीय हवामान खात्याने म्हटले आहे. पावसाच्या तुटवड्यामुळे आणि ऑक्टोबर अखेरपासून सुपर एल निनो अधिक सक्रिय होणार असल्याने देशातील ५० टक्के भागांवर दुष्काळी संकट असून, सरासरीपेक्षा ४ अंश सेल्सिअसने तापमानात वाढ होणार असल्याचा इशारा देशातील १८० शास्त्रज्ञांनी दिला आहे.**



या वर्षी नोव्हेंबर महिन्यांपासून उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात होणार असून, सरकारने तातडीने उपाययोजना करण्यावर भर द्यावा, असे आवाहन या शास्त्रज्ञांनी केले आहे. त्यांनी यासंदर्भात केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. आगामी संभाव्य सुपर एल निनोच्या परिणामाला सामोरे जाण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन करताना देशाच्या नैसर्गिक प्रणालींवर आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या समुदायांवर गंभीर परिणाम होण्याचा इशारा दिला आहे. एल निनोमुळे उष्णकटिबंधीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या तापमानात असामान्य वाढ होत आहे. ऑगस्ट महिन्यात प्रशांत प्रदेशातील तापमानात २.६ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढ झाली, तर आगामी काळात ही वाढ ४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे, जी गेल्या हजार वर्षांतील सर्वाधिक असेल. त्यामुळे नोव्हेंबरपासून अनेक भागांमध्ये सामान्यापेक्षा जास्त उष्ण आणि कोरडे हवामान अनुभवाला येईल. याचा थेट परिणाम शेती, जंगले आणि पशुपालनावर होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

> आम्ही उपग्रह छायाचित्रे, जून ते १० सप्टेंबरपर्यंत देशात पडलेला पाऊस आणि प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील पाण्याच्या तापमानात होणाऱ्या वाढीचा अभ्यास करून ५० टक्के भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याच्या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहोत.
>
> **- रॉक्सी मॅथ्यू कोल,**
> हवामान शास्त्रज्ञ, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रॉलॉजी

### शास्त्रज्ञांच्या सूचना काय?

- तीव्र उष्णता आणि कमी पर्जन्यमानामुळे जंगले, वन्यजीव, शेती आणि जलस्त्रोतांवर गंभीर दबाव वाढेल
- तीव्र उष्णतेमुळे माशांच्या अधिवासात बदल होऊन किनारपट्टीवरील समुदायांवर परिणाम
- उपग्रहांच्या माहितीचा वापर करून पर्यावरणीय बदलांवर देखरेख ठेवावी
- दुष्काळी भागांची माहिती घेऊन उपाययोजना करावी
- पर्यावरणीय बदलाची शक्यता लक्षात घेऊन वन्यजीवांच्या रक्षणासाठी पावले उचलावी

## मासे पकडताना पाण्यात बुडून मच्छिमाराचा मृत्यू

**सोलापूर -** मासे पकडण्यासाठी सीना नदीच्या पाण्यात उतरलेल्या एका मच्छिमाराचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे येथे रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता घडली. येडू जयराम भोई (वय-४५, रा.तिऱ्हे, ता.उत्तर सोलापूर) असे त्या मच्छिमाराचे नाव आहे. रविवारी सायंकाळी तो सीना नदीमध्ये मासे पकडण्यासाठी गेले होते. मासे पकडण्याच्या जाळ्यात पाय अडकून पाण्यात बुडाले. भाऊ तुळजाराम भोई यांनी नातेवाईकांच्या साह्याने त्यांना पाण्यातून बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## शोपियाँत दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

**शोपियाँ , २० सप्टेंबर**

दक्षिण काश्मीरमधील शोपियाँ जिल्ह्यातील अवनीरा परिसरातून रविवारी एक आयईडी जप्त करीत सुरक्षा दलांनी. नियमित शोध मोहिमेदरम्यान, अवनीरा शोपियाँमध्ये रस्त्याच्या कडेला एक संशयास्पद वस्तू आढळून आली. ती सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यासाठी पेरलेला एक आयईडी असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर तत्काळ खबरदारीचा उपाय म्हणून परिसर सील करण्यात आला.

लोकांच्या हालचालींवर निर्बंध घालण्यात आले. घटनास्थळी सुरक्षा दलांसह बॉम्ब निकामी पथक (बीडीएस), पोलिस आणि इतर यंत्रणांनी तत्काळ धाव घेत तपास सुरू केला.तपासादरम्यान, बीडीएस पथकाने आयईडी सुरक्षितपणे निकामी केला. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने आयईडी सापडल्याची आणि तो निकामी केल्याची पुष्टी केली असून, पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. सुरक्षा दलाचे जवान गस्त घालत असताना त्यांना हा आयईडी आढळला. त्यांनी बॉम्बनाशक पथकाला याची माहिती दिली. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस बनला विदूषकांचा पक्ष

## पंतप्रधानांच्या आईचा अपमान करणाऱ्या राहुल गांधींवर भाजपाचा घणाघात

**नवी दिल्ली, २० सप्टेंबर**

काँग्रेस पक्ष विनोदी कलाकार आणि विदूषकांचा पक्ष बनला आहे, राहुल आणि काँग्रेस पक्ष नैतिक दिवाळखोरीच्या सर्वांत खालच्या पातळीवर पोहोचले आहेत. मूलभूत मानवी संवेदना, भारतीय संस्कृती आणि परंपरेच्या अभावातून राहुल वारंवार पंतप्रधान मोदींच्या दिवंगत आईचा अपमान करत आहे, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी समाचार घेतला.

मध्यप्रदेशातील इंदूरमध्ये 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अप्रत्यक्षपणे पंतप्रधान मोदी यांच्या दिवंगत आईची खिल्ली उडवली, यावर आक्षप घेत भाजपाने जोरदार हल्ला चढवला आहे. राहुल यांच्या कृतीवर भाष्य करताना रिजिजू म्हणाले, काँग्रेस पक्षाचे नेते राहुल यांची बौद्धिक दिवाळखोरी त्यांच्या वागणुकीतून आणि टिप्पणीतून स्पष्ट होत आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरांचा त्यांना अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी



संवादाचा वापर पंतप्रधान मोदी यांच्या दिवंगत आईची खिल्ली उडवण्यासाठी आणि त्यांचा अपमान करण्यासाठी करणे, ही मूलभूत मानवी संवेदना आणि राजकीय संस्कृतीच्या धक्कादायक अभावाचे द्योतक आहे. काँग्रेस पक्ष जनतेच्या मनातून कायमचा बाहेर झाला आहे.

### अधःपतनाची नीचांकी पातळी : प्रल्हाद जोशी

केंद्रीय शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले, राहुल आणि काँग्रेस पक्ष नैतिक अधःपतनाच्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या कार्यक्रमाचा वापर करून पंतप्रधान मोदींच्या दिवंगत मातेची थट्टा करणे आणि अपमान करणे, हे त्यांची नैतिक पातळी किती खालावली, याची प्रचिती येते.

### कार्यक्रमात काय झाले ?

कार्यक्रमादरम्यान विनोदी कलावंत पुलकित मणी राहुल यांच्यासोबत मंचावर आले. त्यांनी पंतप्रधान मोदींच्या परदेशी नेत्यांशी भेटण्याच्या शैलीची नक्कल केली. यावेळी राहुलही हसताना दिसले. पुलकित यांनी मोदींच्या बोलण्याच्या शैलीची आणि मुलांसोबत नाण्यांशी संबंधित जुन्या व्हिडीओची नक्कल केली. त्यांनी पंतप्रधान मोदींच्या दिवंगत आईशी संबंधित संदर्भाचाही वापर केला. (वृत्तसंस्था)

> जेव्हा एखादा व्यक्तीवर विनाश ओढवतो, तेव्हा त्याची बुद्धी सर्वांत आधी नष्ट होते. विद्यार्थ्यांच्या आडून राजकारण करणाऱ्या राहुल यांच्याकडे संस्काराचा अभाव आहे. त्यातूनच त्यांनी पंतप्रधानांच्या आईची खिल्ली उडवली. आम्ही याविरोधात पोलिसात तक्रार दाखल करणार आहे.
>
> **- स्मृती इराणी**
> माजी केंद्रीय मंत्री

# अनैतिक संबंधातून अविवाहित तरुणाचा खून; नात्यातील दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

अनैतिक संबंधाच्या कारणावरुन झोपेत असलेल्या एका २४ वर्षीय अविवाहित तरुणाचा तीक्ष्णशस्त्राने वार करून खून करण्यात आला. ही घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील आहेरवाडी येथे उघडकीस आली. याप्रकरणी वळसंग पोलिसांनी मृताच्या नात्यातील दोघा जणांना अटक केली आहे.

सचिन अभिमन्यू सासवे (रा.आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.



मयत सचिन सासवे हा अविवाहित असून तो मजुरी आणि शेती करीत होता. शनिवार, दि.१९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री तो शेतातील वस्तीवर झोपला होता. रविवार, दि.२० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह खून केलेल्या अवस्थेत आढळून आला. दरम्यान, वळसंग पोलिस ठाण्याला ही खबर समजताच फौजदार कांबळे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करुन मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

मयत सचिन याचे वडील अभिमन्यू सासवे (रा.आहेरवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन धोंडीबा क्षेत्री (वय-४२), आयुष धोंडीबा क्षेत्री (वय-१९, दोघेही रा. आहेरवाडी, ता.दक्षिण सोलापूर) यांना अटक करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक राहुल डोंगरे हे पुढील तपास करीत आहेत.



स्कॅन करा
10 YEAR WARRANTY
BAJAJ SECURE
• AMC • ROAD SIDE ASSISTANCE
72198 21111
*अटी व शर्ती लागू. नमूद केलेले ESRPs हे SD USD सिंगल सीट व्हेरिएंटसाठी आहेत. स्टंट्स हे तज्ज्ञांनी, व्यावसायिक देखरेखीखाली, नियंत्रित आणि बंदिस्त वातावरणात, सामान्य नागरिक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर राहून केले आहेत. हे स्टंट्स करण्याचा प्रयत्न करू नका आणि नेहमी वाहतूक व सुरक्षा नियमांचे पालन करा.
**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

## महत्वाचे...




## साक्षात्कार मंडळाच्या शिबिरात ३५ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

गणेश चतुर्थीनिमित्त स्वातंत्र्य सैनिक नगर सांस्कृतिक बहुउद्देशीय युवक मित्र मंडळ संचलित साक्षात्कार गणपती मंडळाकडून रक्तदान शिबिर आयोजित केले. त्यात ३५ जण रक्तदान दिले. शिबीर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र दंतकाळे व मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल सातपुते, संस्थेचे सल्लागार लक्ष्मीकांत दंडी व राजकुमार दनुरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी दिनेश तडलगी, राजेश कट्टा, दीपक तडलगी, अभिलाष स्वामी, शेखर बिराजदार उपस्थित होते.



प्रकाश यलगुलवार | जाहिदभाई शेख | अमोल (बापू) शिंदे | विजय राठोड

## यलगुलवार, शेख, शिंदे, राठोड व आपुलकी प्रतिष्ठान यांना शांतता पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

जॉईन फॉर पीसतर्फे दरवर्षी समाजात वेगवेगळे क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी हे माजी आमदार प्रकाश यलगुलवार, पुण्याचे ज्येष्ठ समाजसेवक जाहिद शेख, नगरसेवक अमोल शिंदे, दक्षिण सोलापूर येथील मुळेगाव तांडाचे सरपंच विजय उमाकांत राठोड, सामाजिक संस्था म्हणून आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांना देण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला, सचिव प्रा. जैनुद्दीन पटेल यांनी दिली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा जागतिक शांतता दिनी, म्हणजेच सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ठीक ६.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिराशेजारी येथे महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे माजी चेअरमन तथा विद्यमान सदस्य ॲरड. मिलिंद शिवशंकर थोबडे यांच्या हस्ते हे पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. या पुरस्कारचे स्वरूप सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ असणार आहे.




## श्रमदानातून पर्यावरण अन् निसर्ग संवर्धनाचा संस्कार

**एलबीपीएम महाविद्यालयाचे वृक्षारोपण शिबीर**

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

श्रमदानातून पर्यावरण अन् निसर्ग संवर्धनाचा संस्कार व संदेश देत, हातात कुदळ-फावडे घेऊन विद्यार्थिनींनी उत्साहाने केलेल्या वृक्षारोपणामुळे विद्यापीठ परिसरात हिरवाईच्या पेरणीचा संकल्प कृतीत उतरला. रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परिसरात एकदिवसीय वृक्षारोपण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी विद्यार्थिनींना वृक्षलागवडीचे महत्त्व पटवून सांगितले. शिबिरात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी २८६ रोपांची लागवड केली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिल कांबळे, डॉ. नागोराव भुरके, प्रा. दिपाली सातपुते आणि प्रा. सावित्रा सलगर यांनी प्रयत्न केले.



## शासकीय विश्रामगृहात अभियंता दिन साजरा

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

अभियंता दिनानिमित्त शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे सोलापूर विकास मंचाच्या वतीने अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील अभियंते, तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व सोलापूर विकास मंचाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. अभियांत्रिकी क्षेत्रातील योगदानाचा गौरव करतानाच सोलापूरच्या विकासाच्या विविध प्रश्नांवर यावेळी विचारविनिमय करण्यात आला. यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य मिलिंद भोसले, योगीन गुर्जर, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, प्रा. प्रसन्न नाझरे, सुहास भोसले, गणेश पेनगोंडा, तेजस गुर्जर, भारत पाटील, शुभांगी पाटील, वासुदेव आडकी, बाळासाहेब मोरे, विशाल जोग, अभय दुस्सल, अमोगसिद्द कोरे, निखिल कंदिकटला, वसंत कुमार, केतन शहा उपस्थित होते.

# उद्यम, सोलापूर विद्यापीठ आणि उद्योगवर्धिनी घडविणार उद्योजक

### महिला आणि तरुण उद्योजक घडण्यासाठी सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, उद्यम फाउंडेशन इनक्युबेशन सेंटर आणि उद्योगवर्धिनी यांच्यात विविध क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्य, ज्ञानाची देवाणघेवाण आणि संयुक्त उपक्रम राबविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराचे हस्तांतरण उद्यम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश गुराणी आणि उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांच्यात झाले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य तथा सेवावर्धिनीचे प्रकल्प व्यवस्थापक चन्नवीर बंकुर, उद्यम फाउंडेशनच्या सहाय्यक व्यवस्थापक ऋतुजा गायकवाड तसेच प्रशांत नळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश विद्यापीठातील विद्यार्थी, युवक, महिला तसेच स्थानिक समुदाय यांना उद्योजकता, कौशल्य विकास, रोजगार आणि उपजीविका



विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक व इनक्युबेशन सुविधांचा आणि उद्योगवर्धिनीच्या उद्योजकता विकासातील अनुभवाचा एकत्रित उपयोग करून विविध उपक्रम विकसित करण्यावर या सहकार्यामध्ये भर देण्यात येणार आहे. यामुळे कौशल्य विकास, महिला उद्योजकता, उपजीविका विकास आणि इनक्युबेशनच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक व महिलांसाठी नव्या संधी निर्माण होणार आहेत.

विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये नोकरी शोधणाऱ्यांबरोबरच रोजगार निर्माण करणारे उद्योजक घडविणे, त्यांच्या व्यवसाय कल्पनांना योग्य दिशा देणे आणि त्यांना आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे यासाठी या सहकार्याचा उपयोग होणार आहे. इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नव्या व्यवसाय कल्पनांना मार्गदर्शन, तज्ज्ञांचे सहकार्य, प्रशिक्षण आणि विविध उद्योजकीय संधींशी जोडण्याचे प्रयत्न करता येणार आहेत. तसेच महिला उद्योजकांसाठी विशेष प्रशिक्षण, व्यवसाय विकास, बाजारपेठेशी जोडणी आणि नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात येणार आहे, असे डॉ. राजेश गुराणी यांनी सांगितले.

**या कराराअंतर्गत उपजीविका विकास**

कम्युनिटी एंगेजमेंट अँड आऊटरिच, कौशल्य विकास, महिला उद्योजकता विकास, उद्योजकता विकास व मार्गदर्शन, इंक्युबेशन इकोसिस्टम विकसित करणे, विद्यार्थी व युवकांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण, नवउद्योजकांना मार्गदर्शन, प्रशिक्षण व आवश्यक नेटवर्किंग उपलब्ध करून देणे, महिला व युवकांच्या व्यवसाय संकल्पनांना प्रोत्साहन देणे अशा क्षेत्रांमध्ये संयुक्तपणे काम करण्याचे निश्चित करण्यात आले आहे, असे चौहान यांनी सांगितले.

# तालुका पोलिस स्टेशन बदलणार १० गावांतील शाळेचा लुक

### खाकी वर्दीतील अनोखी संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी व शाळेचे वातावरण सुंदर व्हावं यासाठी मा. अतुल कुलकर्णी पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या संकल्पनेतून व सोलापूर तालुका पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षेत्रातील १० गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा लुक बदलणेसाठी थीम आराखडा करुन कलर डबे देण्यात आले या उपक्रमाचे नागरीकाकडून कौतुक होत आहे.

सोलापूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस निरिक्षक कुंदन गावडे यांनी शाळा मराठी माझी शाळा मराठी अधिक सुंदर दिसण्यासाठी कार्यक्षेत्रातील उत्तर सोलापूर तालुक्यातील भागाईवाडी,वडाळा, मोहितेवाडी, तरटगाव, हगलूर, तेलगाव तर



दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव, संगदरी, गंगेवाडी, उळेवाडी या दहा गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा लुक बदलण्यासाठी रंगसंगतीची थीम करुन आवश्यकतेनुसार कलर डबे देण्यात आले.

खादी वर्दीचा खाक्या न दाखवता जातीय सलोखा आणि बंधुभाव जपण्याबरोबर सायबर गुन्हेगारी, वहातुकीचे नियम,अंमली पदार्थांचे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन जनजागृती करतात, कुटुंबातील वाद मिटवून अनेकांना सुखी संसार फुलवण्याचे, काम माणुसकी जपत पोलिस करतात. आज मराठी शाळा टिकली पाहिजे,या ठिकाणी सर्व सुविधा देण्याचा शासन प्रयत्न करीत आहेच,तर अनेक सेवाभावी संस्था शैक्षणिक मदतीसाठी दातृत्वाचा हात पुढे करीत आहेत मात्र खाकी वर्दीतील माणुसकी शाळेच्या सुंदरतेसाठी व मुलांच्या शैक्षणीक आयुष्यात रंग भरण्यासाठी अनोखी थीम निश्चीत इतरांना प्रेरणा देणारी आहे

**गाव छोटं मात्र सहकार्य सर्वाचे : घोडके-पाटील**

भागाईवाडी गाव छोटं असलं तरीही गावच्या विकासात्मक वाटचालीस सर्वाचे भरभरून सहकार्य मिळाल्याने गावाचा लौकीक वाढल्याची भावना व्यक्त करत गावातील शाळेच्या इमारत सुंदरतेसाठी कलर दिल्याबद्दल पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांचा सत्कार करुन माजी सरपंच कविता घोडके पाटील यांनी आभार मानले यावेळी पोलीस पाटील सजित पाटील,जयसिंह चौधरी उपस्थित होते.


## ELGRIS कडून गणेशोत्सव विशेष; तीन kW सोलर सिस्टिम ९९ हजार ९९९ पासून



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

गणेशोत्सवानिमित्त ELGRIS Solar ने घरगुती ग्राहकांसाठी विशेष सोलर योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत ३ kW Solar System ९९,९९९ पासून उपलब्ध करण्यात आली असून ग्राहकांना ७८,००० सबसिडी मिळाल्यानंतरच सबसिडीची रक्कम भरण्याची सुविधा देण्यात येत आहे. तसेच सबसिडी न मिळाल्यास त्याची जबाबदारी एङ्ऋठखडऱ घेणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

ग्राहकांसाठी 0% Down Payment, 0% Processing Fee आणि १००% Finance यांसारखे फायनान्स पर्यायही उपलब्ध करण्यात आले आहेत. यामुळे सुरुवातीचा आर्थिक भार कमी ठेवून सोलर सिस्टिम बसविणे अधिक सोपे होणार असल्याचे कंपनीने सांगितले.




**सोलापुरात ७२०W NTye TOPCon पॅनलचा पर्याय**

ELGRIS ने ग्राहकांसाठी ७२० W NTye TOPCon Sogar Panel आणि २३.१८% Module Efficiency असलेला आधुनिक तंत्रज्ञानाचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. अधिक क्षमतेच्या मॉड्यूल्समुळे कमी पॅनल्समध्ये आवश्यक सिस्टिम क्षमता साध्य करण्यास मदत होऊ शकते.

**नामांकित ब्रँड्स एकाच छताखाली**

ग्राहकांना त्यांच्या बजेट व पसंतीनुसार Tata Power Solar, Waaree, Luminous, Livguard, Exide AmU Microtek यांसारख्या नामांकित ब्रँड्समधून निवड करता येणार आहे. निवडलेल्या ब्रँड व कॉन्फिगरेशननुसार सोलर सिस्टिमची अंतिम किंमत बदलू शकते.

**१० वर्षांनंतरही दमदार Performance**

डॉ. परळे हॉस्पिटल, सोलापूरचे डॉ. गुरुनाथ परळे यांनी सांगितले, जवळपास १० वर्षांपूर्वी बसविलेली आमची १२ kW ELGR IS Solar System आजही उत्तमपणे कार्यरत असून दररोज सुमारे ५० युनिट्सपर्यंत वीज निर्मिती देते आहे. विशेष म्हणजे, गेल्या १० वर्षांत या Solar System damoUVmhr Maintenance खर्च झालेला नाही. ELG$RIS सोबत आमचा अनुभव अतिशय चांगला आहे. तसेच हॉटेल सूर्या इंटरनॅशनलचे दत्ताजी सुरवसे यांनी मागील १२ वर्षांपासून त्यांच्या वीज बिलात सुमारे ९०% घट झाल्याचा अनुभव सांगत ELGRIS च्या गुणवत्ता, तत्पर सेवा आणि स्थापनेची शिफारस केली आहे.

**५२ वर्षांचा समूहाचा वारसा; १२ वर्षांचा सोलर क्षेत्रातील विश्वास**

N R. Dhoot rou Since १९७५ या व्यावसायिक वारशासोबत ELGR IS Solar गेल्या १२ वर्षांपासून सौरऊर्जा क्षेत्रात कार्यरत असून २,५००+ समाधानी ग्राहकांचा विश्वास मिळाल्याचे कंपनीने सांगितले. दगणेशोत्सवाच्या निमित्ताने अधिकाधिक सोलापूरकरांनी सौरऊर्जेकडे वळावे आणि सोलापूर ते SolarPur ही संकल्पना अधिक व्यापक व्हावी, हा या विशेष योजनेमागील उद्देश असल्याचे ELGRIS ने नमूद केले. अधिक माहितीसाठी : ०२० ७१५३ ००२७ या क्रमाकांवर संपर्क साधावा.



## सम्राट अशोक संकुलच्या विद्यार्थ्यांची वुशू स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिका आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय शहर क्रीडा स्पर्धामध्ये सम्राट अशोक शिक्षण संकुल संचलित यशोधरा ज्युनिअर कॉलेज व यशोधरा प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी वुशू स्पर्धेत यश संपादन करत पदकांची लयलूट केली.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची कठोर मेहनत व जिद्द असून, किशोर चंदनशिवे यांनी घेतलेला नियमित सराव महत्त्वाचा ठरला. या विद्यार्थ्यांना प्राचार्य सुबोध सुतकर, डॉ. पंकज सुतकर आणि क्रीडाशिक्षक सुधीर वाघ व कविता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रमेश सुतकर आणि सचिव विमल सुतकर यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**पदकविजेते विद्यार्थी:**

**सुवर्ण:** चंद्रशेखर गणेश नरळे, तिलकरत्न पिरपक्ष खरात, अश्वजित संतोष बनसोडे आणि महिबूब जंगलीसाहेब शेख.

**रौप्य:** रेहान इरकल, सुरजसिंग गहेरवार, कृष्णा गायकवाड आणि जयशंकर लोखंडे.

**कांस्य:** तेजस जाधव, सुरज बनसोडे, इरफान शेख आणि अरबाज शेख.

## मुलांना मोबाईलपासून परावृत्त करण्यासाठी मोफत बुध्दिबळ प्रशिक्षण वर्ग सुरू

### रामेश्वर चेस क्लबचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवणे, त्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे आणि निर्णयक्षमता वाढवणे या उद्देशाने 'कै. संगप्पा याळगी वाराही सेवार्थ भारत फाउंडेशन' संचलित रामेश्वर चेस बुद्धिबळ क्लबच्या वतीने मोफत बुद्धिबळ प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ करण्यात आला आहे.




सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव महामंडळाचे ट्रस्टी-अध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा प्रशिक्षक गुरु कोनापुरे, माळगे, रामेश्वर याळगी आणि संस्थेचे संस्थापक मल्लिनाथ याळगी उपस्थित होते. उद्घाटनानंतर पोलीस निरीक्षक तथा प्रशिक्षक विनय सरवदे यांनी उपस्थितांना बुद्धिबळाची बेसिक (मूलभूत) माहिती दिली, त्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात झाली. या वर्गासाठी रामेश्वर याळगी, गुरु कोनापुरे आणि माळगे हे तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल हुमनाबादकर, तुषार आणि रेशीमकर यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मल्लिनाथ याळगी यांनी केले. रामेश्वर याळगी यांनी आभार मानले.

# 'मिशन लक्ष्यवेध' मधील खेळाडूंना थेट राज्य शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागाची संधी

### क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर देशासाठी आणि राज्यासाठी अधिकाधिक पदके जिंकावीत, या उद्दिष्टाने महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने सुरू केलेल्या महत्त्वाकांक्षी 'मिशन लक्ष्यवेध' (हाय परफॉर्मन्स सेंटर) या योजनेअंतर्गत एक मोठा व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, आता क्रीडा प्रबोधिनीच्या धर्तीवर या योजनेतील प्रतिभावंत खेळाडूंना थेट राज्य शालेय व इतर क्रीडा स्पर्धा अथवा निवड चाचणीत सहभाग घेण्याची संधी मिळणार असल्याचे संचालनालयाचे सहसंचालक संजय सबनीस यांनी कळिवले आहे

**त्रिस्तरीय प्रशिक्षण यंत्रणेचा लाभ**

महाराष्ट्र राज्यातील प्रतिभावान व उदयोमुख खेळाडूंना ऑलिम्पिक, आशियाई आणि कॉमनवेल्थ गेम्ससारख्या जागतिक स्पर्धांसाठी तयार करण्याच्या उद्देशाने शासनाने त्रिस्तरीय क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा उभी केली आहे. यामध्ये जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र, विभागीय स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर व राज्य हाय परफॉर्मन्स सेंटर या तिन्ही स्तरांवरून निवड झालेले खेळाडू हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केलेले प्रतिभावंत खेळाडू आहेत. त्यांना थेट राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये प्रवेश दिल्याने, इतर खेळाडूंनाही तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर आपली प्राविण्य सिद्ध करण्याची अधिक संधी उपलब्ध होणार आहे.

**राज्य स्पर्धेत दहावा संघ म्हणून सहभाग**

सध्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत राज्यातील ८ महसूल विभाग व क्रीडा प्रबोधिनी असे एकूण ९ संघ/खेळाडू सहभागी होतात. नव्या आदेशानुसार आता 'मिशन लक्ष्यवेध' हा संघ स्वतंत्रपणे किंवा अतिरिक्त संघ १० वा संघ म्हणून सहभागी होण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वैयक्तिक खेळ या प्रकारात निवड झालेले खेळाडू थेट राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होतील. सांघिक खेळात निवड चाचणीद्वारे निवडलेला संघ १० वा संघ म्हणून राज्यस्तरावर खेळेल. जर पूर्ण संघ बनवणे अशक्य असेल, तर नियमानुसार खेळाडूंच्या संख्येइतके खेळाडू थेट निवड चाचणीसाठी पात्र ठरतील.

**या १२ खेळाचे संघ 'मिशन लक्षवेध' या संघातून खेळणार**

'मिशन लक्ष्यवेध ' या योजनेअंतर्गत ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सींग, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, शुटींग, रोईंग, सेलिंग, टेबलटेनिस व लॉन टेनिस या १२ क्रीडा प्रकारांची निवड केली आहे.

यासाठी क्रीडा खात्याने राज्यस्तरावर १२ हाय परफॉर्मन्स सेंटरही उघडली आहेत. १२ क्रीडा प्रकारांच्या विभागीय स्तरावरील ८ स्पोर्टस एक्सलन्स सेंटर व जिल्हा स्तरावरील ३६ क्रीडा प्रतिभा विकास केंद्रे स्थापन केली आहेत. प्रत्येक केंद्रावर वीस खेळाडू निवडून त्यांची विभागीय स्पोर्टस एक्सलन्स सेंटर व नंतर राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटरसाठी निवड करण्यात येणार आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलबजावणी**

या आदेशाची अंमलबजावणी आगामी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहे. तसेच या संघात सहभागी होणाऱ्या खेळाडूंच्या निवास आणि भोजन व्यवस्थेसाठी प्रचलित शासनाच्या निर्णयानुसार योग्य तो निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण असून, क्रीडा क्षेत्राला अधिक बळकटी मिळणार आहे.

# युक्रेनचा मॉस्कोवर भीषण हल्ला

- एकाचवेळी १६०० पेक्षा जास्त ड्रोनचा मारा
- तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग
- पाच नागरिक ठार, २० जखमी



युक्रेनच्या हल्ल्यानंतर मॉस्को शहरात होणारे स्फोट आणि इमारतींना लागलेली आग

### ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे थांबवावे : ट्रम्प



युक्रेन आणि रशिया एकमेकांच्या ऊर्जा पायाभूत सुविधांना सातत्याने लक्ष्य करत असताना, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, दोन्ही देशांनी ऊर्जा प्रकल्प, तेल शुद्धीकरण कारखान्यांना लक्ष्य करणे थांबवायला हवे. तेलाच्या किमती वाढविण्यासाठी केलेली कृती अमान्य असेल. संघर्ष रोखण्यासाठी वाटाघाटी करण्याला प्राधान्य द्यायला हवे. ■

**मॉस्को, २० सप्टेंबर**
युक्रेनने शनिवारी मध्यरात्री रशियाची राजधानी मॉस्को शहरावर एकाचवेळी १६०० पेक्षा जास्त ड्रोनचा मारा केला. यात एका तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. निवासी भागातील काही इमारतींवर ड्रोन आदळल्याने पाच नागरिकांचा मृत्यू झाला, तर २० पेक्षा जास्त जखमी आहे. रशियात संसदीय निवडणुकीच्या अखेरच्या दिवशाची वेळ साधून युक्रेनने आतापर्यंतचा सर्वांत मोठा हल्ला केला. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने ११०० पेक्षा जास्त ड्रोन हवेतच निष्क्रिय केल्याची माहिती दिली.

मॉस्कोचे महापौर सर्गेई सोब्यानिन यांनी सांगितले की, राजधानीच्या दिशेने येणारे ४५० ड्रोन हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच नष्ट केले. काही ड्रोन मॉस्कोमधील एका तेल शुद्धीकरण कारखान्यावर आणि निवासी इमारतीवर आदळले, ज्यामुळे मोठे नुकसान झाले. हल्ल्यामुळे शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली, तर अनेक इमारतींचे नुकसान झाले. ढिगाऱ्यातून पाच नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर २० जखमींना रुग्णालयात हलवण्यात आले. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून, मृतकांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, त्यांच्या सैन्याने क्रिमिया द्वीपकल्प आणि काळ्या समुद्रावरून ड्रोनचा मॉस्कोवर ड्रोनचा वर्षाव केला. रशियन लष्करी तळ, तेल शुद्धीकरण प्रकल्पाला लक्ष्य करत तासभरात १६०० पेक्षा जास्त ड्रोनचा मारा केला. गेल्या आठवड्यात रशियाने युक्रेनची राजधानी कीव्ह शहरावर केलेल्या हल्ल्याचा सूड म्हणून रविवारी ड्रोनचा मारा करण्यात आला.

**निवडणुकांमध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न**

सोब्यानिन यांनी सरकारी वृत्तवाहिनीशी बोलताना सांगितले की, युक्रेनचा हल्ला संसदीय निवडणुकांमध्ये व्यत्यय आणण्याच्या उद्देशाने करण्यात आला. मात्र, हवाई संरक्षण प्रणालीने त्यांचे बहुतांश ड्रोन मॉस्कोच्या सीमेवरच रोखले. निवासी भागांवर हल्ला करणे दहशतवादी कृत्य असून, रशियन सैन्य हल्ल्याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. हा हल्ला रशियाच्या संसदीय निवडणुकांच्या तिसऱ्या आणि अंतिम दिवशी झाला. ही रशियाची युद्धोत्तर काळातील पहिली संसदीय निवडणूक आहे.

**तेल शुद्धीकरण क्षमतेवर परिणाम**

युक्रेनच्या हल्ल्यांमुळे रशियाच्या तेल शुद्धीकरण क्षमतेच्या मोठ्या भागावर परिणाम झाला आहे. यामुळे अनेक प्रदेशांमध्ये पेट्रोलियम उत्पादनांची टंचाई, इंधनाच्या दरात वाढ आणि पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागण्याचे प्रकार वाढले आहेत. युक्रेनने यापूर्वी देखील मॉस्कोमधील तेल प्रकल्पाला अनेक वेळा लक्ष्य केले. रशियाने केलेल्या आक्रमणापासून, युक्रेन लष्करी ड्रोन तंत्रज्ञानामध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. रशियाच्या आतपर्यंत हल्ले करण्यासाठी ते क्षेपणास्त्रांसोबतच देशातच तयार केलेल्या लांब पल्ल्याचे ड्रोन तैनात करत आहे. (वृत्तसंस्था)

# होर्मुझ उघडण्यासाठी सात अटी

**इराणचा अमेरिकेला इशारा, कतार-पाकिस्तानमार्फत दिलेला प्रस्ताव मान्य करा**



**तेहरान, २० सप्टेंबर**
कतार आणि पाकिस्तान या मध्यस्थी देशांमार्फत अमेरिकेला सात अटींचा प्रस्ताव पाठवला आहे. त्यांनी आमच्या अटी-शर्ती मान्य केल्या तरच होर्मुझ जलमार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाईल अन्यथा संघर्षाचा मार्ग मोकळा आहे, अशा इशारा इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव मोहसेन रझाई यांनी अमेरिकेला दिला आहे. इराण चर्चा करण्यास तयार असून ही चर्चा कोणत्या अटींवर होईल, याची पूर्ण कल्पना अमेरिकेला असल्याचेही त्यांनी नमूद केले.



सरकारी दूरचित्रवाणीला दिलेल्या मुलाखतीत रझाई यांनी म्हटले की, संघर्ष संपवण्यासाठी इराणच्या अटी मान्य करणे हेच अमेरिकेच्या फायद्याचे ठरेल. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्यांमुळे कोणताही मार्ग निघणार नाही, इराण कोणत्याही निर्णायक युद्धासाठी पूर्णपणे सज्ज आहे. इराणने

सर्व आघाड्यांवरील युद्ध तत्काळ थांबवणे, गोठवलेली इराणी मालमत्ता मुक्त करणे आणि अमेरिकेने लावलेली सागरी नाकाबंदी उठवणे यासह एकून सात अटी चर्चा सुरू करण्यासाठी ठेवण्याल्या आहे. मध्यस्थी राष्ट्रांमार्फत अमेरिकेला प्रस्ताव पाठवण्यात आला. त्यांनी अटी मान्य केल्यानंतरच होर्मुझ जलमार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाईल. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराण पूर्वीपेक्षा अधिक वेगाने आणि ताकदीने सज्ज झाला आहे. इराणने अनेक क्षेपणास्त्र चाचण्या घेतल्याची कबुली त्यांनी दिली. (वृत्तसंस्था)

### 'लष्करी सामर्थ्याने शत्रूचा पराभव'

इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी म्हटले की, जोपर्यंत सात अटींची पूर्तता होत नाही, तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी उघडली जाणार नाही. फसवणूक आणि एकतर्फी अटी लादण्याचा मार्ग आता बंद झाला आहे. इराणी लोकांच्या कायदेशीर हक्कांना मान्यता मिळत नाही आणि अमेरिका आपली आश्वासने पूर्ण करत नाही, तोपर्यंत आम्ही माघार घेणार नाही. जुन्या अटींवर वाटाघाटी पुन्हा सुरू करण्याचा आमचा विचार नाही. ■

### ट्रम्प यांनी बोलावली तातडीची बैठक

इराणच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी कॅम्प डेव्हिडमधील दौरा अर्धवट सोडून संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांच्यासह संरक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. इराणच्या इशाऱ्यानंतर पश्चिम आशियातील अमेरिकी राजनैतिक दूतावासांभोवती सुरक्षा वाढवण्यात आली. इराक, बहरीन, ओमान, सौदी अरेबिया, इराण, कतार, लेबनॉन, कुवेत आणि जॉर्डनमधील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले, तर दुसरीकडे एक अमेरिकन बॉम्बर विमान ब्रिटिश हवाई तळावरून पश्चिम आशियाकडे रवाना करण्यात आले. ■

### वैष्णो देवी मंदिराच्या हेलिपॅड टर्मिनलला आग

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील कटरा येथील एका टेकडीवर असलेल्या श्री माता वैष्णो देवी मंदिराकडे भाविकांना घेऊन जाणाऱ्या हेलिपॅड टर्मिनलला रविवारी पहाटे आग लागल्याने त्याचे अंशतः नुकसान झाले. पहाटे ३:१५ वाजता आग लागल्याचे लक्षात आले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी अग्निशमन आणि आपत्कालीन सेवांच्या मदतीने आगीवर त्वरित नियंत्रण मिळवले. घटनेच्या वेळी हेलिपॅड टर्मिनल बंद होते. ■

## चित्रपट वार्ता

### 'दशमी' उलगडणार बाप-लेकीचा हळवा बंध



**मुंबई :** बाप-लेकीचे नाते सगळ्यांपेक्षा वेगळे आणि खास असते. लेकीच्या प्रत्येक स्वप्नामागे खंबीरपणे उभा राहणारा बाबा आणि बाबांच्या प्रेमात आपले संपूर्ण विश्व पाहणारी लेक अशाच एका नात्यातला प्रेम, माया आणि भावनांचा सुंदर कोलाज आता 'दशमी' या आगामी मराठी चित्रपटातून रूपेरी पडद्यावर अनुभवायला मिळणार आहे. अभिनेता मकरंद अनासपुरे आणि अभिनेत्री गौरी इंगवले यांच्या अभिनयातून साकारलेले प्रभाकर आणि लक्ष्मीचे नाते 'दशमी' चित्रपटाच्या कथेला भावनिक खोली देणार आहे. बाप-लेकीच्या या हळव्या नात्याची कथा प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्शून जाणारी आहे. केएनके बॉक्स प्रस्तुत 'दशमी' मराठी चित्रपट ऑक्टोबरमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांचे आहे. 'दशमी'मधील प्रभाकर आणि लक्ष्मीचा प्रवास हा केवळ एका वडील-मुलीची कथा नसून, मुलीच्या स्वप्नांसाठी जगणाऱ्या प्रत्येक वडिलांच्या भावविश्वाला स्पर्श करणारी गोष्ट आहे. ■

### 'हनुमान अंश'ची कोटीच्या कोटी उड्डाणे

**मुंबई :** नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित 'हनुमान अंश'या चित्रपटाला प्रेक्षकांचा जोरदार प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाने ४४ व्या दिवशीही बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली आहे. शनिवारी चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ पाहायला मिळाली असून, त्यासोबतच 'हनुमान अंश'ने २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'महावतार नरसिंहा'चा कमाईचा रेकॉर्ड मोडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे हा चित्रपट सर्वाधिक नफा कमावणारा भक्तीपट ठरल्याचे म्हटले जात आहे. 'हनुमान अंश'ने ४४ व्या दिवशी म्हणजेच शनिवारी ७,११९ शोमधून ९.७५ कोटी रुपयांची कमाई केली. यानंतर भारतातील चित्रपटाचे नेट कलेक्शन २५८.१३ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. तर ग्रॉस कलेक्शन ३०४.८० कोटी झाले चित्रपटाची वर्ल्डवाइड कमाई ३२९.३० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ■

### मुन्ना भय्याची 'वेटिंग है' मालिका



**मुंबई :** ओटीटीवर नुकतीच 'वेटिंग है' ही एक नवी वेबसिरीज प्रदर्शित झाली आहे. अवघ्या सात एपिसोडमध्ये या वेबसिरीजची कथा गुंफण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रेक्षक या वेबसिरीजच्या रिलीजची वाट पाहत होते. 'मिर्झापूर'मधील मुन्ना भय्या म्हणजेच अभिनेता दिव्येंदू शर्मा यात महत्त्वाच्या भूमिकेत आहे. सात भागांची ही मालिका स्कॅम थ्रिलर असून, यामध्ये रेल्वेच्या तत्काळ तिकीट बुकिंग प्रक्रियेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याची कहाणी दाखवण्यात आली आहे. ही मालिका ॲमेझॉन प्राईम व्हिडीओवर सुरू झाली आहे. ती मॅक्स प्लेयरवरही पाहता येईल. दिव्येंदु शर्मासोबत भुवन अरोरा, हर्षिता गौर, कुमुद मिश्रा आणि सुनीता राजभर यासारखे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये आहेत. ■

### पोलिस उपनिरीक्षकाचा मारेकरी चकमकीत ठार

**चंदीगड, २० सप्टेंबर**
एका सहायक उपनिरीक्षकाच्या हत्याकांडात सहभागी असलेला आरोपी पोलिस चकमकीत ठार झाला. पोलिसांसोबत ही चकमक शनिवारी रात्री अमृतसरमध्ये झाली.दीपकसिंग, रा. मुलेचक, असे मृतकाचे नाव आहे. गुरुवार आणि शुक्रवारच्या मध्यरात्री भगतनवाला धान्य बाजारात सहाय्यक उपनिरीक्षक हरजितसिंग यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. त्यावेळी मोटारसायकलवर आलेल्या दोन आरोपींपैकी हा एक आहे.

या घटनेनंतर पोलिसांनी आरोपींना ओळखण्यासाठी आणि त्यांचा माग काढण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती, टॉवर-डंप विश्लेषण, स्थानिक गुप्त माहिती आणि मानवी स्रोतांचा वापर केला. शनिवारी रात्री सुमारे ९.४५ वाजता पोलिसांना एका मोटारसायकलवर दोन संशयित दिसले.त्यांना तपासणीसाठी नाक्यावर थांबण्याचा इशारा दिला असता संशयितांपैकी एकाने पोलिस पथकावर गोळीबार केला.त्याने तपास नाका व पोलिसांवर पोलिसांवर चार गोळ्या झाडल्या. त्यामुळे पोलिसांनी आत्मसंरक्षणासाठी प्रत्युत्तर दिले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानची लष्करी कारवाई; आठ दहशतवादी ठार

**खैबर पख्तूनख्वामधील मशिदीवरील हल्ल्याचा सूड, कोहाट भागात २० तास चकमक**



**इस्लामाबाद, २० सप्टेंबर**
पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वामधील कोहाट येथे लष्कर आणि इसिसमध्ये २० तास चाललेल्या चकमकीत आठ दहशतवाद्यांना ठार करण्यात यश आले. ठार झालेल्या दहशतवाद्यांनी शुक्रवारी कोहाट येथील पोलिस वसाहतीतील मशिदीवर आत्मघाती हल्ला केला होता. यात ३१ जणांचा मृत्यू झाला, त्यात १६ पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश होता, तर १०० पेक्षा जास्त जखमी झाले. हल्लेखोरांना ठार करण्यात यश आल्याची माहिती पाकिस्तानी लष्कराने दिली आहे.

कोहाट मशिदीवर हल्ला केल्यानंतर दहशतवादी याच भागात लपून होते आणि सुरक्षा दलाच्या जवानांचे अपहरण करण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर या भागात सैन्याचे विशेष कमांडो मोहीमेसाठी पाठवण्यात आले. सुरक्षा दलांनी अपहरणाचा डाव हाणून पाडत इसिसच्या आठ दहशतवाद्यांना ठार केल्याची माहिती पाकिस्तानी लष्कराने निवेदनातून दिली. खंडणीसाठी अपहरण करणे, पैसे उकळणे आणि वाहने हिसकावून घेणे या उद्देशाने दहशतवाद्यांनी एक बनावट तपासणी नाका उभारला होता. दहशतवाद्यांनी कलातजवळ चमन-कराची एन-२५ महामार्गावर वाहतुकीत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सुरक्षा दल तेथे पोहोचले. यावेळी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत दहशतवादी ठार झाले.

दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणाहून सहा ट्रक, तीन बस आणि दोन कारसह मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारुगोळा आणि स्फोटकेही जप्त करण्यात आली.

**डोंगराळ भागात शोधमोहीम सुरू**

डोंगराळ भागात लपलेल्या उर्वरित दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरक्षा दलाची मोहीम सुरू आहे. बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वासह अनेक भागांमध्ये पाकिस्तानी लष्कर मोहीम राबवत आहे. इसिस, टीटीपी आणि बीएलए आमचे लक्ष्य असून, या कारवाईसाठी वायुदलाची मदत घेतली जात आहे. दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या कोणालाही सोडणार नसल्याचे पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्याने माध्यमाशी बोलताना सांगितले. (वृत्तसंस्था)

### आठ महिन्यांत ९९० दहशतवादी हल्ले

पाकिस्तानमध्ये यावर्षी दहशतवादी घटनांमध्ये वाढ झाली आहे. 'पाकिस्तान इन्स्टिट्यूट फॉर कॉन्फ्लिक्ट अण्ड सिक्युरिटी स्टडीज'ने (पीआयसीएसएस) जारी केलेल्या अहवालात म्हटले की, जानेवारी ते ऑगस्ट २०२६ दरम्यान संपूर्ण पाकिस्तानमध्ये ९९० दहशतवादी हल्ले नोंदवले गेले. यात ११२६ लोकांचा मृत्यू झाला. ऑगस्टमध्ये सर्वाधिक १९९, तर जुलैमध्ये १४४ हल्ले नोंदवले गेले. एका महिन्यात दहशतवादी हल्ल्यात ३८ टक्के वाढ झाली आहे. ऑगस्टमध्ये या हल्ल्यांमध्ये २५८ जणांचा मृत्यू, तर जुलैमध्ये हल्ल्यांशी संबंधित २६८ मृत्यूची नोंद झाली. ■

# वाराणसीत ३० लाखांचे बक्षीस असलेल्या माओवाद्याचा खात्मा

### उत्तरप्रदेश एटीएसची कारवाई

**वाराणसी, २० सप्टेंबर**
उत्तरप्रदेश दहशतवादविरोधी पथक अर्थात् एटीएसने वाराणसीमध्ये कुख्यात माओवादी ब्रिजेश गंजू उर्फ गोपालसिंह याला चकमकीत ठार केले. त्याच्या शिरावर ३० लाख रुपयांचे बक्षीस होते. तो झारखंडमधील प्रतिबंधित तृतीय प्रस्तुती समितीचा (टीपीसी) कमांडर होता. आठ वर्षांपूर्वी एनआयएने त्याला दहशतवादी निधीपुरवठा प्रकरणात हवा असलेला गुन्हेगार म्हणून घोषित केले होते. ही चकमक रविवारी पहाटे ४ वाजता रामनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत झाली.



एटीएसचे पोलिस उपअधीक्षक विपिन राय म्हणाले, ब्रिजेश गंजू रामनगरमार्गे मुघलसराईच्या दिशेने जात असल्याची माहिती आम्हाला मिळाली होती.पथकातील कमांडोंनी त्या भागात सापळा रचून परिसराला वेढा घातला. दरम्यान, तो एका साथीदारासह दुचाकीवरून आला. पथकाने त्याला थांबण्याचा इशारा दिला असता पकडले जाण्याच्या भीतीने त्याने दोन्ही हातांनी पिस्तुलातून गोळीबार सुरू केला. गोळ्या मला आणि हेड कॉन्स्टेबल नितेंद्र कृष्णा यांच्या बुलेटप्रूफ जॅकेटला लागल्या. त्यानंतर पथकाने प्रत्युत्तर म्हणून गोळीबार केला असता ब्रिजेशला गोळी लागून तो रस्त्यावर कोसळला, तर त्याचा साथीदार पळून गेला. (वृत्तसंस्था)

### कंत्राटदारांकडून वसूल करायचा खंडणी

ब्रिजेश गंजू हा झारखंडमधील छत्रा जिल्ह्यातील रहिवासी होता. तो वाहतूकदार, कोळसा खाण कंपन्या आणि कंत्राटदारांकडून खंडणी वसूल करत असे. झारखंड सरकारने त्याच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते तर एनआयएने त्याच्या डोक्यावर पाच लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. आठ वर्षांपूर्वी ब्रिजेशचे घर जप्त करण्यात आले होते. ■

### दोन पिस्तूलसह अनेक जिवंत काडतुसे जप्त

एटीएसने नक्षलवादी ब्रिजेश गंजूकडून दोन पिस्तूलसह अनेक जिवंत आणि रिकामी काडतुसे जप्त केले. नक्षलवादी कमांडर ब्रिजेश गंजू मूळचा छत्रा जिल्ह्यातील लूटू गावचा होता. मात्र, तो बऱ्याच काळापासून वेगवेगळ्या ठिकाणी नावे बदलून राहत होता. तो गोपालसिंग भोक्ता, दुलारचंद गंजू, रंजन, फुलचंद गंजू आणि सरदार या नावांचाही वापर करत होता. ब्रिजेशचे वडील पंचू गंजू बऱ्याच काळापासून नक्षलवादी कारवायांमध्ये सक्रिय होते. एकट्या छत्रामध्येच त्यांच्यावर ३९ गुन्हे दाखल आहेत. ■


# भारताला चिप क्षेत्रात लक्ष्य करण्याचा धोका



- अश्विनी वैष्णव यांचे उद्योगांना सतर्क राहण्याचे आवाहन
- देशाच्या विकासाला रोखण्याचा प्रयत्न होऊ शकते

**नवी दिल्ली, २० सप्टेंबर**
सेमीकंडक्टर क्षेत्रातील भारताच्या सामर्थ्याकडे जागतिक चिप मूल्य साखळीतील प्रस्थापित घटक धोका म्हणून पाहू शकते. देशाच्या विकासात आडकाठी आणण्याच प्रयत्न होण्याची शक्यता असून उद्योगांनी सायबर हल्ला आणि इतर व्यत्ययांपासून सावध राहण्याची गरज असल्याचे आवाहन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केले.

भारत आता चिप्सची रचना आणि उत्पादन करण्याची क्षमता असलेला देश म्हणून उदयास येत असून, या क्षेत्रात आधीपासून कार्यरत असलेले घटक व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करू शकते असा धोका वैष्णव यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीतून वर्तवला. त्यांनी म्हटले की, भारत आता चिप्सची रचना आणि उत्पादन करू शकणारा देश म्हणून उदयास येत असल्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य भूराजकीय धोक्यांवर सतत लक्ष ठेवावे लागेल. अनेक देश भारताकडे एक विश्वासार्ह भागीदार म्हणून पाहतात आणि येथेच त्यांच्या उत्पादनांचा विकास व निर्मिती करतात, त्यामुळे उद्योगांना अधिक सावध राहावे लागेल. देशविरोधी शक्ती अजेंडा राबवून विकासात अडथळा आणण्याचा प्रयत्न करू शकतात. स्पर्धकांच्या धोक्यांची आणि आव्हानांची आपल्याला जाणीव असली पाहिजे. त्यामुळे मी संपूर्ण उद्योगाला स्पष्टपणे सांगितले की, सायबर हल्ल्यांसाठी, इतर कोणत्याही प्रकारच्या धोक्यांसाठी आणि सेमीकंडक्टर मूल्य साखळीत भारताचा उदय होऊ नये असे वाटणाऱ्या देशांकडून निर्माण होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या व्यत्ययांसाठी तयार राहावे.



**सव्वा लाख कोटींची तरतूद**

भारत जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत आपले स्थान बळकट करू पाहत आहे. हे क्षेत्र देशाच्या तंत्रज्ञान आणि उत्पादनविषयक महत्त्वाकांक्षेसाठी अधिकाधिक महत्त्वाचे बनत आहे. सरकारने चिप निर्मिती आणि चाचणीच्या पलीकडे जाऊन डिझाईन, उपकरणे, साहित्य आणि फॅब्रिकेशन यांचा समावेश करण्यासाठी परिसंस्थेचा विस्तार करण्याचाही प्रयत्न केला आहे. (वृत्तसंस्था)

### पुरवठा साखळी तयार करण्याचा उद्देश

भारताचा चिप क्षेत्रातील हा प्रयत्न पॅकेजिंगच्या पलीकडे जाऊन एक व्यापक देशांतर्गत पुरवठा साखळी तयार करण्याचा आणि जागतिक कंपन्यांना भारतात सेमीकंडक्टर तंत्रज्ञानाचे उत्पादन व विकास करण्यासाठी आकर्षित करण्याचा एक धाडसी प्रयत्न आहे. सेमीकंडक्टर योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत सुमारे १ लाख कोटींच्या गुंतवणुकीची लक्ष्य ठेवण्यात आले, असे अश्विन म्हणाले. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# उत्सर्जनाचे विषम वास्तव

भारताने गेल्या काही काळापासून जागतिक मुद्यांवर स्वतंत्र आणि ठाम भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीमध्ये नुकत्याच झालेल्या 'पर्यावरण आणि हवामान गतिशीलतेचे भविष्य' या विषयावरील परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्बन उत्सर्जनावरून बड्या राष्ट्रांना खडे बोल सुनावले. खरे तर, जागतिक हवामान बदल हे आता भविष्यातील संकट राहिलेले नाही. वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर आणि समुद्राच्या पातळीतील वाढीचे परिणाम सगळे जग अनुभवत आहे. नेपाळमध्ये महापुरामुळे नुकताच मोठा हाहाकार उडाला. जगभरात तापमानवाढीमुळे येणाऱ्या अशा संकटाच्या केंद्रस्थानी कार्बन उत्सर्जन हेच प्रमुख कारण आहे. त्यामुळे प्रत्येक देशाने उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. पण, एकविसाव्या शतकातील पहिल्या पंचवीस वर्षांच्या कालखंडाकडे पाहिले, तर जगाचा राखणदार म्हणवणाऱ्या अमेरिकेसह बहुतांश विकसित देश या संदर्भातील आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडत नसल्याचेच दिसून येते. नेमक्या याच विसंगतीकडे लक्ष वेधत पंतप्रधानांनी विकसित देशांच्या डोळ्यात अंजन घातले आहे. हवामान परिषदेत पंतप्रधान म्हणाले की, विकसित देशांचे दरडोई कार्बन उत्सर्जन भारताच्या तुलनेत पाच ते दहा पट अधिक आहे. मात्र, हवामान बदलाच्या दुष्परिणामांसाठी बहुतांश वेळा विकसनशील देशांनाच जबाबदार धरले जाते. हे केवळ अनुचितच नाही, तर अन्यायकारकच आहे.

पंतप्रधानांच्या या विधानाच्या संदर्भात कार्बन उत्सर्जनाबाबतची जगभरातील स्थिती आणि ते कमी करण्यासाठी भारताकडून होत असलेले प्रयत्न यावर एक दृष्टिक्षेप टाकावा लागेल. जागतिक हवामान बदलावरील उपाययोजनांचे संदर्भात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पॅरिस परिषदेने निश्चित केलेल्या बांधिलकीची पूर्तता करणारा भारत हा 'जी-२०' समूहातील एकमेव देश आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी केलेली स्पष्टोक्ती विकसित देशांच्या दांभिकपणावर प्रहार करणारी आहेच. शिवाय, भारताने गेल्या दहा-बारा वर्षांत कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, तसेच पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने केलेल्या सर्वंकष उपाययोजनांचे महत्त्वही अधोरेखित करणारे आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनाचा विचार करता, अमेरिका आणि चीननंतर भारताचा क्रमांक येतो. मात्र, या चित्राची दुसरी बाजू अधिक महत्त्वाची आहे. २०२४ मध्ये भारताचे दरडोई कार्बन उत्सर्जन सुमारे ०.६ टन होते. त्याचवेळी अमेरिकेचे ३.९, तर चीनचे २.४ टन इतके होते. म्हणजे भारताचे एकूण उत्सर्जन अधिक असले, तरी दरडोई उत्सर्जन विकसित देशांच्या तुलनेत लक्षणीय कमी आहे. यामागे भारताची लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ही दोन प्रमुख कारणे आहेत. परिणामी भारताला आजही वीज, उद्योग, वाहतूक, घरे आणि पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जेची आवश्यकता आहे. त्यामुळे 'कार्बन उत्सर्जन तातडीने शून्यावर आणा' अशी सक्ती भारताच्या आर्थिक विकासावर परिणाम करू शकते. तथापि, भारताने हवामान बदलाचे आणि कार्बन उत्सर्जन घटवण्याचे आव्हान नाकारलेले नाही. उलट, गेल्या दशकात अक्षय ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार, सौरऊर्जा, पवनऊर्जा, ऊर्जा कार्यक्षमता, एलईडी बल्ब आणि इलेक्ट्रिक वाहने वापराला प्रोत्साहन, जैवइंधनाचा उपयोग, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर आणि आंतरराष्ट्रीय सौरऊर्जा सहकार्य अशा अनेक माध्यमांतून भारताने या आव्हानावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. अक्षय ऊर्जेचा विस्तार आणि कोळशापासून होणारी वीज निर्मिती घटल्यामुळे २०२५ मध्ये भारताच्या वीज क्षेत्रातील कार्बन उत्सर्जनात ३.३ टक्के घट झाली. मात्र, हे करताना भारताने आंतरराष्ट्रीय मंचावरून आपली बांधिलकीही सुस्पष्टपणे मांडली. २०२१ च्या ग्लासगो परिषदेत भारताने 'पंचामृत'ची संकल्पना मांडली. २०७० पर्यंत नेट-झीरो अर्थात कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे लक्ष्य जाहीर केले. शिवाय, ५०० गिगावॉट जीवाश्मेतर ऊर्जा क्षमता आणि उत्सर्जन तीव्रता कमी करण्याचे उद्दिष्टही निश्चित केले. आता भारताने २०३१ ते ३५ या कालावधीसाठी नवे ध्येय समोर ठेवले आहे. त्यानुसार, २०३५ पर्यंत उत्सर्जनाची तीव्रता ४७ टक्क्यांनी कमी करणे, वीजनिर्मिती क्षमतेपैकी ६० टक्के क्षमता जीवाश्मेतर स्त्रोतांमधून निर्माण करणे आणि वनक्षेत्र तसेच वनाच्छादनातून ३.५ ते ४ अब्ज टन कार्बन डाय ऑक्साईड समतुल्य कार्बन सिंक निर्माण करणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

हवामान बदलासंदर्भातील भारताची ही भूमिका केवळ 'आम्हीही उत्सर्जन कमी करू' एवढीच मर्यादित नाही. भारत सातत्याने हवामानविषयक समान न्याय, स्वतंत्र दायित्व आणि अन्य देशांवर ऐतिहासिक म्हणजेच वारशाने आलेली उत्सर्जनाची जबाबदारी या मुद्यांवर भर देत आला आहे. दुसरीकडे, नेमक्या याच मुद्यांवर अमेरिकेसारख्या विकसित देशांच्या वर्तन-व्यवहारात मात्र कमालीची विसंगती आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या काळात अमेरिकेने पॅरिस करारातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरू केली आणि ४ नोव्हेंबर २०२० ला ती अमलात आली. पुढे जो बायडेन सत्तेवर आल्यानंतर अमेरिकेने २०२१ मध्ये परत एकदा या करारात प्रवेश केला. बायडेन यांच्यानंतर ट्रम्प पुन्हा सत्तेत आले आणि गेल्या वर्षी अमेरिकेने दुसऱ्यांदा या करारातून माघारीची प्रक्रिया सुरू केली. अमेरिकेचे आर्थिक हित, ऊर्जा सुरक्षा आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व अशी कारणे देत अखेर यंदाच्या २७ जानेवारीला अमेरिका पॅरिस करारातून बाहेर पडली. म्हणजे एका अर्थाने, कार्बन उत्सर्जन घटवण्याच्या जागतिक प्रयत्नांकडे अमेरिका तसेच काही युरोपियन देशांनी पाठ फिरवली. मात्र, त्याचवेळी आपल्या देशापुरती आणि स्वतःच्या सोयीची भूमिका घेतली. त्यामुळे २००५ ते २०२२ दरम्यान अमेरिकेचे हरितगृह वायू उत्सर्जन १७ टक्क्यांनी कमी झाले. युरोपियन युनियननेही वीज क्षेत्रातील उत्सर्जन बरेच कमी केले. पण, याला दुसरी बाजूही आहे. २०२५ मध्ये जगभरात पुन्हा वीज निर्मितीशी संबंधित कार्बन उत्सर्जनाचा उच्चांक झाला. विकसित देशांचे कार्बन उत्सर्जन ०.५ टक्क्यांनी, तर विकसनशील देशांकडून होणारे उत्सर्जन तुलनेने कमी म्हणजे ०.३ टक्क्यांनी वाढले. अनेक प्रयत्नांनंतरही जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व पूर्णपणे संपलेले नाही. या स्थितीमध्ये विकसित देशांच्या भूमिकेविषयी प्रश्न उपस्थित होतो. औद्योगिक क्रांतीपासून आजपर्यंतच्या आर्थिक विकासाचा मोठा भाग कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायूवर आधारित होता. त्या काळातील प्रचंड उत्सर्जनामुळे आज वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढले आहे. हे ऐतिहासिक वास्तव नाकारून वर्तमानात विकासाच्या वाटेवर निघालेल्या भारतासारख्या देशांना मात्र उत्सर्जन कमी करण्याचा उफराटा सल्ला दिला जातो. वातावरणाच्या सुरक्षिततेची किंमत विकसनशील देशांनीच का मोजावी, ही भारताची भूमिका आहे. प्रश्न केवळ 'कोण किती कार्बन उत्सर्जन करतो?' असा नाही. प्रश्न आहे, कोणी किती काळ कार्बन उत्सर्जन केले? त्यातून कोणाचा विकास झाला? आज त्याची किंमत कोण मोजतो आहे? आणि यातून उद्‌भवणाऱ्या संकटाच्या निवारणासाठी पैसा तसेच तंत्रज्ञान कोण उपलब्ध करून देणार? भारताला कार्बन उत्सर्जनाबाबत सूट मिळावी, असा या प्रश्नांचा अर्थ नाही. भारतासह प्रत्येक देशानेच आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. पण, या जबाबदारीचे वाटप ऐतिहासिक योगदान, दरडोई उत्सर्जन, आर्थिक क्षमता आणि विकासाच्या गरजा यांचा विचार करून व्हायला हवे. वातावरणातील विषारी वायूंचे उत्सर्जन रोखायचे असेल, तर त्यासाठीच्या दायित्वातील विषमताही संपली पाहिजे. ■

---

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# महाशक्तींनी खंजीर उपसला!

**पीठ पिछे वार करना तो उनकी फितरत थी!**
**हम ही नासमझ थे जो उन्हें गले लगाते रहे!!**

१६ सप्टेंबर २०२६ या एकाच दिवशी वॉशिंग्टन व इस्लामाबाद या दोन राजधान्यांमध्ये घडलेला घटनाक्रम पाहिल्यावर हा उर्दू शेर म्हणावासा वाटतो. नवी दिल्लीत झालेल्या ब्रिक्स घोषणापत्राची शाई वाळण्यापूर्वीच अमेरिका व चीन दोन्ही देशांनी भारताच्या विरोधात खंजीर उपसला.

ब्रिक्स संमेलनाच्या यशानंतर अमेरिका, भारताच्या विरोधात काही निर्णय घेईल हे तर अपेक्षित होतेच, पण चीन? ब्रिक्स संमेलनात सहभागी होऊन मायदेशी परतताच चिनी राष्ट्रपती शी जिन पिंग यांनी भारताच्या विरोधात भूमिका घेण्यास आपल्या परराष्ट्र मंत्रालयाला परवानगी दिली.

**गद्दारीचा इतिहास :** देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व चिनी पंतप्रधान चौ एन लाय यांनी 'हिंदी-चिनी भाई भाई' ही प्रसिद्ध घोषणा दिल्यानंतर, चीनने भारतावर आक्रमण करून गद्दारी केली. अटलबिहारी वाजपेयींनी लाहोर बस यात्रा केल्यावर पाकिस्तानने याचे उत्तर कारगिल घुसखोरीने दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला भेट दिल्यावर, पाकिस्तानने पठाणकोट केले. मोदी सरकारने चीन, पाकिस्तान दोन्ही देशांशी संबंध सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न केल्यानंतर दोन्ही देशांनी याचे उत्तर गद्दारीने दिले आहे.

**अपेक्षित अमेरिका :** रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्के टेरिफ म्हणजे आयात शुल्क लावण्याची तरतूद असणारे विधेयक अमेरिकन काँग्रेसच्या विचाराधीन होते. ब्रिक्सनंतर हे विधेयक 'फास्ट ट्रॅक'वर टाकण्यात आले. म्हणजे त्यावर मतदान तातडीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आणि १६ सप्टेंबर रोजी २६२ विरुद्ध १५९ अशा बहुमताने ते पारित करण्यात आले. अमेरिकन सिनेटमध्ये हे विधेयक यापूर्वीच ८६ विरुद्ध ११ अशा बहुमताने पारित करण्यात आले आहे. मतदानाचे हे आकडे पाहता रिपब्लिकन व डेमोक्रॅट्स दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी विधेयकाला पाठिंबा दिला असल्याचे दिसते. रशिया अ‍ॅण्ड इराण अ‍ॅक्ट २०२६ या नावाने ओळखला जाणारा हा कायदा लिंडसे ग्रॅहम यांच्या नावाने ओळखला जाणार आहे. कारण या विधेयकाचा प्रस्ताव ग्रॅहम यांनी सर्वप्रथम मांडला होता. मधल्या काळात ग्रॅहम यांचे अचानक निधन झाल्याने या कायद्याला त्यांचे नाव देण्यात आले. राष्ट्रपती ट्रम्प यांनी सही केल्यानंतर लगेच तो अंमलात येईल.

**१०० टक्के शुल्क :** रशियाकडून कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांवर १०० टक्के आयात शुल्क लावण्याची तरतूद विधेयकात करण्यात आली आहे. याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर किती व कसा परिणाम होईल हे येणाऱ्या काळात दिसणार आहे. याशिवाय राष्ट्रपती पुटिन, क्रेमलिनमधील त्यांचे अधिकारी व रशियन बँका यांची खाती गोठविण्याची तरतूद यात करण्यात आली आहे. रशिया काही पळवाटांनी आपले कच्चे तेल विकत होता. त्या पळवाटाही बंद करण्याची तरतूद या ६१ पृष्ठांच्या कायद्यात करण्यात आली आहे.

**ब्रिक्सची प्रतिक्रिया :** ब्रिक्स संमेलनात अमेरिकेचा उल्लेख करण्यात आला नसला तरी या संमेलनाचा सूर अमेरिकेच्या विरोधात आहे हे अमेरिकेच्या लक्षात आले होते आणि त्याची प्रतिक्रिया लवकर उमटेल हे भारतालाही अपेक्षित होते. राष्ट्रपती ट्रम्प यांनी अपेक्षित असाच निर्णय घेतला आहे. ब्रिक्स देश डॉलरच्या वर्चस्वाला धक्का लावण्याचा प्रयत्न करीत आहेत असेही ट्रम्प यांना वाटत होते. भारताने याचा इन्कार केला असला तरी त्याचा फार उपयोग झाला नाही.

**आणि चीन :** ब्रिक्सच्या निमित्ताने भारत-चीन संबंधाचा नवा अध्याय सुरू झाला असल्याचे मानले जात होते. गल्वानच्या रक्तरंजित संघर्षानंतर भारत-चीन संबंध कमालीचे तणावाचे झाले होते. तो तणाव बराचसा निवळला होता. भारताने यासाठी अथक परिश्रम घेतले होते. तरी ऑपरेशन सिंदूरमध्ये चीनने पाकिस्तानला मदत करीत भारताला अस्वस्थ केले होते. यानंतरही भारताने आपला संयम कायम ठेवीत चीनसोबत आपले संबंध सुधारण्याची प्रक्रिया व प्रयत्न कायम ठेवले होते. चिनी राष्ट्रपती ब्रिक्स संमेलनासाठी भारतात आल्याने भारतही सुखावला होता. पण, १६ सप्टेंबर रोजी चीनने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये जे काही केले ते धक्कादायक होते.

**नवी कुरापत :** चीन-पाकिस्तान यांनी संयुक्तपणे स्थापन केलेल्या सीमा आयोगाची पहिली बैठक १६ सप्टेंबर रोजी इस्लामाबादमध्ये पार पडली. चिनी परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी लि या व पाकिस्तानचे अधिकारी बिलाल मोहम्मद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पहिल्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यातील सर्व निर्णय सरळसरळ भारताच्या विरोधात आहेत.

**शाक्सगम खोरे :** १९६३ मध्ये पाकिस्तानने आपल्या ताब्यातील काश्मीरचा काही भाग चीनला भेट म्हणून दिल्यानंतर पाकिस्तान-चीन सीमा अस्तित्वात आली. हा भाग शाक्सगम खोरे म्हणून ओळखला जातो. पूर्व काराकोरम पर्वतरांगांना लागून असलेले हे खोरे अविभाजित जम्मू-काश्मीरचा भाग होते. मात्र, १९४७ च्या विभाजनानंतर एक तृतीयांश काश्मीर पाकिस्तानात गेले, जो आज व्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो. लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा व मोक्याचा असलेला हा भाग पाकिस्तानने १९६३ मध्ये एका करारानुसार चीनला 'भेट' दिला. शाक्सगम खोऱ्याच्या एका बाजूला चीनचा शीन जियांग उग्वार हा प्रदेश आहे तर दुसरीकडे व्याक्त काश्मीरचा दक्षिण-पश्चिम भाग आहे. यातून चीन-पाकिस्तान यांच्यात अनधिकृत सीमा तयार झाली आहे.

**सियाचीन ग्लेशियर :** शाक्सगम खोरे सियाचीन ग्लेशियरला लागून आहे. सियाचीन ग्लेशियरमध्ये मानवी वसाहत करणे शक्य नसले तरी हा भाग भारताच्या सुरक्षेसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने 'ऑपरेशन मेघदूत' करीत सियाचीन ग्लेशियरवर आपला निर्विवाद ताबा स्थापित केला. सियाचीन ग्लेशियरवरवर आपला ताबा कायम ठेवण्यासाठी भारताला दररोज ५ ते ६ कोटी रुपये खर्च येतो आणि ४२ वर्षांपासून भारत हे करीत आहे. म्हणजे भारताने सियाचीन ग्लेशियरच्या सुरक्षेसाठी आजवर जवळपास १ लाख कोटी रुपये एवढा खर्च केला आहे आणि या ग्लेशियरवरच चीन-पाकिस्तान दोघांचीही नजर आहे.

**सीमा व्यवस्थापन :** चीन-पाकिस्तान यांच्यात १९६३ साली अस्तित्वात आलेल्या अनधिकृत, अवैध सीमेचा सर्व्हे, संयुक्त व्यवस्थापन, व्यापाराचे मार्ग यावर विचार करण्यासाठी चीन-पाकिस्तान यांनी एक सीमा आयोग नेमला आणि त्याचे कामकाज १६ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आले. भारताच्या परराष्ट्र प्रवक्त्याने याबाबत फार कडक भूमिका घेतली आहे. भारताची भूमिका अतिशय योग्य आहे, पण चीनच्या भूमिकेचे काय? चीनने पुन्हा एकदा भारताच्या पाठीत खंजीर खुपसला आहे असेच म्हणावे लागेल. याने दोन्ही देशांतील संबंधात तणाव वाढणार नसला तरी त्यात कडवटपणा मात्र येणार आहे आणि विशेष म्हणजे हे सारे ब्रिक्स संमेलनानंतर लगेच करण्यात आले.

**महाशक्ती विरोधात :** चीन-पाकिस्तान यांच्या या निर्णयाने भारताला नजीकच्या काळात काही धोका नसला तरी चीनने पुन्हा एकदा भारतविरोधी व पाकिस्तानला अनुकूल असा संदेश दिला आहे. जगातील दोन महाशक्ती, अमेरिका आणि चीन यांनी एकाच दिवशी भारतविरोधी निर्णय घेत भारताच्या विरोधात खंजीर उपसला आहे हे निश्चित. ■

---

## वेध

**नीलेश जोशी**

# हिंदू सण, उत्सव आणि पर्यावरण

**द्यौः शान्तिरन्तरिक्षं शान्तिः। पृथिवी शान्तिरापः शान्तिः।**
**ओषधयः शान्तिः। वनस्पतयः शान्तिः।।**

हा शुक्ल यजुर्वेद, वाजसनेयी संहिता ३६.१७ मधील शांतिमंत्र आहे. यात आकाश, अंतरिक्ष, पृथ्वी, जल, औषधी आणि वनस्पतींसाठी शांतीची प्रार्थना केली आहे. या प्रार्थनेत मानवाचे कल्याण निसर्गापासून वेगळे मानलेले नाही. पृथ्वी, जल, औषधी आणि वनस्पती यांचे संतुलन व कल्याण हेच व्यापक शांततेसाठी आवश्यक आहेत. आजच्या परिभाषेत सांगायचे तर हा मंत्र संतुलित सहजीवनाची भावना व्यक्त करतो. सद्यस्थितीत ज्यावेळी जलसंधारण, वृक्षसंवर्धन, जैवविविधता आणि प्रदूषण नियंत्रण या विषयांची चर्चा होते त्यावेळी हजारो वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांचा अभ्यास, दूरदृष्टी किती व्यापक होती याची जाणीव वरील मंत्राचे स्मरण झाल्यावर होते.

पृथ्वीला, नद्यांना माता, वृक्षांना देवतास्वरूप आणि पंचमहाभूतांना जीवनाचे आधार मानणारी आपली संस्कृती माणसाला सृष्टीचा स्वामी नव्हे, तर तिचा घटक मानते. हिंदू जीवन पद्धतीतील हीच सर्वसमावेशकता तिचे वैशिष्ट्य आहे. भारतीय चिंतनात प्राचीन काळापासून निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. यात सकाळी भूमीला स्पर्श करण्यापूर्वी तिची क्षमा मागण्याची भावना असो किंवा नदीस्नानापूर्वी नदीला वंदन करण्याचा प्रघात, यात निसर्गाबद्दल आदराची भावना आहे. खरं म्हणजे 'माझे जीवन निसर्गामुळे आहे' ही जाणीव निर्माण करणे, हेच पर्यावरणसंवर्धनाचे पहिले पाऊल. भारतीय संस्कृतीत वड, पिंपळ, औदुंबर, तुळस, निंब यासह अनेक वृक्ष, वनस्पतींना असलेले विशेष महत्त्व आजही आपण जपतो आहोत. यातील तुळशीवृंदावन हे तर भारतीय घराचे सांस्कृतिक प्रतीकच म्हणावे लागेल. धार्मिक आस्था आणि पर्यावरणीय उपयोगिता यांची सांगड घालणाऱ्या बाबी हजारो वर्षांपासून आमच्या सामाजिक जीवनात सहज रुजल्या आहेत. नद्यांविषयीची भारतीय भावना तर याहूनही व्यापक आहे. गंगा, यमुना, गोदावरी, नर्मदा, कावेरी, कृष्णा यासह त्या-त्या गाव खेड्यातील नदीला माता मानले जाते. जी कृतज्ञता नदीबाबत तीच पशुपक्ष्यांसंदर्भातही दिसून येते. नागपंचमी, गोवर्धनपूजा, वसुबारस, पोळ्यासारखे सण आणि गणेशाचे वाहन मूषक, कार्तिकेयाचे वाहन मोर, विष्णूचे गरुड, शिवाचे नंदी, दुर्गेचे वाहन सिंह अशा प्रतीकात्मक नात्यांमुळे भारतीय परंपरेत प्राणिजगताला मिळालेली सांस्कृतिक प्रतिष्ठा माणूस आणि इतर जीवसृष्टी यांच्यातील संबंध अधोरेखित करतात.

उत्सव म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे; ते समाजाला एकत्र आणणारे, सामूहिक भावना जागवणारे आणि सामाजिक संदेश पोहोचवणारे माध्यम आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीला मिळालेले बळ हे गत शतकातील ठळक उदाहरण म्हणावे लागेल. कालौघात सार्वजनिक गणेशोत्सवासह, दहीहंडी, नवरात्र आदी उत्सव काही ठिकाणी काही प्रमाणात दिशाहीन झाल्याचे दिसून येते. त्याचे समर्थन निश्चितच कोणीही करणार नाही. पण त्या आड हिंदू समाजातील सण, उत्सव, परंपरा यावर अनावश्यक चर्चा घडवून हिंदू समाजाला लक्ष्य करणारी कृती कशी सहन करता येईल? एखाद्या प्रथा, परंपरेची वैज्ञानिकता तपासणे चुकीचे नक्कीच नाही. समाजजीवन अधिक सुसंस्कृत, पर्यावरणपूरक आणि विवेकी व्हावे म्हणून सण, उत्सवात शिरलेल्या दोषांविरुद्ध आवाज उठविणे देखील मान्यच आहे. मात्र विरोध करणाऱ्या, आवाज उठविणाऱ्यांचा उद्देश दोषांना दूर करण्याचा आहे की, दोषांच्या आड सनातन संस्कृतीला विरोध करण्याचा याची खातरजमा करणे आवश्यक ठरते. कारण आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षांपूर्वीपासून रुजविलेली ही जीवनमूल्ये आपली वैशिष्ट्ये आहेत. जलसंधारण, वृक्षसंवर्धन, जैवविविधता, प्रदूषण नियंत्रण या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा होत असताना भारतीय संस्कृतीने मात्र हजारो वर्षांपूर्वी या सर्वांचा व्यापक विचार केला. स्वातंत्र्यानंतरच्या काळात दुर्दैवाने दिशाहीन झालेल्या अनेकांच्या डोक्यातील उन्माद सण, उत्सवात दिसून येत असेल तर तो दोष त्या व्यक्ती, समूहाचा म्हणावा लागेल. यात धर्म, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा यांचा यत्किंचितही दोष नाही. अर्थात जे दिशाहीन आहेत त्यांनाही योग्य दिशा देण्याचे काम समाजधुरिणांनी करणे आवश्यक आहे. पण काही उन्माद करणाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन हिंदू संस्कृती, सण, उत्सवांना ठरवून लक्ष्य केले जात आहे, हे सामान्यजनांनी समजून घ्यावे. ■

९४२२८६२४८४

---

## कानोसा

**डॉ. अमोल पुसदकर**

# विकसित भारतासाठी योगदान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ यावर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्वप्रथम स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी म्हणजे २०४७ मध्ये विकसित भारत कसा असेल याचे स्वप्न मांडले. २०४७ हे वर्ष भारताच्या स्वातंत्र्याचे शंभरावे वर्ष आहे. १०० वर्षांचा कालावधी एखाद्या देशाला मिळणे, एखाद्या समाजाला विकसित होण्यासाठी मिळणे, ही एक खूप मोठी गोष्ट आहे. प्रत्येक समाजासमोर आणि राष्ट्रासमोर वेगवेगळ्या पद्धतीची आव्हाने नेहमीच असतात. परंतु, त्या आव्हानांवर लक्ष ठेवून त्यावर विजय मिळवण्यासाठी वेगवेगळे उपाय योजत जो समाज पुढे जातो, तो समाज विश्वगुरू पदाला लायक असतो.

भारतीय समाजाचे सुद्धा मूल्यांकन २०४७ च्या दृष्टिकोनातून होणारच आहे. परंतु, त्यासाठी आतापासून जर एक विचार केला गेला की, भविष्यात भारत हा विकसित भारत, विश्वगुरू भारत म्हणून कसा समोर येईल, तर ते देशाच्या, समाजाच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल. आज आपण बघतो आहे की, समाजासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. परंतु, त्याचबरोबर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काही संधी सुद्धा आपल्याकडे येत असतात. उदाहरणार्थ, कोरोना ज्यावेळेला संपूर्ण जगामध्ये पसरला, त्यावेळेला चीनमधील त्याचा उद्‌गम हा जगाला चांगला वाटला नाही. चीनमधील कार्यव्यवस्था आणि त्याच्या जागतिक कुरापती यामुळे अनेक कंपन्यांना असे वाटू लागले की, आपण एखाद्या सुरक्षित भूमीचा शोध आपला उद्योग स्थापन करण्यासाठी केला पाहिजे आणि यालाच अनुसरून जगातील मोठमोठ्या कंपन्यांनी चीनच्या बाहेर व्हिएतनाम, भारत आणि इतरही काही देशांचा विचार सुरू केला. साहजिकच भारताला अनेक कंपन्या प्राधान्य देऊ शकतात, कारण भारत हा फार मोठी भूमी, जलसंपदा आणि मनुष्यबळाचा देश आहे. परंतु, आज नाही उद्या एकदम जर जगातील मोठमोठ्या कंपन्यांनी भारतात आपले उद्योग स्थापित करण्याचे ठरवले, तर ते स्थापित करणे त्यांच्यासाठी फारसे मोठे काम राहणार नाही. भूमी आपल्याजवळ आहे, त्याचबरोबर जल आणि विद्युत या सोयीसुद्धा त्यांना आपण उपलब्ध करून देऊ शकतो. परंतु, कुशल मनुष्यबळाचे काय? हा आपल्याला भेडसावणारा प्रश्न आहे. प्रत्यक्ष उत्पादन करणारी किंवा उत्पादनात सहभाग नोंदविणारी जनसंख्या किती आहे, हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. २०४७ मध्ये भारताला जर विकसित भारत, विश्वगुरू भारत, विकासाचे केंद्र भारत अशा पद्धतीने संपूर्ण जगासमोर मांडायचे असेल, तर विकसित भारताच्या योगदानात तरुणांचा सहभाग आणि महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे, कारण एकूण लोकसंख्येचा महिला व तरुण युवक हा एक मोठा भाग आहे.

आपल्या देशामध्ये तरुणांची संख्या फार मोठी आहे. आज देशामध्ये कोणालाही विचारले की, तुला काय येते, तर तो आपल्याला हे सांगू शकतो की, तो बी. ए. झाला आहे की एम. ए. झाला आहे, म्हणजे त्याने कोणती पदवी घेतली आहे, हे तो सांगतो. पण, त्याला काय येते, याचे उत्तर फार कमी लोकांकडे असते. जोपर्यंत विद्यार्थ्यांजवळ सांगण्यासाठी फक्त डिग्री म्हणजे पदवी असेल, तोपर्यंत त्यांना उद्योगांमध्ये उत्तम संधी मिळणार नाही. परंतु, पदवी प्राप्त करताना कशा पद्धतीची नोकरी किंवा व्यवसाय आपल्याला करायचा आहे, त्याला आवश्यक ते कौशल्य जर त्याने आत्मसात केले, तर त्याच्या नोकरीच्या किंवा व्यवसायामध्ये यशस्वी होण्याच्या त्याच्या संधी वाढतील. तरुणांना कौशल्य आणि संधी या दोन्हीची आवश्यकता आहे, म्हणजे काम करणारे हात हवे आणि ते कार्य उत्तम प्रकारे करणारे कौशल्य सुद्धा त्या हातांमध्ये असणे आवश्यक आहे. उद्योगांमध्ये जे कामगार कार्यरत आहेत, त्यातील जुन्या कामगारांचे कौशल्य पुन्हा एकदा नवीन तंत्रज्ञानाप्रमाणे अद्ययावत करण्याची आवश्यकता असते. उद्योगांची प्रगती नाही झाली, तर देशाची पण प्रगती होणार नाही आणि कामगारांना सुद्धा चांगले दिवस येणार नाहीत, कारण उद्योग तोट्यात आणि कामगार फायद्यात असे चित्र कधीही उभे राहू शकत नाही. आज-काल उद्योगांमध्ये बरेचदा जे प्रशिक्षण दिले जाते, ते केवळ आणि केवळ उद्योगाच्या फायद्याचा विचार करून दिले जाते. परंतु, उद्योगांमध्ये काम करणारा कामगार, त्याला सुद्धा परिवार आहे, मुले आहेत. एक आई-वडील म्हणून त्यांना सुद्धा मुलांच्या भविष्याची चिंता आहे. त्याला सुद्धा निवृत्त झाल्यानंतर स्वतःचे म्हातारपण सन्मानाने घालवता आले पाहिजे. यासाठी आर्थिक नियोजन शिकविणे आवश्यक आहे. हाताला काम, हातामध्ये कौशल्य आणि त्या कामाचा पूर्ण मोबदला मिळणे आवश्यक आहे. अनेक उद्योगांमधील कामे ही धोकादायक स्वरूपाची असतात, त्यामुळे काम करणाऱ्या कामगाराला त्याच्या सुरक्षिततेची हमी सुद्धा मिळणे आवश्यक असते. उद्योगांमध्ये काम करणारा मदतनीस म्हणजे हेल्पर हा सुद्धा काही वर्षांनी कुशल कामगार बनला पाहिजे. कुशल कामगार हा कुशल अधिकारी सुद्धा बनला पाहिजे. यासाठी उद्योगांनाच प्रयत्न करावे लागतील आणि त्यांच्या प्रयत्नांना कामगारांना सुद्धा साथ द्यावी लागेल. आज उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिला सुद्धा कामाला जात आहेत. वाढत्या महागाईमध्ये महिलांचा उद्योगातील सहभाग वाढत आहे. परंतु, ज्या उद्योगातील कामांची रचना पुरुष कामगारांना लक्षात ठेवून झालेली आहे, त्यांना महिला कारखान्यात कामाला आल्यानंतर त्यांच्यासाठी आवश्यक त्या सोयी सुद्धा निर्माण करणे आवश्यक आहे. जे काम महिला अतिशय चांगल्या पद्धतीने करू शकतात, त्या कामांमध्ये त्यांना प्राधान्य देणे हे सुद्धा आवश्यक आहे. जुन्या कामगारांचा अनुभव, नवीन कामगारांची ताकद, महिलांमधील कल्पनाशक्ती यांचा उपयोग करीत उद्योग जागतिक स्पर्धेच्या दृष्टिकोनातून स्वतःला तयार करू शकतो. आम्ही सगळे मिळून आमचे ध्येय शिखर गाठू शकतो, अशा पद्धतीची समन्वयाची आणि परस्पर संवेदना असलेली जाणीव विकसित करण्याची आवश्यकता आहे. एखादी इमारत निर्माण करणारा कदाचित मजूर असू शकतो, परंतु विकसित भारत निर्माण करणारे सगळेच शिल्पकार आहेत. या विकसित भारतासाठी आतापासून सगळ्यांनी कार्यप्रवृत्त होणे आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

## वाचक पत्रे

### सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षणाची कमतरता?

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचे धोरण शासनाकडून काही वर्षांपासून अवलंबले जात आहे. विशेषतः




कोरोना काळापासून शालेय विद्यार्थ्यांच्या हातामध्ये मोबाईल सोपवून अशा दूरस्थ वर्गाची सुरुवात झाली होती. मात्र, या डिजिटल शिक्षण मोहिमेत अनंत अडचणी येत आहेत. सरकारच्या धोरणानुसार शिक्षण क्षेत्राचे डिजिटलीकरण घडवले जात असले तरी अद्याप खेड्यापाड्यांमधील शिक्षण यंत्रणा त्यासाठी सुसज्ज असल्याचे जाणवत नाही.

मुळातच खेड्यापाड्यातील सरकारी शाळांच्या इमारती अतिशय जीर्ण झाल्याचे चित्र पाहायला मिळते. शाळेत येण्यासाठी गरीब कुटुंबातील मुले प्रचंड संघर्ष करत असतात. त्याचबरोबर त्यांना शालेय सुविधांसाठीदेखील झगडावे लागत आहे. इतकेच नव्हे तर पुरेसा शिक्षकवर्गसुद्धा वर्गात नियुक्त नसल्यामुळे मुलांच्या शिक्षणाची मोठी आबाळ दिसून येते. अब्जावधी रुपये मोठमोठ्या विकास प्रकल्पांसाठी खर्च करणाऱ्या सरकारकडे शाळांच्या डागडुगीसाठीदेखील निधी उपलब्ध नसल्याचे जाणवते. खरे तर पिढ्यानपिढ्या शिक्षण न घेतलेल्या कुटुंबातील मुलांसाठी शिक्षण हे आनंददायी असणे गरजेचे आहे. त्याकरिता त्यांना शाळेकडे कसे आकर्षित करता येईल यावर जास्तीत जास्त भर दिला गेला पाहिजे. परंतु, त्याऐवजी शाळा, वर्ग आणि सामूहिक शिक्षणाच्या आनंदापासून देशातील कोट्यवधी मुलांना पारखे केले जात आहे. डिजिटल शिक्षण देण्याच्या अट्टहासापायी देशातील बहुसंख्य मुले शिक्षणापासून वंचित राहात आहेत. याचाही शासनाकडून गंभीरपणे विचार होण्याची आवश्यकता आहे. शाळेमध्ये समाजाच्या सर्वच स्तरावरील मुलांनी एकत्र येऊन ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया सुलभ कशी होईल, याची देशातील शिक्षण व्यवस्थेने अधिक लक्ष आणि काळजी घेणे आवश्यक आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### उत्सवाचे पावित्र्य आणि मांगल्य टिकवा

लोकमान्य टिळकांनी समाजप्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकजागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी केली होती. जातिभेद विसरून सर्वांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि आनंदाने हा सण साजरा करावा, हा त्यामागील मूळ उद्देश होता. मात्र, काळाच्या ओघात या उत्सवाचे स्वरूप पूर्णपणे बदलल्याचे दिसते.

सध्याच्या परिस्थितीकडे पाहिल्यास अनेक चिंताजनक बाबी समोर येतात. उत्सवात वर्गणीसाठी होणारी जबरदस्ती आणि प्रचंड खर्च करून उभारले जाणारे भव्य मंडप सामान्य नागरिकांना नकोसे वाटतात. त्याहूनही दुर्दैवी म्हणजे, ज्या सात्त्विक आणि मंगलमूर्तीची आपण मनोभावे पूजा करतो, त्या आराध्य देवतेची प्रतिष्ठा राखून तिची स्थापना करण्याऐवजी काही ठिकाणी अतिशय विद्रूप किंवा अयोग्य पद्धतीने मूर्ती बसवल्या जातात. डीजेमुळे होणारे ध्वनिप्रदूषण, काही मंडळांमधील अनुचित प्रकार आणि उत्सवाचे झालेले बेसुमार व्यापारीकरण हे नकोसे वाटते. वर्गणीची सक्ती थांबवून, मूर्तीची प्रतिष्ठा राखून, पर्यावरणपूरक आणि साध्या पद्धतीने हा उत्सव साजरा केला पाहिजे; जेणेकरून बाप्पाचे पावित्र्य, संस्कृतीचा वारसा आणि सामाजिक सलोखा टिकून राहील.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

■■■

### आधुनिक जीवन : समस्या व योग

यक्ष प्रश्नांपैकी एक प्रश्न होता की सर्वांत मोठी धनसंपत्ती कोणती? या प्रश्नाला युधिष्ठिराने उत्तर दिले की शारीरिक आरोग्य हीच खरी सर्वांत मोठी धनसंपत्ती आहे. आज आपण धन, पैसा, जमीन हीच खरी संपत्ती समजतो. तुमच्याजवळ खूप पैसा आहे, पण त्याचा आनंद घेण्यासाठी आवश्यक शारीरिक संपदा नसेल तर या पैशाचा काहीही उपयोग नसतो,. म्हणून शारीरिक आरोग्य महत्त्वाचे आहे. आयुष्यभर निरोगी राहायचे असेल तर योगासनासारखा दुसरा पर्याय नाही.

आधुनिक जीवन अतिशय गतिमान झालेले आहे. पूर्वी नोकरीची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत वेळ होती. ती आता इतकी बदलली आहे की त्याला आता वेळेचे बंधनच राहिलेले नाही. त्यामुळे अनारोग्य वाढले आहे. कामामुळे धनसंपदा वाढली, पण खरी संपत्ती शरीराचे आरोग्य आहे, हे आपण विसरत चाललो आहोत. शरीर प्रकृती नीट ठेवायची असेल तर दिवसाच्या २४ तासांपैकी किमान १ तास तरी शारीरिक श्रम करणे आवश्यक आहे. या एका तासामध्ये तुम्ही कुठलाही व्यायाम करू शकता, जसे की फिरायला जाणे, कोणता तरी खेळ खेळणे अथवा स्विमिंग करणे. हा व्यायाम तुमच्या वयाप्रमाणे व शारीरिक क्षमतेप्रमाणे करायचा आहे. यासाठी योगासारखा दुसरा पर्याय नाही.

नागपूर येथील रामनगर येथे योगाभ्यासी मंडळ आहे. शारीरिक आरोग्य उत्तम ठेवावयाचे असेल तर प्रत्येक व्यक्ती याचा लाभ घेऊ शकते. येथे योगासन वर्ग निःशुल्क आहेत हे विशेष. ■

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘सेवा संकल्प अभियान’ चित्ररथाचा शुभारंभ

## आदिवासी विकास विभागाच्या योजनांची जनजागृती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या चित्ररथ उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

राज्यभर हे अभियान १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असून, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांच्या वतीने या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. बी.एस.एन.एल. इमारत, संगमेश्वर महाविद्यालय, सात रस्ता परिसर येथे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकडे यांच्या हस्ते ‘सेवा संकल्प अभियान’ चित्ररथाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, वसतिगृह कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

चित्ररथाच्या माध्यमातून आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. यामध्ये वनहक्क कायदा, राबरी महामंडळाच्या स्वयंरोजगार योजना, महिला बचत गट सक्षमीकरण, न्यूक्लियस बजेट, ठक्कर बापा आदिवासी वस्ती सुधार योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय योजना, भारत सरकार शिष्यवृत्ती योजना तसेच शिक्षण व परीक्षा शुल्क योजनांचा समावेश होता.

यावेळी उपस्थित नागरिकांना योजनांची माहिती दर्शविणारे फलक, बॅनर्स आणि माहितीपत्रकांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शासकीय व अनुदानित आश्रम शाळांचे अधिकारी-कर्मचारी, विविध योजनांचे लाभार्थी आणि महिला बचत गट सदस्यांच्या सहभागातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौकापर्यंत जनजागृती फेरीही काढण्यात आली. प्रकल्प अधिकारी धनंजय झाकडे यांनी आदिवासी बांधवांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

या अभियानामुळे योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचून अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

# मेहता शाळेत गणपती विसर्जन मिरवणूक उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेच्या वतीने गणपती विसर्जन मिरवणुकीचे पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक कला व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

मिरवणुकीमध्ये तालपथक, झेंडा पथक, लाठी-काठी, तलवारबाजी यांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे विविध नृत्ये सादर करून मिरवणुकीत उत्साह आणि चैतन्य निर्माण केले. विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणारे फलक हातात घेऊन जनजागृतीही केली.

या मिरवणुकीत शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध सहभागामुळे मिरवणुकीला विशेष शोभा प्राप्त झाली. सूत्रसंचालन वर्षा कुलकर्णी यांनी केले. मिरवणुकीच्या उत्कृष्ट नियोजन व आयोजनासाठी मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका माननीय सौ. मीनाक्षी भाटवडेकर तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पत्रकार कृष्णकांत चव्हाण यांना ‘सरफोजीराजे भोसले समाज भूषण’ पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

गेल्या ४० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात अविरतपणे कार्यरत असलेले ज्येष्ठ पत्रकार कृष्णकांत गजानन चव्हाण यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने ‘सरफोजीराजे भोसले समाज भूषण’ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी याबाबतचे अधिकृत पत्र पाठवून माहिती दिली आहे. परिषदेच्या वतीने मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता तंजावर (तामिळनाडू) येथे सरफोजीराजे द्वितीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. याच भव्य संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.चव्हाण यांनी केवळ पत्रकारिताच नव्हे तर सामाजिक बांधिलकीही जोपासली आहे. सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो गरजू रुग्णांना उपचार व शस्त्रक्रियेसाठी वेळोवेळी मदत केली आहे. तसेच मूळ गाव शिरापूर (ता. मोहोळ) येथे पाझर तलाव उभारण्यासाठी विशेष प्रयत्न केले असून, बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर फंडातून गावासाठी सुसज्ज स्मशानभूमी उभारून दिली आहे. समाजहितासाठी केलेल्या या उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.

# ‘नशामुक्त युवा, विकसित भारत’ अभियानातून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

## हरिभाई देवकरण महाविद्यालयात नशामुक्तीची व स्वाक्षरी अभियान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

शाळा समिती अध्यक्ष सुरेश मंकणी यांच्या मार्गदर्शनाखाली हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर येथे ‘नशामुक्त युवा फॉर विकसित भारत’ या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी व्याख्याते रामचंद्र वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना नशेचे शारीरिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. व्यसनाची सुरुवात अनेकदा छोट्या सवयींपासून होते आणि पुढे त्याचे गंभीर परिणाम व्यक्ती, कुटुंब व समाजावर होऊ शकतात, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूक केले. युवकांनी आपल्या भवितव्याचा विचार करून कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला बळी पडू नये, तसेच आपल्या मित्र-मैत्रिणींनाही व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले. ‘नशामुक्त युवा, विकसित भारत’ या संकल्पनेचा संबंध विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याशी जोडून सांगण्यात आला. निरोगी, शिस्तबद्ध व जबाबदार युवक हेच देशाच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे युवकांनी शिक्षण, कौशल्यविकास, क्रीडा व सकारात्मक उपक्रमांकडे लक्ष देऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून नशामुक्तीची शपथ व स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. एस. कुंभार यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच चांगल्या सवयी, सकारात्मक विचार आणि सामाजिक जबाबदारी अंगीकारण्याचे आवाहन केले. नशामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपली भूमिका ओळखून काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी पर्यवेक्षक भानुदास बनसोडे पर्यवेक्षक अप्पासाहेब राऊत होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात आकाश जिनगर यांनी अभियानाची उद्दिष्टे व रूपरेषा विद्यार्थ्यांसमोर मांडली. सूत्रसंचालन धन्यकुमार बिराजदार यांनी केले. प्रमोद चुंगे यांनी आभार मानले.



# भजनाच्या तालावर गणरायाला निरोप

**सांगोला, दि.२० सप्टेंबर-**

ग्रामीण भागात गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर चोपडी (ता.सांगोला) येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने अनोखा आणि अनुकरणीय निर्णय घेत डीजे व कर्णकर्कश संगीताला फाटा देत भजनाच्या तालावर श्री गणरायाचे विसर्जन केले.

भक्ती, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने मंडळाने हा निर्णय घेतला. ज्ञानोबा-तुकाराम आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने संपूर्ण चोपडी परिसर भक्तिमय झाला होता. ही विसर्जन मिरवणूक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती.

# तालुका योगासन स्पर्धेत कल्याणशेट्टी शाळेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० सप्टेंबर-**

तालुकास्तरीय योगासन स्पर्धेत कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्रीशैल किणगी, कुमार जाधव, योग प्रशिक्षक चंद्रकांत बिराजदार यांचे अभिनंदन करण्यात आले.



गुणानुक्रमे कामगिरी : **ट्रॅडिशनल योगासन :** १४ वर्षे मुले : नरेंद्र रवींद्र कालीबत्ते, श्रीरंग गणेश फडतरे. मुली : भक्ती सिद्धाराम मोरडे, गौरी भीमाशंकर कामाठी, वैष्णवी सुरेशकुमार माशाळे.

१७ वर्षे मुले : शुभंकर अनंत मसलेकर, वीरेंद्र विजयकुमार जोजन. मुली : सिद्धी देविदास बाबर, लक्ष्मी खिरानंद कणगी.

**रिदमिक योगासन :** १४ वर्षे मुले : श्रीरंग गणेश फडतरे व नरेंद्र रवींद्र कालीबत्ते. मुली : सोनाली विजय म्हेत्रे, कीर्तीकी सुरेश कवटगी. १७ वर्षे मुले : कार्तिक सचिन रामशेट्टी, विनायक मल्लिनाथ बगले-पाटील.

**आर्टिस्टिक सिंगल :** १४ वर्षे मुली : भक्ती सिद्धाराम मोरडे. १७ वर्षे मुली : सिद्धी देविदास बाबर.

**आर्टिस्टिक पेयर :** १४ वर्षे मुली : भक्ती सिद्धाराम मोरडे व लक्ष्मी मारुती धर्मसाले. १७ वर्षे मुली : धनश्री परमेश्वर पोलासे व फायका आसिफ बेग. १७ वर्षे मुले : कार्तिक सचिन रामशेट्टी व विनायक मल्लिनाथ बगलेपाटील.

# ७६ ग्रामपंचायतींमध्ये विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन

## वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, प्रभात फेरी व बाईक रॅलीद्वारे जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सेवा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि लोकसहभागाचा संदेश देणाऱ्या ‘सेवा संकल्प अभियानाचा’ सांगोला तालुक्यात विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात शुभारंभ करण्यात आला. तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतींमध्ये अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पंचायत समिती, सांगोला येथे सभापती पूनम सुदर्शन इंगवले यांच्या हस्ते पंचायत समितीच्या आवारात वृक्षारोपण करून अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहभागातून सांगोला शहरातून बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये ‘सेवा संकल्प अभियानाबाबत’ जनजागृती करण्यात आली. तसेच, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. योगेश कांबळे यांनी ग्रामपंचायत शिवणे येथे वृक्षारोपण करून अभियानाचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांना अभियानाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अभियानाची सप्ताहनिहाय प्रभावी अंमलबजावणी करण्यासह प्रत्येक उपक्रमात लोकसहभाग वाढविण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. अभियानांतर्गत तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा, प्रभात फेरी, स्वच्छता अभियान, जनजागृतीपर कार्यक्रम यांसह विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमांमध्ये ग्रामस्थ, महिला, युवक, विद्यार्थी, ग्रामपंचायत पदाधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. ‘सेवा हीच सामाजिक बांधिलकी’ या भावनेतून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून, स्वच्छ व सुंदर गावांची निर्मिती, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.सांगोला तालुक्यातील सर्व ७६ ग्रामपंचायतींमध्ये अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ‘सेवा संकल्प अभियानाच्या’ माध्यमातून लोकसहभागातून विकास आणि सामाजिक परिवर्तनाचा संकल्प करण्यात आला आहे.


बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
**नवी पेठ, शाखा - पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, विठ्ठल मंदिर चौपाड, नवी पेठ, सोलापूर - ४१३००७**

**परिशिष्ठ 3-A प्रतिकात्मक ताबा नोटीस**

ज्या अर्थी, खाली सही करणार बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, यांनी सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि सेक्शन १३(२) कलमाखाली व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ चा रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करुन कर्जदार **श्री. फारुख मुजीब खान आणि सौ. रुबिना फारुख खान यांना दिनांक ०९/०६/२०२६ रोजी मागणी नोटीस बजावली** होती की त्यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु. २२,५५,२२४.१०/- (अक्षरी - बावीस लाख पंचावण्ण हजार दोनशे चौवीस रुपये आणि दहा पैसे फक्त) + त्यावर अधिक व्याज + इतर खर्च** हे या नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी.

कर्जदार ही रक्कम परत करण्यास अपयशी ठरले असल्याने विशेषकरुन कर्जदार / जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी त्यांना / तिला सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) चा रुल ८ अंतर्गत अधिकारांचा वापर करुन खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. १७/०९/२०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेष करुन कर्जदार, आणि जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. असा व्यवहार केल्यास तो बँक ऑफ बडोदा यांना येणे रक्कम **रक्कम रु. २२,५५,२२४.१०/- (अक्षरी - बावीस लाख पंचावण्ण हजार दोनशे चौवीस रुपये आणि दहा पैसे फक्त) + व्याज + इतर खर्च** यांच्या अधिन राहील.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मालमत्ता सीटीएस क्रमांक १०२६३, जी महानगरपालिका घर क्रमांक ५६५,फ्लॅट क्रमांक ७०३, 'मतीन रेसिडेन्सी' नावाच्या इमारतीच्या सातव्या मजल्यावर आहे, प्रशासकीय क्षेत्रफळ ३७.३५ चौ.मी., बांधकाम क्षेत्रफळ ५२.२९ चौ.मी. साखर पेठ, सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित, ही सर्व स्थावर मालमत्ता श्री. फारुख मुजीब खान आणि सौ. रुबिना फारुख खान यांची आहे.

मालमत्तेची चतु:सिमा :
उत्तरेस : ९.०० मीटर रोड
दक्षिणेस : ४.५० मीटर रोड
पुर्वेस : बाजूचा रस्ता (फ्लॅट) सीटीएस क्र. १०२६२/२ बाजूचा रस्ता
पश्चिमेस : ४.५० मीटर रोड

उपरोक्त मालमत्तेच्या फ्लॅट क्रमांक ७०३ च्या चतु:सिमा :
उत्तरेस : सामान्य क्षेत्र आणि जिना — दक्षिणेस : मागील बाजूचा रस्ता
पुर्वेस : बाजूचा रस्ता — पश्चिमेस : फ्लॅट क्रमांक ७०४

दिनांक : १७/०९/२०२६
स्थळ : नवी पेठ, सोलापूर
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/-
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा



श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर
॥ धनवृद्धि समृद्धि ॥
मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसितील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**
**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) सिटी ट्रेडिंग कंपनी प्रोप: अस्लम मोहमद युसुफ बागवान (कर्जदार)<br>रा : ई. डब्लू. एस. ३, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६<br>२) सोमनाथ परमेश्वर चारे (सहकर्जदार)<br>रा : नागोबा गल्ली, मुरूम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद ४१३६०५<br>३) इम्रान खलील मुछाले (जामीनदार)<br>रा : ३१५, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर ४१३४०१<br>४) मोहमद आरिफ मोहमद युसुफ बागवान (जामीनदार)<br>रा : एम. आय. जि. ३, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००४००३२०२००००९१ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये १,८४,३८,०३९.२० (रु. एक कोटी चौऱ्याऐंशी लाख अडोतीस हजार एकोणचाळीस रुपये वीस पैसे ) अधिक दि. १३/०५/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | दि. १२/०५/२०२६ व दि. ०१/०७/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत मध्ये |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १७/०९/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ येथील टी. पी. स्कीम नं. १ पैकी सी. स. नं. १०३८४ पैकी फायनल प्लॉट नं. २९/ए याचे एकूण क्षेत्र ११९४.३४ चौ. मी. पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ५०६.०० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील क्षेत्र ६७.४७ चौ. मी. यापूर्वी विकलेला असून राहिलेले उत्तरेकडील क्षेत्र ४३८.५३ चौ. मी. पैकी उत्तरेकडील रस्त्यालगतचे रस्त्यासाठी संपादन झालेले क्षेत्र ७९.९० चौ. मी. वजा जाता उर्वरित क्षेत्र ३५८.६३ चौ. मी. इतकी मिळकत असून या मिळकतीचे चतु:सिमा असे :- पूर्वेस - सदर फायनल प्लॉट नं. २९/ए पैकी राहिलेले क्षेत्र, पश्चिमेस - रस्ता, उत्तरेस - रस्ता (रस्त्यासाठी संपादित झालेले क्षेत्र ७९.९० चौ. मी.), दक्षिणेस - सदर फा. प्लॉट नं. २९/ए पैकी अ. मुनाफ महिबूब बागवान व इतर यांना या पूर्वी विक्री केलेले क्षेत्र ६४.४७. चौ. मी |
| २ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) हॉटेल साईलिला प्रोप: उत्तरेश्वर अनंतराव पिंगळे (कर्जदार)<br>रा : सोमवार पेठ, गांधी शॉपिंग सेंटर समोर, बार्शी, सोलापूर ४१३४०१<br>२) स्वाती उत्तरेश्वर पिंगळे (जामीनदार)<br>रा : ८३५, चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, सोलापूर ४१३४११<br>३) मंजुषा सुरजितसिंह कोकाटे (जामीनदार)<br>रा : २५०४, टिळक चौक, बार्शी, सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२०२००००१४ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ४४,५९,९१२/- (रु. चव्वेचाळीस लाख एकोणसाठ हजार नऊशे बारा फक्त) अधिक दि. ०१/०४/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २४/०४/२०२६ व दि. ०१/०७/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १७/०९/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर, ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्युन्सिपल हद्दीतील सि. स. नं. ४२०६/१ याचे क्षेत्र ५६.३७ चौ. मी. यामध्ये रजी. दस्त क्र. ३३२६/१ अन्वये क्षेत्र ४२.९९ चौ. मी. इतके क्षेत्र अनंतराव पिंगळे व स्वाती ऊ. पिंगळे यांनी सामाईक खरेदी घेतलेले आहे. तसेच रजी दस्त क्र. ४४६८/२०२१ अन्वये १३.३८ चौ. मी. इतके क्षेत्र उत्तरेश्वर पिंगळे यांनी खरेदी घेतलेले आहे. असे एकूण ५६.३७ चौ. मी. हि बांधकामासहित मिळकत. या मिळकतीचे चतु:सिमा असे :- पूर्वेस - येडशिकर यांची मिळकत, पश्चिमेस - भाजी मार्केट रोड, उत्तरेस - नगरपालिका रस्ता, दक्षिणेस - सदर मिळकतीपैकी मनोज शेटे यांची राहिलेली जागा |
| ३ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) हॉटेल साईलिला प्रोप: उत्तरेश्वर अनंतराव पिंगळे (कर्जदार)<br>रा : सोमवार पेठ, गांधी शॉपिंग सेंटर समोर, बार्शी, सोलापूर ४१३४०१<br>२) स्वाती उत्तरेश्वर पिंगळे (जामीनदार)<br>रा : ८३५, चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, सोलापूर ४१३४११<br>३) मंजुषा सुरजितसिंह कोकाटे (जामीनदार)<br>रा : २५०४, टिळक चौक, बार्शी, सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१७००००३४ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ४०,०३,४८५/- (रु. चाळीस लाख तीन हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) अधिक दि. ०१/०४/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २४/०४/२०२६ व दि. ०१/०७/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १७/०९/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर, ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्युन्सिपल हद्दीतील सि. स. नं. ४२०६/१ याचे क्षेत्र ५६.३७ चौ. मी. यामध्ये रजी. दस्त क्र. ३३२६/१ अन्वये क्षेत्र ४२.९९ चौ. मी. इतके क्षेत्र अनंतराव पिंगळे व स्वाती ऊ. पिंगळे यांनी सामाईक खरेदी घेतलेले आहे. तसेच रजी दस्त क्र. ४४६८/२०२१ अन्वये १३.३८ चौ. मी. इतके क्षेत्र उत्तरेश्वर पिंगळे यांनी खरेदी घेतलेले आहे. असे एकूण ५६.३७ चौ. मी. हि बांधकामासहित मिळकत. या मिळकतीचे चतु:सिमा असे :- पूर्वेस - येडशिकर यांची मिळकत, पश्चिमेस - भाजी मार्केट रोड, उत्तरेस - नगरपालिका रस्ता, दक्षिणेस - सदर मिळकतीपैकी मनोज शेटे यांची राहिलेली जागा |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १७/०९/२०२६**
**स्थळ : सोलापूर**
सील
**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

## महत्त्वाचे

### टेकबॉलमध्ये क्विम्सीचे कांस्यपदक हुकले



**नागोया :** क्विम्सी डिसोझाने जबरदस्त पुनरागमन केले, परंतु शनिवारी येथे आशियाड क्रीडा स्पर्धेत महिला एकेरी टेकबॉलच्या कांस्यपदकाच्या सामन्यात तिला स्थानिक आवडती खेळाडू युइना साकामोटोकडून ०-२ असा थोडक्यात पराभव पत्करावा लागला. मुंबईच्या या खेळाडूने पहिल्या गेममध्ये सेट पॉइंट मिळवला होता आणि बरोबरी साधण्याच्या प्रयत्नात दुसऱ्या गेममध्ये १०-८ अशी आघाडी घेतली होती. तिने मॅच-पॉइंट गमावल्यानंतर पुनरागमन करत एक विनिंग सर्व्हिसही केली, परंतु फाऊल केल्यामुळे तिला सामना गमवावा लागला. जो खेळाडू प्रथम १२ गुणांपर्यंत पोहोचतो तो एक सेट जिंकतो. पहिल्या दोन सेटमध्ये, खेळाडू एका गुणाने जिंकू शकतो, तर जर सामना निर्णायक तिसऱ्या सेटमध्ये गेला, तर विजेत्याला विजय निश्चित करण्यासाठी दोन गुणांचे अंतर राखणे आवश्यक असते. टेकबॉल हा एक नॉन-कॉन्टॅक्ट खेळ आहे, जो फुटबॉल आणि टॅबलेट यांचे मिश्रण आहे.

### एमएमए फायटर वरुण सन्याल रुग्णालयात

**नागोया :** मिश्र मार्शल आर्ट्स फायटर वरुण सन्याल रविवारी येथील एका क्रूझ शिपवर सौना घेत असताना बेशुद्ध झाला आणि त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु आता तो धोक्याबाहेर आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य संजीव सन्याल यांचा मुलगा असलेला वरुण, रविवारच्या स्पर्धेसाठी आपले वजन कमी करण्याचा प्रयत्न करीत होता. सुदैवाने, नेपाळच्या एका खेळाडूने त्याला त्या अवस्थेत पाहिले आणि त्याला जागे केले. वरुण मला फोन करू शकला आणि आम्ही त्याला रुग्णालयात नेले. काळजी करण्यासारखे फार काही नव्हते, त्यामुळे त्याला पहाटे ३:०० च्या सुमारास क्रूझवर परत आणण्यात आले. तो आता स्थिर आहे आणि धोक्याबाहेर आहे, असे एमएमए स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष निखिल कुंदेरा यांनी सांगितले.

### वुशूमध्ये सूरज सिंगला ११ वे स्थान

**नागोया :** भारताचा सूरज सिंग मयांगलांबम पुरुषांच्या चांगक्वान वुशू अंतिम फेरीत ११व्या स्थानी राहिला, तर अपर्णा दहिया आणि विक्रांत बलियान रविवारी येथे झालेल्या आयची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेत आपापल्या वजन गटातील १६ संघांच्या फेरीतील सामन्यांमध्ये पराभूत झाले. महिलांच्या ५२ किलो सांडा प्रकारात अपर्णा इराणच्या सोगंद सिंकाईचेतनकडून ०-२ ने पराभूत झाली. या दोघींमध्ये झालेल्या दोन्ही फेऱ्यांमध्ये अपर्णाने प्रत्येकी पाच गुण गमावले. या पराभवामुळे, यावर्षी मे महिन्यात सांडा विश्वचषक स्पर्धेत महिलांच्या ५२ किलो गटात सुवर्णपदक जिंकलेल्या अपर्णाला उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवता आले नाही. इराणच्या सोहेल मौसावीविरुद्ध पुरुषांच्या ७५ किलो सांडा लढतीत, भारताच्या बलियानला उपांत्यपूर्व फेरीपूर्वीच ०-२ असा पराभव पत्करावा लागला. दोन्ही फेऱ्यांमध्ये त्याने प्रत्येकी पाच गुण गमावले असले तरी, पहिल्या फेरीत फोर्सिबल काउंटमुळे बलियानने आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध एक गुण नोंदविला होता. सांडा हा वुशूचा एक फुल-कॉन्टॅक्ट लढाईचा प्रकार आहे. दरम्यान, ऐची प्रीफेक्चरल मार्शल आर्ट्स हॉलमध्ये २१ खेळाडूंच्या स्पर्धेत, सूरजने एकूण ९.६८३ गुण मिळविले.

# भारताला नेमबाजीत दोन रौप्यपदके

## सांघिक प्रकारातील रौप्यासह एलावेनिल वलारिवनला दुहेरी यश

**नागोया, २० सप्टेंबर**

सोनम उत्तम मस्कर, एलावेनिल वलारिवन व विदर्शा विनोदने महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात एकत्रितपणे रौप्यपदक जिंकून २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील भारताच्या नेमबाजी मोहिमेची रविवारी उत्साहवर्धक सुरुवात केली. या कामगिरीमुळे देशाला नेमबाजीमधील पहिले पदक मिळाले आहे. त्यानंतर एलावेनिल वलारिवनने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात उपविजेतेपद पटकावत, दिवसाच्या सुरुवातीला जिंकलेल्या सांघिक रौप्यपदकात वैयक्तिक रौप्यपदकाची भर घातली आणि दुहेरी यश संपादन केले.

या भारतीय त्रिकुटाने दमदार सांघिक कामगिरी करीत १८९८.० गुणांसह दुसरे स्थान पटकावले. त्यांच्या पुढे चीनचा संघ आहे. चीनने १९०४.२ गुणांसह पात्रता फेरीचा विश्वविक्रम मोडून काढला. चीनने गत वर्षी ऑगस्टमध्ये शिमकेंट येथे झालेल्या आशियाई चॅम्पियनशिपमध्ये नोंदवलेला स्वतःचाच १९०२.० गुणांचा विक्रम मोडला, हा आशियाई विक्रम म्हणूनही कायम होता.

उर्वरित पदकांसाठीच्या लढतीत भारत आणि यजमान जपान यांच्यात फारसा फरक नव्हता, परंतु भारतीय खेळाडूंनी महत्त्वाच्या क्षणी आपला संयम राखला. रौप्यपदकासाठीच्या चुरशीच्या लढतीनंतर, जपानने १८९७.१ गुणांसह तिसरे स्थान पटकावले, जे भारतापेक्षा केवळ ०.९ गुणांनी मागे होते. संघीय पदके तीन नेमबाजांच्या पात्रता फेरीतील गुणांच्या आधारावर ठरविली जातात, ज्यात एकूण गुणांवरून अंतिम क्रमवारी निश्चित केली जाते.



**१० मीटर एअर रायफल महिला सांघिक नेमबाजीच्या अंतिम स्पर्धेनंतर रौप्यपदक विजेत्या भारताच्या विदर्शा विनोद, सोनम मस्कर आणि एलावेनिल वलारिवन**

पात्रता फेरीत तिसऱ्या स्थानी राहिलेल्या सोनमने ६३४.१ गुणांसह भारताचे नेतृत्व केले. आपल्या तिसऱ्या आशियाड क्रीडा स्पर्धेत भाग घेतलेल्या ऑलिम्पियन एलावेनिलने ६३३.५ गुणांसह सातवे स्थान मिळविले, तर आशियाड क्रीडा स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या विदर्शाने ६३०.४ गुणांसह १२ वे स्थान पटकावले.

विदर्शा वैयक्तिक अंतिम फेरीत पोहोचू शकली नसली तरी, भारताला रौप्यपदक मिळवून देण्यात तिचे योगदान निर्णायक ठरले. होय, ही एक मोठी उपलब्धी आहे. मी अंतिम फेरीसाठी पात्र ठरू शकले नाही ही एक वेगळी गोष्ट आहे, पण सांघिक रौप्यपदकाने आम्हाला एक चांगली सुरुवात दिली आहे, असे केरळची २७ वर्षीय विदर्शा स्पर्धेनंतर म्हणाली. या दिवशी सोनम व एलावेनिलने वैयक्तिक अंतिम फेरीत स्थान मिळविले, त्यामुळे भारताला रविवारी आपल्या पदकतालिकेत आणखी भर घालण्याची संधी मिळाली.

सोनमने पात्रता फेरीत मिळवलेले तिसरे स्थान आणि एलावेनिलने मिळवलेले सातवे स्थान यांमुळे दोन्ही भारतीय खेळाडू आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत पोहोचल्या. दरम्यान, चीनने या क्रीडा प्रकारात आपली ताकद सिद्ध केली. ज्युनियर विश्वविजेती असलेल्या किशोरवयीन वांग झिफेईने ६३८.८ गुणांसह पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले व या प्रक्रियेत एक नवीन आशियाई पात्रता विक्रम प्रस्थापित केला. हान जियाननेही ६३३.८ गुण मिळवून पाचवे स्थान पटकावत अंतिम फेरीत प्रवेश केला. चीनचे तीन नेमबाज अंतिम फेरीसाठी पात्र ठरले होते, परंतु प्रत्येक देशातून केवळ दोनच खेळाडूंना वैयक्तिक पदकाच्या फेरीत भाग घेण्याची परवानगी असल्याने, त्यांच्या तिसऱ्या नेमबाजाला संधी मिळाली नाही.

**एलावेनिलची अपेक्षेनुरुप कामगिरी**

अपेक्षेप्रमाणे एलावेनिल वलारिवानने महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये वैयक्तिक रौप्यपदक पटकावले. २०२५ च्या विश्व स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या एलावेनिलने अंतिम फेरीत २५२.४ गुण मिळवून दुसरे स्थान पटकावले. जपानच्या हिनाता ताइचीने आशियाड क्रीडा स्पर्धेचा विक्रम नोंदवित २५३.० गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर दक्षिण कोरियाच्या ह्योजिन बॅनने २३०.४ गुणांसह कांस्यपदक मिळविले.

अंतिम फेरीत प्रवेश करताना एलावेनिल ताइचीपेक्षा केवळ ०.३ गुणांनी मागे होती. तिने १०.४ गुण मिळविले, तर जपानी नेमबाज ताइचीने १०.६ गुण मिळविले, ज्यामुळे हे अंतर ०.५ गुणांपर्यंत वाढले आणि ती स्पर्धेत टिकून राहिली. सामना फिरवण्यासाठी शेवटच्या क्षणी एका जोरदार शॉटची गरज असताना, एलावेनिलने १०.१ गुण मिळवले, पण ताईचीने संयम राखत १०.२ गुणांसह सुवर्णपदक निश्चित केले आणि आशियाई क्रीडा स्पर्धेचा नवा विक्रम प्रस्थापित केला.

रविवारी सोनम मस्कर आणि विदर्शन विनोद यांच्यासोबत महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेत भारताला रौप्यपदक जिंकून देण्यात मदत केल्यानंतर, एलावेनिलचे हे दिवसातील दुसरे पदक होते. ◂ (वृत्तसंस्था)

### नेमबाजी मोहिमेची उत्साहवर्धक सुरुवात

भारतासाठी, पहिल्या दिवशी मिळालेल्या दोन रौप्यपदक हे मोठ्या अपेक्षांसह नेमबाजी मोहिमेची एक उत्साहवर्धक सुरुवात आहे. भारतीय नेमबाजांनी २०२२ च्या हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत विक्रमी २२ पदके - सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि सहा कांस्य मिळविली होती.

# भारतीय महिला अंतिम फेरीत

## बांगलादेशवर ११४ धावांनी विजय

**निशिन, २० सप्टेंबर**

शेफाली वर्माच्या ४९ चेंडूंतील नाबाद शतक आणि नंदनी शर्मा व दीप्ती शर्माच्या प्रत्येकी तीन बळींच्या बळावर भारताने आयची-नागोया २०२६ आशियाड क्रीडा स्पर्धेत महिला क्रिकेटच्या उपांत्य सामन्यात बांगलादेशवर ११४ धावांनी दणदणीत विजय नोंदवून स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यामुळे महिला क्रिकेटमध्ये भारताचे सुवर्ण किंवा रौप्यपदक निश्चित झाले आहे. पहिल्या उपांत्य सामन्यात श्रीलंकेने पाकिस्तानवर ८ गड्यांनी विजय नोंदविला. आता मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी भारतीय महिला संघाला सुवर्णपदकासाठी श्रीलंकेविरुद्ध अंतिम सामना खेळावा लागणार आहे, त्याच दिवशी बांगलादेश व पाकिस्तान यांच्यात कांस्यपदकासाठी सामना खेळविला जाणार आहे.

बांगलादेशविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना भारताने ४ गडी गमावून १९५ धावा केल्या, यात शेफालीने डावाच्या शेवटच्या चेंडूवर आपले पहिले आंतरराष्ट्रीय शतक पूर्ण केले. तिच्या या खेळीत नऊ षट्कार व तीन चौकार ठोकल्यामुळे बांगलादेशला अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करणे आवश्यक झाले. बांगलादेशचा संपूर्ण संघ १५.४ षटकांत ८१ धावांतच गारद झाला.



**शेफाली वर्मा : नाबाद १००, चेंडू ४९, चौकार ३, षट्कार ९**

स्मृती मंधानाने १९ चेंडूंत ३७ धावा करून भारताला वेगवान सुरुवात करून दिली, आणि याच खेळीदरम्यान ती महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली. तर, चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या हरमनप्रीत कौरने ३३ चेंडूंत ४० धावा करून आपला फॉर्म परत मिळविला.

भारताच्या डावाची सुरुवात ३६ चेंडूंत ७२ धावांच्या सलामीच्या भागीदारीने झाली. शेफालीने आपल्या पहिल्या १७ चेंडूंत ३४ धावा ठोकून डावाला गती दिली, तर मंधानाने सुरुवातीला दुय्यम भूमिका बजावली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या जी. कमलिनीला मिळालेल्या आणखी एका संधीचे सोने करता आले नाही, तर ऋचा घोषने केवळ दोन धावा केल्या. हरमनप्रीतने शेफालीसोबत तिसऱ्या गड्यासाठी ५५ चेंडूंत ९४ धावा जोडल्या. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा इंडोनेशियावर १३-१ ने विजय

## पुरुष हॉकीमध्ये दिलप्रीत सिंगचे चार गोल

**काकामिगाहारा, २० सप्टेंबर**

आक्रमक हॉकीपटू दिलप्रीत सिंगने चार गोल करून आपल्या कौशल्याची झलक दाखविली. दिलप्रीतच्या या कामगिरीच्या बळावर गतविजेत्या भारतीय पुरुष हॉकी संघाने रविवारी येथे झालेल्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील 'गट अ'च्या सलामीच्या सामन्यात नवख्या इंडोनेशियावर १३-१ असा दणदणीत विजय मिळवला. भारताचा पुढील सामना मंगळवारी श्रीलंकेविरुद्ध होईल.दिलप्रीतने १८व्या, १९व्या, ३७व्या, ४९व्या मिनिटाला चार मैदानी गोल केले, तर भारतासाठी शिलानंद लाक्रा (६व्या, ३५व्या मिनिटाला) आणि सुखजीत सिंगने (३८व्या, ४८व्या मिनिटाला) प्रत्येकी दोन गोल केले. इतर गोल करणाऱ्यांमध्ये अभिषेक (१२व्या मिनिटाला), राजिंदर सिंग (१९व्या मिनिटाला), मनदीप सिंग (२१व्या मिनिटाला), कर्णधार हरमनप्रीत सिंग (२८व्या मिनिटाला) आणि जुगराज सिंगचा (४७व्या मिनिटाला) समावेश आहे. इंडोनेशियाचा एकमेव सांत्वनपर गोल ३३व्या मिनिटाला औलिया अल अर्धने केला.

हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय संघ आपली पारंपरिक निळी जर्सी परिधान करेल असा दावा केला होता, परंतु पुरुष आणि महिला दोन्ही संघांनी नवीन भगव्या रंगाची जर्सी परिधान केली होती. हीच भगव्या रंगाची जर्सी भारतीय संघाने नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेत पहिल्यांदा वापरली होती.



चार गोल करणाऱ्या दिलप्रीत सिंगचे कौतुक करताना संघातील खेळाडू

कर्णधार हरमनप्रीतचा ड्रॅग फ्लिक इंडोनेशियाचा गोलरक्षक आलम फजरने वाचवल्यानंतर मिळालेल्या रिबाउंडवर लाक्राने सहाव्या मिनिटाला गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. १२व्या मिनिटाला रिबाउंडवर अभिषेकने आघाडी दुप्पट केली. १८व्या मिनिटाला दिलप्रीतने ३-० अशी आघाडी मिळवून दिली. एका मिनिटानंतर दिलप्रीतने गोल करून सामन्यातील आपला दुसरा गोल नोंदवला. राजिंदरने आपले नाव गोलतक्त्यावर नोंदवले. मनदीपने आणखी एक मैदानी गोल केला. हरमनप्रीतने पेनॉल्टी कॉर्नरवर सफाईने गोल करून मध्यंतरापर्यंत भारताला ७-० अशी आघाडी मिळवून दिली. मध्यंतरानंतर इंडोनेशियाने एक गोल परत केला, जेव्हा अल अर्धने पेनल्टी कॉर्नरवर गोल केला. शिलानंदने आपला दुसरा गोल केला.

दिलप्रीतने पुन्हा एकदा योग्य वेळी योग्य ठिकाणी चेंडू आत ढकलून आपल्या नावावर हॅट-ट्रिक नोंदवली. सुखजीतनेही मैदानावरून गोल करून आपले नाव गोलफलकावर नोंदवले. ४७ व्या मिनिटाला जुगराजने पेनॉल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले व एका मिनिटानंतर सुखजीतने आपला दुसरा मैदानी गोल केला. त्यानंतर एका मिनिटाने दिलप्रीतने आपला चौथा गोल करून गोलफलक पूर्ण केला. ◂ (वृत्तसंस्था)

# मिश्र मार्शल आर्ट्समध्ये सुचिका तारियालचे पदक निश्चित

**नागोया, २० सप्टेंबर**

आयजी-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेत रविवारी महिलांच्या पारंपरिक मिश्र मार्शल आर्ट्स (एमएमए) ६० किलो वजनी गटाच्या स्पर्धेत मंगोलियाच्या अल्तानचिमेग बैगलमाला २-० ने हरवून हरयाणाच्या ३६ वर्षीय सुचिका तारियालने उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेतील भारताचे पहिले पदक निश्चित केले. सोमवारी येथील नागोया सिटी इनाए स्पोर्ट्स सेंटरमध्ये होणाऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात तारियालला आपले निश्चित कांस्यपदक सुवर्णपदकात बदलण्याची संधी मिळेल. देशासाठी एक पदक निश्चित केल्याचा खूप आनंद आहे. आता उद्या सुवर्णपदकासाठी लढण्याची वेळ आली आहे, असे सुचिका तारियाल म्हणाली.



वयाच्या १२ व्या वर्षी झालेल्या छेडछाडीच्या घटनेनंतर, तिने आत्मसंरक्षणाचे साधन म्हणून रोहतक येथे ज्युडो खेळायला सुरुवात केली. तिने सुरुवातीला जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आणि नंतर पालम येथील दादा देव मंदिर केंद्रात प्रशिक्षण घेतले, आणि त्यानंतर साई भोपाळ येथे आपले कौशल्य अधिक विकसित केले. सुचिकाने भारताचे २० हून अधिक आंतरराष्ट्रीय ज्युडो स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केले आणि आठ वेळा राष्ट्रीय चॅम्पियन बनली. तिने २०१९ च्या राष्ट्रकुल ज्युडो चॅम्पियनशिप आणि २०१९ च्या दक्षिण आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकले, तसेच २०१८ च्या राष्ट्रकुल ज्युडो चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक पटकावले. नंतर सुचिकाने जिउ-जित्सूमध्ये प्रवेश केला आणि त्या खेळातही सर्वोच्च स्थान मिळवले, २०२४ च्या जेजेआयएफ जिउ-जित्सू जागतिक चॅम्पियनशिपमध्ये प्रौढ जिउ-जित्सू कॉन्टॅक्ट महिला ६३ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. तिचा एमएमए प्रवास खरंतर खूप आधीच सुरू झाला होता, २०१७ मध्ये पदार्पणातच विजय मिळवला होता. २०२४ मध्ये तिने व्यावसायिक एमएमएमध्ये पुनरागमन केले आणि महिलांच्या स्ट्रॉवेट विभागात ब्रेव्ह कॉम्बॅट फेडरेशनसोबत अनेक लढतींचा करार केला.

आपल्या क्रीडा कारकिर्दी व्यतिरिक्त, तारियालने हरियाणा क्रीडा विभागात ज्युनियर प्रशिक्षक म्हणून रुजू होण्यापूर्वी सीआयएसएफ हेड कॉन्स्टेबल म्हणून देशाची सेवाही केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## लवलिना, नरेंद्र थेट उपांत्यपूर्व फेरीत

**निशिओ, २० सप्टेंबर**

रविवारी भारतीय बॉक्सर्सना आव्हानात्मक ड्रॉ देण्यात आला, तर लवलिना बोरगोहेन व नरेंद्र बेरवाल उपांत्यपूर्व फेरीतून आपल्या मोहिमेला सुरुवात करीत आहेत.

नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विक्रमी कामगिरीमुळे भारतीय संघाकडून अपेक्षा वाढल्या आहेत, परंतु आशियाड क्रीडा स्पर्धेतील आव्हान खूपच कठीण आहे. आशियाड क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या सहा व महिलांच्या पाच वजनी गटांचा समावेश आहे. मागील स्पर्धेत भारताने एक रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह चार पदके जिंकली होती.

टोकियो ऑलिम्पिक पदक विजेती लवलिना हिने २०२३ च्या स्पर्धेत रौप्य पदक जिंकले होते, ती ७५ किलो वजनी गटात पदकापासून फक्त एक विजय दूर आहे. या गटात केवळ आठ बॉक्सर्स आहेत.

ती आपल्या मोहिमेची सुरुवात दक्षिण कोरियाच्या सुयॉन सेओंगविरुद्ध करेल आणि त्यानंतर उपांत्य फेरीत तिचा सामना कझाकस्तानच्या विद्यमान ७० किलो विश्वविजेत्या नतालिया बोगदानोव्हा किंवा उझबेकिस्तानच्या विश्व कांस्यपदक विजेत्या अझीझा झोकिरोव्हा यांच्याशी होऊ शकतो. ◂ (वृत्तसंस्था)

# कझाकस्तानला भारताकडून 'क्लीन स्वीप'

## महिला बॅडमिंटन : उपांत्यपूर्व फेरीत गाठ जपानशी

**नागोया, २० सप्टेंबर**

भारताने रविवारी येथे आयची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेतील महिलांच्या सांघिक प्रकारात कमी मानांकन असलेल्या कझाकस्तानवर ३-० असा सहज विजय मिळविला आणि यजमान जपानविरुद्ध आव्हानात्मक उपांत्यपूर्व फेरी निश्चित केली.

इचिनोमिया सिटी म्युनिसिपल जिम्नॅशियममध्ये भारतीय दिग्गज खेळाडू पी. व्ही. सिंधू, उन्नती हुडा व तन्वी शर्माने एकही गेम न गमावता सहज विजय मिळविला.

जागतिक क्रमवारीत ११व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूने पहिल्या सामन्यात २४ मिनिटांत कामिला स्मागुलोव्हाला २१-७, २१-९ असे हरविले. २४ व्या क्रमांकाच्या उन्नतीने त्यानंतर अलिसा कुलेशोवाला (जागतिक क्रमवारी ८६६) २२ मिनिटांत २१-७, २१-१० असे सहज हरवले, त्यापाठोपाठ जागतिक क्रमवारीत २६ व्या क्रमांकावर असलेल्या तन्वी शर्माने डायना नामेनोव्हाला (जागतिक क्रमवारी १०६७) २१-५, २१-१० असे हरवून त्याहूनही जलदगतीने सामना आपल्या नावावर केला.

परंतु, उपांत्यपूर्व फेरीत थायलंडकडून पराभूत झाल्यामुळे २०२३ च्या हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेतून रिकाम्या हाताने परतलेल्या भारतासाठी इथून पुढचा मार्ग खडतर असणार आहे.

जपानकडून अधिक कठीण आव्हानाची अपेक्षा आहे, कारण यजमान संघात जगातील अव्वल १० खेळाडूंमध्ये तीन एकेरी खेळाडू आहेत- अकाने यामागुची (क्रमांक ३), तोमोका मियाझाकी (क्रमांक ७) आणि नोझोमी ओकुहारा (क्रमांक १०). त्यामुळे, एकेरीच्या संभाव्य सामन्यांमध्ये सिंधूचा सामना यामागुचीशी, तर उन्नतीचा सामना मियाझाकीशी होऊ शकतो आणि भारताची महिला दुहेरीतील जोडी ट्रीसा जॉली व गायत्री गोपीचंद यांचा सामना जपानच्या जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या युकी फुकुशिमा आणि मायु मात्सुमोतो यांच्या जोडीशी होऊ शकतो.

**सिंधू आशावादी**

आमचा संघ चांगला आहे व जपानचा संघही चांगला व मजबूत आहे, त्यामुळे सामना चुरशीचा होणार आहे, असे भारतीय दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती सिंधू म्हणाली. प्रत्येक सामना महत्त्वाचा आहे आणि तो एक चांगला सामना होईल, त्यामुळे सर्वोत्तम निकालाची अपेक्षा आहे आणि मला आशा आहे की आम्ही जिंकू, असे ती म्हणाली. चौथ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारी, सांघिक कांस्य आणि वैयक्तिक रौप्य पदक विजेती ३१ वर्षीय सिंधू नेतृत्वाची भूमिकाही बजावत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला संघाचा सिंगापूरवर ३-२ ने विजय

## आशियाड टेबल टेनिस : पुरुष संघाचा इराणकडून ०-३ ने पराभव

**टोयोटा, २० सप्टेंबर**

भारतीय महिला संघाने शानदार मुसंडी मारीत गट 'एफ'च्या सामन्यात सिंगापूरवर ३-२ असा विजय नोंदविला, परंतु त्यांच्या पुरुष संघाला रविवारी येथे आशियाई क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिस स्पर्धेच्या गट 'एफ'च्या दुसऱ्या सामन्यात इराणकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला.

१-२ ने पिछाडीवर पडल्याने भारतावर पराभवाचे सावट होते, परंतु श्रीजा अकुला व यशस्विनी घोरपडेने महत्त्वपूर्ण विजय मिळवून सामना जिंकला. सामन्याची सुरुवात करताना, घोरपडेने जियान झेंगचा ११-७, ११-३, ८-११, ११-९ असा पराभव केला. परंतु दुसऱ्या सामन्यात श्रीजा अकुलाला लॉय मिंगकडून ८-११, ११-४, ९-११, ११-४, ६-११ असा निसटता पराभव पत्करावा लागला. दिया



चितळे देखील टॅन झाओ विरुद्ध ७-११, ४-११, ११-७, ५-११ ने पराभूत झाली आणि सिंगापूरला १-२ अशी आघाडी दिली. झेंग जियान विरुद्धच्या 'जिंकणेच आवश्यक' असलेल्या सामन्यासाठी पुनरागमन करताना, श्रीजाने आधीचा पराभव विसरून ६-११, ११-३, ११-७, ११-४ असा विजय नोंदवून सामना २-२ असा बरोबरीत आणला.

निर्णायक सामन्यात, घोरपडेने लॉय मिंगला ५-११, ११-८, १२-१०, ४-११, ११-९ ने हरवून भारतासाठी एक संस्मरणीय विजय नोंदवला. मात्र, पुरुष संघाची कामगिरी निराशाजनक होती, कारण हरमीत देसाई वगळता इतर कोणताही पॅडलर कडवी झुंज देऊ शकला नाही.

सलामीच्या सामन्यात मनुष शाह नोशाद अलमियानकडून ३-११, ८-११, १०-१२ असा पराभूत झाला, तर मानव ठक्कर बेन्यामिन फराजीकडून २-११, ६-११, ६-११ असा हरला, ज्यामुळे भारताची पिछाडी ०-२ अशी झाली.

त्यानंतर हरमीतने झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण त्याला अलमियानकडून १०-१२, १५-१३, ३-११, १२-१०, २-११ असा पराभव पत्करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# काळाच्या ओघात हरवला पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा उत्साह

## पंढरीतील जुन्या काळातील गणेशोत्सवाच्या आठवणी

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२०सप्टेंबर -**

साधारण चार दशकापूर्वी केवळ चार यात्रांवर जगणारे गाव, अशी ओळख असणारे पंढरपूर शहर गणेशोत्सव साजरा करण्यात मात्र सदैव उत्साही असायचे. मात्र अलिकडच्या काळात टिव्ही, मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात हा उत्साह काहीसा गायब झालेला दिसून येत आहे.

सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते जुन्या काळी गणेश मंडपात (केवळ स्नान आणि जेवण सोडून ) इतर वेळी ठाण मांडून दहा दिवस मुक्कामी बसलेले असत. आता ते दिसत नाही. तसेच आता पूर्वीसारखे लायटिंग माळा, ऐतिहासिक आणि पौराणिक देखावेही सादर होत नाहीत. १९८० ते ९० च्या काळात पंढरपूर येथील गणेशोत्सव म्हणजे धमाल असायची, गावात शेकडो गणेशमंडळे असायची, विसर्जन मिरवणूक दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेपर्यंत सुरू असायची, महालक्ष्मी सण झाला की देखावे पाहण्यासाठी हजारो स्थानिक नागरिक रात्री एक, दोन वाजेपर्यंत प्रत्येक मंडळाना भेटी देत फिरत असत, अनेक कुटुंबवत्सल लोक फॅमिली सोबत एन्जॉय करीत असत, एखाद्या यात्रेसारखी तोबा गर्दी गणपतीचे देखावे पाहण्यासाठी त्याकाळी होत असे.

काळाच्या ओघात आज असे चित्र दिसत नाही. मनोरंजनाची साधने वाढली आहेत, पुर्वी असे नव्हते. अनेक मंडळ १६ एमएम प्रिंट आणून मिनी प्रोजेक्टर वर गाजलेले मराठी, हिंदी चित्रपट दाखवत असत.

फुकट चित्रपट पहायला लोक गर्दी करत. गणेश मंडळे मंडळांचा नावलौकीक वाढावा या ईर्षेने विविध कार्यक्रम आयोजित करीत असत.

दरम्यान आज चाळीशी, पन्नाशी पार केलेल्या अनेकांना पूर्वीचे उत्साही वातावरणात आठवत आहे. मात्र या सगळ्या मंडळींना खंत आहे ती तेव्हाचा उत्साह, चैतन्यमय वातावरण आज मात्र कुठेही दिसून येत नाही याचीच.

# पालिकेचा ठराव काहीही होवो, कॉरिडोर होणारच

## पालकमंत्री गोरे यांची स्पष्टोक्ती





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० सप्टेंबर -**

पंढरपूर नगरपालिकेचा ठराव काहीही होवो तरीही पंढरपूरचा कॉरिडोर होणारच असा निर्धार पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

पालकमंत्री आज रविवार दि. २० सप्टेंबर रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. कॉरिडोर संदर्भात बोलताना पालकमंत्री गोरे यांनी सांगितले की, पंढरपूरचा कॉरिडोर होणे हा विठुरायाच्या वारकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाचा विषय आहे. आपण सर्वांनीच पाहिले आहे की, पंढरपूरातील वारकऱ्यांची संख्या दरवर्षी लाखोंच्या संख्येने वाढत आहे. वर्षभरात ती कोट्यावधीच्या घरात जाते आहे. त्यामुळे सध्याच्या येथील पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण पडतो आहे.

आषाढी वारीचा उत्सव पंढरीत असतो त्यावेळी अनेक वेळा भितीदायक प्रसंग, वातावरण तयार होते. यात्रेच्या काळात एवढी गर्दी असते, त्या वेळी कोणतीही अनुचित घटना घडू नये अशी कायमच आपण विठुरायाच्या चरणी प्रार्थना करीत असतो.

बदलत्या परिस्थितीत पंढरपूर शहराचा विकास होणे, तेथील पायाभूत सुविधांचा विकास होणे, वारकऱ्यांसाठी सुविधा उभा करणे या बरोबरच भविष्यातील पन्नास वर्षाचा हिशोब ठेवून येणाऱ्या वारकऱ्यांच्या संख्येचा हिशोब बांधून पंढरपूर शहर हे आपणाला मजबूत व्यवस्थेसाठी तयार करावे लागणार आहे. त्यामुळे पंढरपूर कॉरिडोर होणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगाने हा कॉरिडोर करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला आहे. त्यामुळे ठराव काहीही झाला तरी देखील कॉरिडोरचे काम थांबणार नाही, असेही गोरे म्हणाले.

### जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया लवकरच सुरु होईल

दरम्यान जमीन अधिग्रहणांच्या शासनस्तरावरील सर्व प्रक्रिया पुर्ण झालेल्या आहेत. शेवटचा कॅबिनेट निर्णय झालेला आहे. त्यांच्या नोट्स होऊन त्या संदर्भातील शासन निर्णयही आलेला आहे. त्यामुळे आता प्रत्यक्षात अधिग्रहणाची प्रक्रिया सुरु होईल. तिथल्या संभाव्य बाधितांसमोर चर्चा होईल आणि त्यानंतर टप्प्या-टप्पाने अधिग्रहणाचे हे काम सुरु होईल अशीही माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली.

# जातिवाचक शिवीगाळ करून मारहाण; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

गणपती-गौरी लक्ष्मी सणानिमित्त मित्राला जेवणाचे आमंत्रण देण्यासाठी गेलेल्या चालकाला चौघांनी मिळून जातीवाचक शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याप्रकरणी जेल रोड पोलीस ठाण्यात चौघांवर अॅट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

आवेझ कुरेशी, मुस्तकीम कुरेशी, नातीगौस कुरेशी, एक अनोळखी व्यक्ती अशी गुन्हा दाखल केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत सावळा श्रीमंत उडाणशिव (वय ४२, रा. गौतमनगर जोडभावी जवळ) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या घरी गणपती-गौरी लक्ष्मी सणानिमित्त जेवणाचा कार्यक्रम होता. त्यामुळे ते आपले मित्र मुदस्सर कुरेशी यांना जेवणाचे आमंत्रण देण्यासाठी १८ सप्टेंबर रोजी रात्री ११.१५ वाजण्याच्या सुमारास विजापूर वेस येथील कुरेशी गल्लीत गेले होते. ते मुदस्सर यांच्या घराबाहेर पोहोचले असता, त्या ठिकाणी आधीपासूनच उपस्थित असलेल्या आरोपींनी त्यांना घेरत शिवीगाळ करत मारहाण करून जखमी केले. सहाय्यक पोलीस आयुक्त देवकर हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## महत्वाचे...




### 'लोकसंवाद' अंतर्गत महिला सबलीकरण व शैक्षणिक योजनांवर मार्गदर्शन

**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

माहिती व जनसंपर्क विभागांतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद २०२६ या उपक्रमांतर्गत मोहोळ येथील नागराज गणेशोत्सव सेवाभावी मंडळात महिला सबलीकरण, शैक्षणिक धोरण तसेच विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सवलतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मंडळाचे प्रा. मदन सोनवणे यांनी महिला सबलीकरणाचे महत्त्व, महिलांसाठी शासनाच्या विविध योजना तसेच शैक्षणिक क्षेत्रातील शासनाच्या धोरणांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, शिष्यवृत्ती, सवलती आणि इतर सुविधांचा पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असेही आवाहन केले. यावेळी नागराज गणेशोत्सव सेवाभावी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण सोनवणे, उपाध्यक्ष रामकृष्ण चोरमले, प्राध्यापक मदन सोनवणे, सचिव बबन शिंदे, मुस्तफा शेख आदी उपस्थित होते.

# मारहाण करून अपमानित केल्याने आत्महत्या

## दुकान मालकाच्या मुलावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

पगारात ६०० रुपये जास्त गेल्याच्या क्षुल्लक कारणावरून मारहाण करत घरातून ओढत गल्लीत आणून जाहीर अपमान केल्याने एका कामगाराने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी एका दुकान मालकाच्या मुलाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १३ ते १८ सप्टेंबर दरम्यान घडली. विरेश संगापुरे (वय २८, रा. उत्तर कसबा) असे गळफास घेतलेल्या कामगाराचे नाव आहे. अजित मल्लिनाथ किवडे (रा. गवंडी गल्ली, उत्तर कसबा) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी मृत विरेशचे वडील संगप्पा संगापुरे यांनी फिर्याद दिली आहे.

मृत विरेश संगापूरे हा आरोपी किवडे यांच्या ज्वेलर्स दुकानात कामाला होता. विरेशला पगार देताना सहाशे रुपये जास्त गेले. यामुळे आरोपीने दुसऱ्या दिवशी त्याला रागावले. यामुळे तो दुसऱ्या दिवशी कामाला गेलाच नाही. यामुळे आरोपी अजितने विरेशला पगाराच्या पैशांवरून अश्लील शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्याला त्याच्या घरापासून गल्लीपर्यंत खेचत आणून सर्वांसमोर अपमानित केले. या धक्क्यातून विरेशने घरात गळफास घेतला, असे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक जाधव गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# जवळा विकास सेवा सोसायटीचे कामकाज आदर्शवत

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे गौरवोद्गार



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० सप्टेंबर-**

जवळा येथील विकास सेवा सोसायटीचे नाव गेल्या अनेक वर्षापासून ऐकत आलो होतो. मात्र या संस्थेला प्रत्यक्ष भेट देण्याचा योग आला. या संस्थेचे कामकाज अत्यंत उत्कृष्ट असून राज्यातील अन्य सहकारी संस्थांनी या विकास सेवा सोसायटीचा आदर्श घ्यावा असे गौरवोद्गार सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले.

सांगोला तालुक्यातील जवळा विकास कार्यकारी सेवा सहकारी संस्थेला आज पाटील यांनी भेट दिली, यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आ.दिपक साळुंखे पाटील, पं.स.सभापती पुनम इंगवले, सहायक निबंधक डॉ.वैशाली साळवे, सोलापूर जिल्हा परिषद माजी अध्यक्षा जयमाला गायकवाड, चारुशिला काटकर, बाळासाहेब एरंडे, नगरसेविका तनुजा एरंडे, अशोक शिंदे, शहाजी नलवडे, संस्थेचे चेअरमन सुनील साळुंखे, सचिव संजय साळुंखे, संचालक, सभासद, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक दीपक साळुंखे पाटील, सुत्रसंचालन बाळासाहेब शिंदे, आभार प्रदर्शन विलास घुले यांनी केले.

### दिपक साळुंखे पाटील यांचे उत्तम नियोजन

राज्यात अनेक विकास संस्था तोट्यात असताना माजी आ. दिपक साळुंखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवळा विकास संस्थेने मात्र १०० टक्के वसुली केली. तसेच सोनेतारण, पिग्मी, स्वस्त धान्यातून लोकांना धान्य वाटप करत चांगल्या पद्धतीने संस्था चालवली, ही समाधानाची बाब आहे.

**- सहकारमंत्री बाबासाहेब पाटील**




# मोडनिंबमध्ये मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून स्वच्छता

## शिवशंभो गणेश तरुण मंडळ, रोटरी क्लबचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २० सप्टेंबर -**

मोडनिंब (ता. माढा) येथे शिवशंभो गणेश तरुण मंडळ आणि रोटरी क्लब मोडनिंब यांच्या वतीने रविवारी येथील ऐतिहासिक राजवाडा परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. परिसरातील स्वच्छता करून कचरा काढण्यात आला.

मोहिमेत मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, रोटरी क्लबचे सदस्य तसेच शहरातील सामाजिक कार्यकर्ते, सुजाज नागरिक सहभागी झाले होते. अस्वच्छता दूर करून ऐतिहासिक वास्तूचा परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न तरुणाकडून करण्यात आला. राजवाडा तसेच परिसरात अस्वच्छता वाढत असतानाही स्थानिक प्रशासन याकडे पुरेसे लक्ष देत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. अखेर गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत परिसराची स्वच्छता केली. ऐतिहासिक वास्तू असलेल्या राजवाड्याच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छता राखावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी मुन्ना जाधव, महेश लादे, रोटरी क्लबचे डॉ. प्रशांत कोल्हे, अनिल शिंदे, संतोष लादे, सुधीर लादे, तुषार ढोबळे, रोहन ढोबळे, सिद्धेश्वर लादे, अजय शिंदे, प्रवीण लादे, हर्षल लादे, माऊली लादे, वेदांत महामुनी, वेदांत लादे, संपत महामुनी,किरण तोडकर, निलेश गिड्डे, बालाजी लादे यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# गवत काढताना सर्पदंश झालेल्या तरुणीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर -**

शेतात गवत काढताना सर्पदंश झालेल्या शेळगी येथील ३२ वर्षीय तरुणीचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज रविवारी सायंकाळी आठ वाजता मृत्यू झाला.

शाहीन महीबूब शेख (वय ३२ वर्ष,रा. मित्र नगर शेळगी, सोलापूर)असे त्या मयत तरुणीचे नाव आहे. ती शनिवारी सकाळी हगलूर येथील संजीवनी लॉज च्या पाठीमागे शेतात गवत काढत असताना त्याच्या डाव्या पायाला साप चावला होता. त्यामुळे तिला उपचाराकरिता भाऊ निसार यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तिचा उपचारादरम्यान आज रविवारी सायंकाळी मृत्यू झाला, असे सांगण्यात आले.

# मोटार बिघाडामुळे मोडनिंबचा पाणीपुरवठा बंद

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २० सप्टेंबर -**

मोडनिंब (ता. माढा) शहराला येवती (ता. मोहोळ) येथील तलावातून पाणीपुरवठा केला जातो. येवती येथील पंप हाऊसमधील मोटारीत रविवारी सकाळी बिघाड झाल्याने मोडनिंब शहराचा पाणीपुरवठा पुढील काही दिवस बंद राहणार आहे. परिणामी सणासुदीत नागरिकांची गैरसोय होत आहे.

मोटार दुरुस्तीचे काम सुरू असून ते पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याचे संबधिताकडून सांगण्यात आले आहे. मागील काही दिवसांपासून पाणीपुरवठ्याच्या अडचणी सुरू असताना आता मोटार बिघाडामुळे आणखी दोन-तीन दिवस पाण्यासाठी नागरिकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी, उपलब्ध असलेल्या इतर साधनांद्वारे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली. ग्रामपंचायतीने मोटार दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करून पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

मोटार बिघाड, स्टार्टर, मोटार पंप जळणे तसेच अन्य तांत्रिक कारणांमुळे पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होत असल्याचे सांगण्यात येते. मात्र, वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी केवळ दुरुस्तीपुरतेच प्रयत्न होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.सार्वजनिक बोअरही नादुरुस्त असल्याने नागरिकांची पाण्यासाठी मोठी कोंडी झाली आहे.

## निधन वृत्त...

### लिंबाजी काजळे



**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

चुंगी (ता.अक्कलकोट) येथील प्रगतशील शेतकरी लिंबाजी शंकर काजळे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने रविवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे. सायंकाळी चुंगी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विजय जाधव



**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

अभिषेक नगर येथील युवा समाजसेवक तथा गिरीकर्णिका फाउंडेशनचे अध्यक्ष विजय कुंदन जाधव (वय ३८) यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात आई व एक बहीण असा परिवार आहे.

### विरेश धरणे



**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

सोलापूर बार असोसिएशनचे जेष्ठ सदस्य अॅड. विरेश धरणे (वय ४३) यांचे आज हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. जेष्ठ वकील योगेश धरणे यांचे ते मोठे भाऊ होत. अंत्यविधी उद्या दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या तुळजापूर वेस येथील राहत्या घरापासून लिंगायत स्मशानभूमी, रूपभवानी मंदिराजवळ होणार आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी व दोन मुले आहेत.

### पांडुरंग राजमाने



**अकलूज, दि. २० सप्टेंबर-**

येथील लिंगायत समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते पांडुरंग केशव राजमाने (वय ८७) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, सुना, ३ भाऊ बहिणी, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

### मल्लिकार्जुन गंगदे



**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

होटगी येथील मल्लिकार्जून इश्वरप्पा गंगदे (वय ८६) यांचे रविवारी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर होटगी गाव येथे सोमवारी (दि.२१) सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले व २ मुली असा परिवार आहे.

# एकता मंचच्या गौरी-गणपती आरास स्पर्धेचे बक्षीस वितरण

## आमदार सुभाष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती; १५० महिला स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग, विजेत्यांचा भव्य सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० सप्टेंबर -**

एकता महिला मंचच्या वतीने आयोजित गौरी-गणपती आरास स्पर्धा २०२६' चा भव्य बक्षीस वितरण सोहळा आणि महिला प्रेरणादायी मार्गदर्शन मेळावा अत्यंत भक्तिमय, चैतन्यमय वातावरणात पार पडला. 'गावसाने होलसेल साडीज', गांधी चौक, वैराग येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचा प्रारंभ श्री गणेशाच्या आरतीने झाला. त्यानंतर एकता महिला मंचच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेत एकूण १५० महिलांनी सहभाग नोंदवून आपल्या कल्पकतेचे प्रदर्शन केले. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते ढाल, पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्यातील कर्तृत्वाला प्रोत्साहन देणे हाच एकता महिला मंचचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.

गणपती व गौरी आरास स्पर्धेतील विजेते - प्रथम क्रमांक: जयश्री संकपाळ, द्वितीय क्रमांक: दीप्ती गायकवाड, तृतीय क्रमांक: राजनंदनी हाके, उत्तेजनार्थ व विशेष पारितोषिके: सरिता कुलकर्णी, स्नेहल तळेकर, वर्षा साळुंखे, रंजना गवळी, मैना सोनवणे, लक्ष्मी सुतार, जयश्री संकपाळ, रंजनी घोंगडे, राणी गवळी, पंचशीला बनसोडे, सुवर्णा साळुंखे, राजश्री बादगुडे, अनुजा काजळे, वैशाली साळुंखे, गीतांजली जोशी, सोनाली गायकवाड, अमृता वाघमारे, रेणुका चौगुले, लक्ष्मी मोरे, मंगल डाके, संगीता डाके, आणि उषा भांगे.सुरेखा कोळी, उषा ठाकूर, संगीता काजळे याशिवाय सोहळ्यात आयोजित विविध उप-स्पर्धांमधील विजेत्यांनाही बक्षीसे देण्यात आली. सहभागी सर्व १५० महिलांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात आली

या प्रसंगी व्यासपीठावर आमदार सुभाष देशमुख, डॉ. शीतल बोराडे, युवा उद्योजक नानासाहेब वरदाने, 'गावसाने होलसेल साडीज'चे संचालक रोहित गावसाने, माधुरी वरदाने, धनराज गरड, संतनाथ हॉटेलचे मंथन सावंत, अभिनव सेल्सचे प्रकाश कासार उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी एकता महिला मंचच्या जिल्हाप्रमुख लक्ष्मी सुतार, जिल्हा प्रवक्त्या रंजना गवळी, गीतांजली जोशी, रत्नप्रभा गायकवाड, उषा ठाकूर, संगीता काजळे, सुरेखा कोळी यांच्यासह महिला सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महिलांच्या सक्षमीकरणातूनच समृद्ध समाज

महिला उद्योजकतेला योग्य मार्गदर्शन, बाजारपेठ आणि आर्थिक पाठबळ मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू. महिलांच्या कष्टाला आणि कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज आहे.

**-आमदार सुभाष देशमुख.**



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन वि.मो. मेहता माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, नुमवि मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर, एसपीएम इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता कोळी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पेठे फूडस्च्या संचालिका सुवर्णा पेठे उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी भक्ती तडवळकर, मुख्य संपादक प्रशांत माने, सिध्दाराम चिट्टे.



दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक संजय तुकाराम म्याकलवार व वरिष्ठ लिपिक राघवेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, ॲड.प्रकाश जाधव, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, मुख्य उपसंपादक श्रीनिवास गाजूल, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, उपसंपादक विकास चाटी.

# फोक प्रबोधनातील लोकगीतांवर थिरकली सोलापूरकर तरुणाई

## जनता बँक कर्मचारी मंडळ बौद्धिक व्याख्यानमालाचे उद्‌घाटन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० सप्टेंबर-**

फोक प्रबोधन कार्यक्रमात तील ढोलकी, टाळ, संबळ, हलगी, पखवाज अशी पारंपारीक तालवाद्ये आणि धनगरी गीत, गोंधळ, पोवाडा अशा एकाहून एक सरस लोकगीतांवर सोलापूरकर थिरकली. गणेशोत्सवानिमित्त आयोजित जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळ बौद्धिक व्याख्यानमालाचे उद्घाटन रविवारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते झाले. मंडळाचे यंदा ५० वे वर्ष आहे.

गीत सादरीकरणाबरोबरच महाराष्ट्रातील समृद्ध परंतु लुप्त होत चाललेली परंपरा असलेल्या लोकगीते आणि संस्कृतीवर प्रबोधनातून प्रकाश टाकला. गायक सागर भोसले, कल्याणी गाजरे, गायत्री निकम, ओंकार आवटे, अनिकेत खंडागळे, स्नेहल चव्हाण, रोहित साठे यांनी विविध गीते सादर केली. शेखर नवतरे आणि दाऊद इनामदार यांनी निवेदन केले. वासुदेव, पिंगळा, गण, गोंधळ, जोगवा, पोतराज, पोवाडा, वारकरी दिंडी, छक्कड, धनगरी गीत, घाटोळी, लावणी, भैरवी असे विविध प्रकार सादर करत सोलापूरकरांच्या टाळ्या मिळवल्या. स्वर्गाची सुंदरी, आई गोंधळाला यावं, सुटला माझा पदर, चमके शिवबाची तलवार, माझी मैना गावाकडं राहिली अशा एकाहून एक सरस गीतांचे आणि त्यावरील नृत्याच्या सादरीकरणाने सोलापूरकरांची मने जिंकली. मंडळाचे अध्यक्ष मल्लिनाथ खुने यांनी प्रास्ताविक केले. वसंत पोतदार आणि शुभदा पुराणिक यांनी सूत्रसंचालन तर आणि आभार प्रदर्शन केले. यावेळी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक राजेश पवार, विष्णू मोंढे, डॉ. हर्षल डंबळ, महादेव न्हावकर, मल्लिनाथ शहाबादे, सुरेश चिक्कळी, प्रमोद भुतडा, संचालिका चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, सरव्यवस्थापक मकरंद जोशी, सरव्यवस्थापक देवदत्त पटवर्धन, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी मदन मोरे, मंडळाचे अध्यक्ष मल्लिनाथ खुने, उपाध्यक्षा माधुरी कुलकर्णी, उपाध्यक्ष अनिल बरगले, सचिव सिद्धार्थ गनगोंडा, सहसचिव पवन रणसुभे, खजिनदार विनायक कुरापाटी, सहखजिनदार ओंकार वाघमोडे आदी उपस्थित होते.

### आज अभिनेते शरद पोंक्षे यांचे व्याख्यान

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेमध्ये सोमवारी (दि. २१) अभिनेते शरद पोंक्षे यांचे व्याख्यान होणार आहे. 'आजची युवा पिढी व भारत' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. या व्याख्यानास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष मल्लिनाथ खुने यांनी केले आहे.

# तृतीयपंथीयाने स्मशानभूमीत गळफासाने केली आत्महत्या

## साखर कारखाना स्मशानभुमीतील घटना

### प्रेमसंबंधातून आत्महत्या केल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

एका २२ वर्षीय तृतीयपंथीय तरुणाने लोखंडी अँगलला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना होटगी रोड परिसरातील साखर कारखाना स्मशानभूमीत शनिवारी रात्री ८ वाजता उघडकीस आली. अभिजीत उर्फ कोमल हरिबा नागटिळक (रा.साईनाथ नगर, साखर कारखान्याजवळ, होटगी रोड, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तृतीयपंथीयाचे नाव आहे.



ही घटना कळताच सोलापूर शहर-जिल्ह्यातील तृतीयपंथीयांनी सिव्हील हॉस्पीटल येथे प्रचंड गर्दी केली होती. या घटनेला प्रेमसंबंधातून झालेला छळ कारणीभूत असून शुभम नामक त्या व्यक्तीला अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. याठिकाणी काही काळ तणाव निर्माण झाला होता

विजापूर नाका पोलिस ठाण्याला ही वार्ता कळताच पोलिस निरीक्षक सुशांत वराळे, हेड कॉन्स्टेबल एन.सी. सागळे यांच्यासह पोलिस पथक घटनास्थळी धाव घेत नागरिकांच्या मदतीने कोमल यांना खाली उतरवून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### प्रियकराला केला होता व्हिडिओ कॉल

अभिजीत उर्फ कोमलचे शुभम नावाच्या एका युवकासोबत प्रेमसंबंध होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शुभम हा कोमल यांना वारंवार मारहाण करून मानसिक व शारीरिक त्रास देत होता. याच त्रासाला कंटाळून कोमलने हे टोकाचे पाऊल उचलले. आत्म हत्येचे पाऊल उचलण्यापूर्वी कोमल यांनी शुभमला व्हिडिओ कॉल केला होता. या छळासंबंधीचे चॅटिंग, कॉल रेकॉर्डिंगचे सर्व पुरावे आपल्याकडे उपलब्ध असल्याचा दावा कोमलचे गुरु रोहिणी मोरे व नरसिंग बिल्ला यांनी केला.

# चन्नवीर चिट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथाश्रमात अन्नसेवा समर्पण उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावंत नेते चन्नवीर चिट्टे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराकडून हगलूरस्थित 'संस्कृत संजीवनी अनाथ आश्रम' येथील गरीब व अनाथ मुलांना एकवेळचे सुग्रास जेवण देऊन 'अन्नसेवा समर्पण' उपक्रम राबविण्यात आले.



भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य सागर अतनूरे याप्रसंगी म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या समर्पित जीवनाचा आदर्श घेऊनच चन्नवीर चिट्टे यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचा वाढदिवस अनाथ मुलांना जेवण देऊन खऱ्या अर्थाने सामाजिक पद्धतीने वाढदिवस साजरा केला.

नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल म्हणाले की, गेली अनेक वर्षे चन्नवीर चिट्टे यांचं कार्य अगदी जवळून बघतोय. राजकारणाला समाजकारणची जोड कशी असावी याचा आदर्श म्हणजेच चन्नवीर चिट्टे. युवकांनी चिट्टे सरांच्यां कार्याचा आदर्श घेऊन असे सामाजिक उपक्रम राबवावे.

'संस्कृत संजीवनी'चे परम ेश्वर काळे यांनीही मनोगत व्यक्त केले. उद्योजक शशी अन्नलदास यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याण करजगी, श्रीनिवास दासरी, परमेश्वर क्षीरसागर, भीमाशंकर जमादार, रवी शहापुरकर, महेश हलसगी, सोमनाथ कलशेट्टी, सद्दाम कोसगीकर, धनराज चिंता, साईनाथ सज्जे आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक भाजपा स्वबळावर लढविणार : ना.जयकुमार गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक भाजपा स्वबळावर लढविणार आहे, असे राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. दरम्यान, ही निवडणूक भारतीय जनता पार्टी पुर्ण बहुमताने जिंकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीची धामधूम सुरु असून माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील हे जिल्हाभरात फिरत अनेकांची भेटीगाठी घेत आहेत; याकडे लक्ष वेधले असता ते म्हणाले, जे समविचारी सोबत येतील त्यांना सोबत घेऊन पुढे जाऊ.

मी पालकमंत्री आणि शासनाचा प्रतिनिधी म्हणून जरी असलो तरी जिल्हा बँकेची निवडणूक लढविण्यासाठी भाजपाचे मजबूत नेते असून ते या निवडणुकी संदर्भात बसून ठरवतील आणि त्या पद्धतीने निवडणूक होईल, असेही त्यांनी सांगितले.

पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत गेल्यावेळी भाजपाचा पराभव झाला होता. आता पक्षाने मतदार नोंदणीपासून जोरदार तयारी केली आहे. ही निवडणूक महायुती म्हणून लढवू आणि जिंकू, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### 'उजनी'च्या पाण्याचे नियोजन

पुढचे संपूर्ण वर्ष सोलापूर जिल्ह्याला उजनी धरणावर अवलंबून राहावे लागणार आहे. त्यामुळे या पाण्याचे अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे लागणार आहे. पहिल्यांदा वर्षभर लागणारे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठीचे पाणी आरक्षित करावे लागणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## छायाचित्रातून...



सोलापूर : राजेंद्र चौक परिसरातील जगदंबा प्रतिष्ठान महादेवाची गुफा देखावा.




सोलापूर : साखर पेठ येथील गणेश बाल तरुण मंडळाचा उज्जैन महाकाली मंदिर देखावा.



सोलापूर : भवानी पेठेतील राजेंद्र तरुण मंडळाचा राजस्थानातील श्री खाटू श्याम हा देखावा.



सोलापूर : बाळीवेस परिसातील कसबा गणपती मंडळाने साकारलेला देखावा.




सोलापूर : आजोबा गणपती मंडळातर्फे प्रख्यात गायक अजित कडकडे यांचा गायनाचा कार्यक्रम.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उमरगा तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १७५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० सप्टेंबर -**

तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने सुपतगाव येथील मातोश्री महादेवी भांजे प्रशालेत तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात पार पडली. १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील तब्बल १७५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.



दिवसभर रंगलेल्या अटीतटीच्या डावांमध्ये विद्यार्थ्यांनी एकाग्रता, संयम आणि बुद्धिमत्तेचे प्रदर्शन केले. उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक भांजे, प्रशासकीय अधिकारी मनीषा भांजे, सचिव राजेंद्र सोळंकर, पंच महादेव भोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी नासा परीक्षेत यश मिळवून अमेरिका दौऱ्यासाठी निवड झालेले श्रीयश ज्ञानेश्वर गुरव व मयुरेश स्वामी तसेच पोलीस भरतीत यश मिळविलेल्या माजी विद्यार्थिनी आरती लामजणे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

स्पर्धेचे पंच म्हणून सदाशिव डिगोळे, गोपाळ भोसले, महादेव शिदोरे, बाळू हाक्के व पांडुरंग हारेल यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीशैल तुप्पे यांनी केले, तर शेखर सगर यांनी आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### जय मल्हार गणेश मंडळाच्या रक्तदान शिबिरात ७१ जणांचे रक्तदान

**परंडा, दि.२० सप्टेंबर -**

सामाजिक बांधिलकी जपत जय मल्हार गणेश मंडळ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने १९ सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत झालेल्या या शिबिरात ७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. भगवंत ब्लड बँक, बार्शी यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराचा उद्देश गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध करून देणे आणि रक्तदानाबाबत जनजागृती करणे हा होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत साळुंखे, उपाध्यक्ष संकेत बनसोडे यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले. संतोष गायकवाड व अंकुश माने यांचे मार्गदर्शन लाभले.



### तुळजापूर पोलीस ठाण्यात विशेष बाल सहाय्यक पथक

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**

बालकांच्या संरक्षणासाठी तुळजापूर पोलीस ठाण्यात विशेष बाल सहाय्यक पोलीस पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाच्या सदस्यपदी संजयकुमार बोंदर आणि ॲड. स्वाती शिंदे-जोगडे यांची निवड करण्यात आली आहे. बालकांशी संबंधित प्रकरणांमध्ये संवेदनशीलतेने कार्यवाही, मार्गदर्शन व समुपदेशन तसेच संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे काम पथकामार्फत केले जाणार आहे. पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांनी ही निवड केली असून, बालकांना सुरक्षित व बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्यावर पथकाचा भर राहणार आहे.




### सुधारित वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फितीने आंदोलन

**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून कामकाज केले. उच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविला असून, तो अद्याप प्रलंबित असल्याचा दावा कर्मचारी संघटनांनी केला आहे. मागणीवर १७ नोव्हेंबरपूर्वी सकारात्मक निर्णय न झाल्यास बेमुदत संप पुकारण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे. याबाबत प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना निवेदन देण्यात आले.



### तुळजापुरात पर्जन्यवृष्टीसाठी यज्ञ; सुख-समृद्धीसाठी प्रार्थना

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**

मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने शेतीसह जनजीवनावर परिणाम झाला आहे. पर्जन्यवृष्टी होऊन शेतकरी, पशुधन व नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी २० सप्टेंबर रोजी सिद्ध गरिबानाथ (दशावतार) मठात पर्जन्यवृष्टी यज्ञाचे आयोजन करण्यात आले. रणसम्राट बाल मंडळाच्या वतीने आयोजित या यज्ञास महंत योगी मौजिनाथ महाराज उपस्थित होते. प्रवीण कदम यांनी सपत्नीक यजमान म्हणून धार्मिक विधीत सहभाग घेतला. सुदेश, वेदांत, सुमित व सर्वोत्तम जेवळीकर यांनी पौरोहित्य केले. मनोज हिराळकर व राजेश कुलकर्णी यांनी यज्ञविधीत सेवा बजावली. पावसाअभावी निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर पर्जन्यवृष्टी होऊन सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी आणि जनजीवन सुरळीत व्हावे, यासाठी उपस्थितांनी प्रार्थना केली.

### तुकाराम घोंगते यांचे निधन

**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**



तालुक्यातील कसई येथील शेतकरी तुकाराम भिमाशंकर घोंगते वय ८९ यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर कसई येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. भाजपचे बाबा घोंगते यांचे ते वडील होत.

# सावंतांच्या मतदारसंघात पवार-पाटलांची एन्ट्री; सावंत कुठे?

## वाशीच्या शेतकरी पाहणी दौऱ्यांवरून राजकीय चर्चा; स्थानिक आमदारांच्या भूमिकेवर विरोधकांचा सवाल...

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.२० सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, या पार्श्वभूमीवर वाशी तालुक्यात शेतपिकांच्या पाहणीसाठी राजकीय दौरे सुरू झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. रोहित पवार यांनी २० सप्टेंबर रोजी तेरखेडा जिल्हा परिषद गटातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. काही दिवसांपूर्वी भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनीही वाशी तालुक्याचा दौरा करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली होती. त्यामुळे परंडा विधानसभा मतदारसंघातील वाशी तालुक्यात बाहेरील मतदारसंघातील आमदारांच्या दौऱ्यांवरून राजकीय चर्चा रंगली आहे.





रोहित पवार यांनी पाहणीदरम्यान सोयाबीनचे पीक १०० टक्के वाया गेले असून खरीपातील अन्य पिकांची अवस्थाही गंभीर असल्याचे सांगितले. संपूर्ण खरीप हंगाम वाया गेल्याने पावसाअभावी रब्बी हंगामाचीही आशा मावळल्याचे त्यांनी नमूद केले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत, मागील वर्षी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याप्रमाणे पीकविम्याचे हेक्टरी १७ हजार रुपये, यंदाच्या पीकविम्याची पूर्ण भरपाई, शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपये मदत, चार चारा छावण्या सुरू करणे, विद्यार्थ्यांना संपूर्ण शैक्षणिक शुल्कमाफी तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तातडीने विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी त्यांनी केली. दरम्यान, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनीही काही दिवसांपूर्वी वाशी तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. एकाच मतदारसंघात बाहेरील दोन आमदारांनी शेतकरी नुकसानीची पाहणी केल्याने स्थानिक राजकारणात त्याची चर्चा सुरू झाली आहे. वाशी तालुका परंडा विधानसभा मतदारसंघाचा भाग असल्याने 'बाहेरील आमदार शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत असताना स्थानिक आमदारांची भूमिका काय?', असा सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे 'सावंतांच्या मतदारसंघात पवार-पाटलांची एन्ट्री; सावंत कुठे?' हा प्रश्न सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

### 'सावंत कायम शेतकऱ्यांसोबत' : उद्धव साळवी

दरम्यान, शिवसेनेचे माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धव साळवी यांनी या टीकेवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, नुसते दौरे करून फोटो काढण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे महत्त्वाचे आहे. सावंत हे कायम शेतकऱ्यांसोबत असल्याचा दावा करत, पाटील-पवार यांनी आधी आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न पाहावेत, त्यानंतर दुसऱ्याच्या मतदारसंघात दौरे करावेत, असे त्यांनी म्हटले.



## ढोकीत बिअर शॉपी फोडून अडीच लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**

ढोकी शहरातील बाशी रोडवर असलेल्या तेरणा बिअर शॉपीचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने बिअर, विदेशी दारूचे बॉक्स तसेच काउंटरवरील चिल्लर रक्कम असा सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली.

श्रीहरी वसंत माळी (वय ५०, रा. ढोकी) यांच्या मालकीच्या बिअर शॉपीत किंगफिशर, टुबर्ग, कार्ल्सबर्ग, बडवायझर, मॅग्नम व एलपी बिअरचे बॉक्स तसेच बिअर बारसाठी ठेवलेले विदेशी दारूचे काही बॉक्स होते. याशिवाय काउंटरमध्ये चिल्लर रक्कम ठेवण्यात आली होती. १४ सप्टेंबर रोजी रात्री १ ते पहाटे ३ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने शॉपीत प्रवेश करून बिअर व विदेशी दारूचे बॉक्स आणि चिल्लर रक्कम असा एकूण २ लाख ५० हजार रुपयांचा माल लंपास केला.

या प्रकरणी श्रीहरी माळी यांनी १९ सप्टेंबर रोजी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## अखेर गणपती बाप्पा पावले; नळदुर्गला जोरदार पावसाची हजेरी

### ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० सप्टेंबर -**

नळदुर्ग शहर व परिसरावर यंदा पावसाने पाठ फिरवल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत अखेर १९ सप्टेंबरच्या रात्री गणपती बाप्पा पावल्याचा अनुभव नागरिकांना आला. ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह शहर व परिसरात जोरदार पाऊस झाला. यामुळे दीर्घकाळापासून पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांसह शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

नळदुर्ग परिसरात यंदाचा पावसाळा अत्यंत कोरडा गेल्याने खरीप हंगाम जवळपास हातातून गेला आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे परिसरात दुष्काळाची भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाळा संपत असताना परतीच्या पावसाकडून शेतकऱ्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. गणेशोत्सव सुरू झाल्यानंतरही पाच दिवस पाऊस न झाल्याने गणेशभक्तांनी श्री गणरायाकडे पावसासाठी साकडे घातले होते. महालक्ष्मी सणाच्या शेवटच्या दिवशी रात्री झालेल्या जोरदार पावसाने अखेर या प्रतीक्षेला काही प्रमाणात विराम मिळाला.



या पावसामुळे यंदाचा खरीप हंगाम वाचण्याची शक्यता नसली तरी रब्बी पिकांच्या पेरणीसाठी हा पाऊस उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या असून, रब्बीसाठी आणखी दमदार पावसाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, जोरदार पावसामुळे नळदुर्ग शहरातील काही भागांमध्ये गटारीचे पाणी रस्त्यावर आले होते. यामुळे नागरिकांची काही काळ गैरसोय झाली.

हवामान विभागाने आगामी चार-पाच दिवसांत अशाच प्रकारचा पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केल्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष आता परतीच्या पावसाकडे लागले आहे.

## राणा पाटलांनी घेतले नळदुर्गातील गणरायाचे दर्शन

### विविध गणेश मंडळांना भेटी; 'भूत बंगला' देखाव्याचे उद्घाटन...



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० सप्टेंबर -**

आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी १९ सप्टेंबर रोजी नळदुर्ग शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले. जय हनुमान तरुण गणेश मंडळाच्या वतीने साकारण्यात आलेल्या 'भूत बंगला' या देखाव्याचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पाटील यांनी शिवनेरी, जय हनुमान, शिवशाही, जवाहर, नवचैतन्य, व्यापारी, भोईराज आणि वीर महाराणा प्रताप गणेश मंडळांना भेटी देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

दुष्काळाचे संकट दूर होऊन शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना त्यांनी गणरायाच्या चरणी केली.

विविध मंडळांच्या वतीने आमदार पाटील यांचा सत्कार करण्यात आला. 'भूत बंगला' देखाव्याची पाहणी करून त्यांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर पाशा जागीरदार, पंचायत समिती सदस्य रणवीर चव्हाण, नगरसेवक तानाजी जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सेवकांची सहकारी पतसंस्थेची ५८ वी सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२० सप्टेंबर -**

शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरूजी सेवकांची सहकारी पतसंस्था, अणदूरची ५८ वी सर्वसाधारण सभा २० सप्टेंबर रोजी स्व. सि. ना. आलुरे गुरूजी सभागृह, जवाहर महाविद्यालय येथे उत्साहात पार पडली.



संस्थेचे सचिव मकरंद पाटील यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ चा अहवाल तसेच नफा-तोटा पत्रकाचे वाचन केले. त्यानंतर सभासद रोहित मोरे व प्रवीण गुरव यांनी संगणकीकृत पतसंस्था, सभासद वैद्यकीय विमा, ठेवीदारांना विविध सुविधा, एसएमएस सेवा, गुणवंत पाल्यांचा सत्कार, ठेवींवरील आकर्षक व्याजदर, ठेवीची मर्यादा वाढविणे आणि पतसंस्थेच्या बांधकामाबाबत चर्चा केली.

प्रमुख पाहुणे रामचंद्र आलुरे यांनी पतसंस्थेचा कारभार काटकसरीने चालवून सभासदांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी तसेच गरजेनुसार वेळेत कर्जपुरवठा करावा, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात अनिता मुदकण्णा यांनी सभासदांच्या हिताला प्राधान्य देऊन विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. भविष्यात शैक्षणिक व वैद्यकीय कर्जाला प्राधान्य देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष अनिल गुरव, सहसचिव किरण गायकवाड यांच्यासह संचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सिध्देश्वर मसुते यांनी मानले.

## हंसराज गणेश मंडळाच्या महाआरोग्य शिबिरात २५१ जणांची तपासणी

### सामाजिक उपक्रमांसाठी मंडळाला सहकार्य करण्याचे जि.प. अध्यक्षा अर्चना पाटील यांचे आश्वासन




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० सप्टेंबर -**

हंसराज गणेश मंडळाच्या वतीने आयोजित विविध समाजोपयोगी उपक्रम कौतुकास्पद असून, मंडळाला आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चना पाटील यांनी व्यक्त केली. मंडळाच्या ६० व्या वर्षानिमित्त रविवार, २० सप्टेंबर रोजी आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

महाआरोग्य शिबिरात २५१ नागरिकांची तपासणी करण्यात आली. सर्वरोग निदान व नेत्ररोग तपासणीचे आयोजन करण्यात आले होते.

अर्चना पाटील यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन झाले. त्यानंतर गणरायाची आरती करून त्यांनी शिबिराला भेट दिली.

अर्चना पाटील म्हणाल्या की, हंसराज गणेश मंडळाला ६० वर्षांची परंपरा असून, युवा कार्यकर्त्यांकडून विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत. या सामाजिक कार्यासाठी जिल्हा परिषद आणि स्वतःकडून आवश्यक सहकार्य केले जाईल.

सर्वरोग निदान शिबिरासाठी बार्शी येथील डॉ. धीरज जाधव, डॉ. प्रशांत पाटील व श्रद्धा लॅबचे शहाजी नलवडे यांचे सहकार्य लाभले. नेत्र तपासणीसाठी सोलापूर येथील शंकरशेठ साबळे नेत्ररुग्णालयाच्या वतीने गरजू रुग्णांची तपासणी करून पुढील उपचारही मोफत करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाची प्रस्तावना समर्थ कुळधर्मे यांनी केली, तर सूत्रसंचालन राहुल बनसोडे यांनी केले.

## आरळी बुद्रुकमध्ये आज तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**

तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आरळी बुद्रुक येथील 'श्रीमंत कुस्ती आखाडा' येथे होणार आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार यांच्या आयोजनातून ही स्पर्धा होत आहे.



तुळजापूर तालुक्यातील विविध शाळांमधील विविध वजन गटांतील कुस्तीपटू स्पर्धेत सहभागी होणार असून, दिवसभर चुरशीच्या लढती रंगणार आहेत. ग्रामीण भागातील शालेय कुस्तीपटूंना स्पर्धात्मक व्यासपीठ मिळावे व कुस्तीला प्रोत्साहन मिळावे, हा स्पर्धेचा उद्देश आहे.

आरळी बुद्रुक येथे स्पर्धेचे आयोजन होत असल्याने कुस्तीप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शालेय मल्लांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन श्रीमंत कुस्ती आखाड्याचे प्रमुख संजय पारवे व तालुका क्रीडा अधिकारी गणेश पवार यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची संतती टेस्ट ट्यूब सेंटरला सदिच्छा भेट

## स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अतुल डोंगरे व डॉ. स्वाती अ. डोंगरे यांच्याशी साधला संवाद; केंद्राच्या कार्याचे केले कौतुक

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २० सप्टेंबर : भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी नुकतीच ठाणे येथील संतती टेस्ट ट्यूब सेंटरला सदिच्छा भेट दिली. पत्नी व कन्येसह त्यांनी केंद्राच्या कार्यालयाची पाहणी केली. यावेळी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अतुल डोंगरे व डॉ. स्वाती अ. डोंगरे यांनी त्यांचे औपचारिक स्वागत करून केंद्राच्या कार्याची व उपलब्ध उपचार सुविधांची माहिती दिली.

संतती टेस्ट ट्यूब सेंटरमध्ये निसंतान दाम्पत्यांसाठी आधुनिक व वैज्ञानिक उपचारपद्धती, समुपदेशन तसेच योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. केंद्राच्या कार्याची माहिती जाणून घेतल्यानंतर माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी डॉक्टरांशी संवाद साधला व केंद्राच्या कार्याचे कौतुक केले.




या प्रसंगी ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अणुऊर्जा विभागाचे संचालक नितीन जावळे, आमदार गजानन लवटे, अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री सुप्रिया पाठारे, भाजपचे गटनेते व नगरसेवक मुकेश मोकाशी, शिवसेनेचे नगरसेवक दिलीप बारटवके, भाजपच्या नगरसेविका नम्रता कोळी, उपसंचालक नगर रचनाकार मुंबई संग्राम कानडे , अन्न व औषध प्रशासन कोकण विभागाचे सहआयुक्त नरेंद्र सुपे, डॉ. संगीता महेंद्र कुंभोजकर, शिवसेना शाखाप्रमुख स्मिता खडके, ज्ञानेश्र्वर घोलपे , ठाणे महापालिकेचे उपमहापौर नरेश मणेरा, मेयर ऑर्गनिक्स कंपनीच्या संचालक उमा कालेकर, तसेच रमेश जाधव, रोहित थोरात आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या भेटीमुळे मिळणार नवी दिशा संतती टेस्ट ट्यूब सेंटरच्या माध्यमातून निसंतान दाम्पत्यांना आधुनिक व वैज्ञानिक उपचार, समुपदेशन आणि योग्य मार्गदर्शन दिले जाते. माजी राष्ट्रपतींच्या सदिच्छा भेटीमुळे केंद्राच्या कार्याला प्रोत्साहन मिळाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. डोंगरे परिवाराची सेवा परंपरा पंढरपूर येथील प्रसिद्ध व्यापारी कै. बापूराव रावण डोंगरे यांचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते तुकाराम डोंगरे यांच्या परिवाराची सामाजिक व वैद्यकीय सेवेची परंपरा पुढे नेत डॉ. अतुल डोंगरे व डॉ. स्वाती अ. डोंगरे संतती टेस्ट ट्यूब सेंटरच्या माध्यमातून सेवा देत आहेत. तसेच बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. दीपक चांगलानी व डॉ. तृप्ती डोंगरे यांच्या माध्यमातून माला न्यूबॉर्न अँड चिल्ड्रेन हॉस्पिटलमध्ये बालरुग्णांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जाते.

डॉ. दीपक चांगलानी व डॉ. तृप्ती डोंगरे यांचेही कार्य बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. दीपक चांगलानी व डॉ. तृप्ती डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली येथे नवजात शिशू, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आधुनिक, दर्जेदार व संवेदनशील आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जाते.

नवजात शिशूंची विशेष काळजी, बालरोगविषयक उपचार तसेच बालहृदयरोगाचे निदान व उपचार या क्षेत्रांवर रुग्णालयाचा विशेष भर असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## संक्षिप्त...

### पावसासाठी इदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांची सामूहिक नमाज



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २० सप्टेंबर : पावसाने ओढ दिल्याने शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली असून, शहर व परिसरात पावसाची प्रतीक्षा कायम आहे. या पार्श्र्वभूमीवर शिरूर अनंतपाळ येथील इदगाह मैदानावर रविवारी मुस्लिम बांधवांनी एकत्र येत विशेष सामूहिक नमाज अदा करून अल्लाहकडे पावसासाठी दुआ केली.

पावसा अभावी शेतीची कामे आणि पिकांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, पिकांना पावसाचे जीवदान मिळावे, शहरातील पाणीप्रश्र्न निर्माण होऊ नये तसेच पशुधनासह सर्व सजीवांना पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

इदगाह मैदानावर सकाळपासूनच मुस्लिम बांधवांची उपस्थिती वाढत होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांनी या सामूहिक नमाजमध्ये सहभाग घेतला. नमाजनंतर सर्वांनी एकत्रितपणे दुआ करत लवकरच परिसरात समाधानकारक पाऊस पडावा, अशी अल्लाहकडे प्रार्थना केली.

पाऊस वेळेवर आणि मुबलक पडून शेतकरी सुखी व्हावा, पिकांना जीवदान मिळावे आणि शहरासह परिसरातील प्रत्येक कुटुंबावर संकटाची वेळ येऊ नये,अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

धार्मिक श्रद्धेतून करण्यात आलेल्या या सामूहिक प्रार्थनेतून पावसाची आस लागलेल्या शेतकरी आणि नागरिकांच्या मनातील चिंता प्रकर्षाने दिसून आली.

### उपविभागीय पोलीस अधिकारी अक्षय जाधव यांची सदिच्छा भेट



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २० सप्टेंबर : पोलिस ठाण्यात कार्यरत उपविभागीय पोलिस अधिकारी अक्षय जाधव यांनी उजेड येथील भेटीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बालाजी जाधव उजेडकर यांच्या घरी सदिच्छा भेट दिली.या भेटीत त्यांनी उजेड गावासंबंधीची माहिती आस्थेवाईकपणे जाणून घेतली.जाधव परिवाराच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व ग्रंथभेट देवून यथोचित सन्मान करण्यात आला.या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य अनंत जाधव, विक्रीकर निरीक्षक विजयकुमार सुर्यवंशी,गुरुलींग स्वामी,शाम जाधव यांच्या सह नागरिकांची व गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# गौरी गणपतीच्या देखाव्यातून ' दिला स्कुल ठीक करो ''चा संदेश

## उजनीतील युवा उद्योजकाचा अनोखा उपक्रम

तभा वृत्तसेवा

औसा दि.२० सप्टेंबर : सरकारी शाळांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे आणि शाळांच्या वस्तुस्थितीचे सोशल ऑडिट होणे या विषयाकडे समाजाचे लक्ष वेधण्यासाठी उजनी येथील युवा उद्योजक सुरज ढवण यांनी यंदाच्या गौरी-गणपतीच्या देखाव्यातून आगळावेगळा सामाजिक संदेश दिला आहे.

देशभरात सुरू असलेल्या 'स्कूल ठीक करो अभियान' अंतर्गत सरकारी शाळांची पाहणी करून तेथील पायाभूत सुविधा, शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधांचे सोशल ऑडिट केले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून अनेक सरकारी शाळांमध्ये शौचालय, ग्रंथालय, डिजिटल सुविधा, स्मार्ट क्लासरूम, कला-क्रीडा साहित्य यां सारख्या मूलभूत सुविधांची गरज अधोरेखित होत आहे.तसेच या विषयाची जनजागृती व्हावी या उद्देशाने सुरज ढवण यांनी आपल्या घरी साकारलेल्या गौरी-गणपतीच्या देखाव्याची संकल्पना 'स्कूल ठीक करो अभियान' या विषयावर आधारित केली आहे. या देखाव्यात गौरी लक्ष्मी यांची शाळेतील शिक्षिकेच्या भूमिकेत, तर त्यांच्या समोरील पिलवंड विद्यार्थ्यांच्या भूमिकेत दाखवण्यात आली आहेत.




या देखाव्यात सरकारी शाळेत आवश्यक असणाऱ्या विविध सुविधांचे प्रतिकात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. स्वच्छ व सुरक्षित शौचालय, ग्रंथालय, कला विभाग, डिजिटल स्मार्ट रूम, स्मार्ट बोर्ड, आरोग्यदायी वातावरण, सुरक्षित शाळा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा यांचा समावेश करण्यात आला आहे. 'सुरक्षित शाळा, स्वच्छ परिसर, आरोग्यदायी वातावरण, सुविधायुक्त शाळा' अशा संदेशांद्वारे शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत गरजांकडे लक्ष वेधण्यात आले आहे.गरीब, शेतकरी, मजूर तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील असंख्य विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिक्षण घेतात. हीच मुले देशाचे भविष्य असल्याने त्यांना चांगल्या पायाभूत सुविधा आणि दर्जेदार शिक्षण मिळणे आवश्यक आहे, असा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे.गौरी-गणपतीच्या पारंपरिक उत्सवाला सामाजिक विषयाची जोड देत शिक्षणाच्या हक्काबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सक्षम शाळांच्या गरजेचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा प्रयत्न सुरज ढवण यांनी केला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

# चापोली येथे मुख्याध्यापकांची सहविचार सभा



तभा वृत्तसेवा

चापोली दि. २० सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील मुख्याध्यापकांची सहविचार सभा व शैक्षणिक नियोजन बैठक नुकतीच संपन्न झाली आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी मंदोदरी वाकडे या होत्या. गटविकास अधिकारी संतोष माने आणि प्राचार्य डॉ. धनंजय चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीस चाकूर गटातील सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विषय साधनव्यक्ती, विशेष शिक्षक व सर्व मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेत रवी देशमुख, जयेश कर्डिले, प्रकाश भालके, धनराज सूर्यवंशी आदीनी मार्गदर्शन केले.

# वलांडी महसूल मंडळात दुष्काळाची दाहकता; जि. प. अध्यक्षा उषाताई पाटील यांच्याकडून पाहणी

## टंचाईग्रस्त गावांतील पाणी प्रश्न तातडीने सोडवा; उपलब्ध पाणीसाठे अधिग्रहित करण्याचे प्रशासनाला निर्देश



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २० सप्टेंबर : देवणी तालुक्यातील वलांडी महसूल मंडळ परिसरात पावसाने ४१ दिवसांहून अधिक काळ खंड दिल्याने खरीप पिके करपून गेली आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली असून, अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा प्रश्र्नही गंभीर बनला आहे. या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर यांनी शनिवारी (दि. १९) वलांडी महसूल मंडळातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.

वलांडी, कवठाळा, सय्यदपूर, चवणहिप्परगा आणि नागतीर्थवाडी आदी गावांना भेटी देत अध्यक्षा उषाताई पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून पाणीटंचाईची वस्तुस्थिती जाणून घेतली. टंचाईग्रस्त गावांमध्ये उपलब्ध पाणीसाठे तातडीने अधिग्रहित करून नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

शेतशिवाराची पाहणी; शेतकऱ्यांना धीर जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील यांनी परिसरातील शेतशिवारात जाऊन पावसाअभावी करपलेल्या पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत त्यांना धीर दिला. संकटाच्या काळात शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन आपल्या पाठीशी आहे, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, त्यांना तातडीने मदतीची गरज असल्याचे ग्रामस्थांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.

वलांडी महसूल मंडळातील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने प्रशासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या. परिसरात निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई दूर करण्यासाठी तातडीने पाणीपुरवठ्याच्या उपाय योजना कराव्यात. तसेच दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना रोख स्वरूपात आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

यावेळी देवणी पंचायत समितीच्या सभापती अंकिता पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील तळेगावकर, उपसभापती बाळासाहेब पाटील, तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे, महसूल मंडळाधिकारी बालाजी केंद्रे, महसूल सेवक मुकेश सांगावे, ग्रामविकास अधिकारी माधव सगर, उमाकांत बंडगर, कृषी सहाय्यक समाधान इंगळे, मोरे यांच्यासह माजी जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील, माजी सभापती बालाजी बिरादार, माजी सरपंच हनुमंत बिरादार, बाळू पाटील नेकनाळकर, सरपंच राज गुणाले, दिनेश पाटील, ल तसेच शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी प्रशासनाने तातडीने धाव घ्यावी!

पावसाच्या प्रतीक्षेत शेतकऱ्यांची उभी पिके करपली आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची आणि जनावरांसाठी पशुपालकांची होणारी धावपळ ही अत्यंत वेदनादायी आहे. या संकटाच्या काळात शेतकरी व ग्रामस्थांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. टंचाईग्रस्त गावांमध्ये तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा आणि उपलब्ध पाणीसाठे अधिग्रहित करण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा शासनस्तरावर पाठपुरावा करून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

# मुस्लिम वेलफेअर असोसिएशन प्रदेश सचिवपदी अली मोहम्मद तर मराठवाडा प्रमुखपदी अब्दुल समद शेख यांची निवड





तभा वृत्तसेवा

लातुर दि. २० सप्टेंबर : मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि कल्याणकारी उपक्रमांना चालना देण्यासाठी कार्यरत असलेल्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष मा. सलीम सारंग, महाराष्ट्र उपाध्यक्ष अजमत खान व महाराष्ट्र कार्याध्यक्ष प्रा. डॉ. रिझवान खान यांच्या मार्गदर्शनाखाली मुस्लिम वेलफेअर असोसिएशन प्रदेश सचिवपदी अली मोहम्मद तर मराठवाडा प्रमुखपदी अब्दुल समद शेख यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत निर्णय घेऊन नियुक्ती पत्राद्वारे कळविण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यात मुस्लिम वेलफेयर कार्यरत असुन राज्यात सामाजिक उपक्रम, संघटन वाढ व मुस्लिम समाजाचा विकास हा असोसिएशनचा मुख्य उद्देश आहे. तसेच समाजातील गरजू घटकांचे प्रश्र्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे, शैक्षणिक प्रगती, युवकांचे प्रश्र्न, महिला सक्षमीकरण, समाजहिताच्या विविध विषयांना वेळोवेळी न्याय व हक्कासाठी मुस्लिम वेलफेअर असोसिएशन सक्रिय होणार आहे. अली मोहम्मद व अब्दुल समद शेख यांची निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अहमदपूरच्या स्वराज्य गणेश मंडळाकडून कंधार किल्ल्यात स्वच्छता अभियान



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २० सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम पुढे नेत स्वराज्य सार्वजनिक गणेश मंडळ, साईनगर, अहमदपूर यांच्या वतीने ऐतिहासिक कंधार भुईकोट किल्ला, जि. नांदेड येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. किल्ला परिसरात प्रत्यक्ष झाडू हातात घेऊन स्वच्छता करत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी 'ऐतिहासिक वारसा जपूया, किल्ले स्वच्छ ठेवूया' असा संदेश दिला.

या स्वच्छता अभियानात स्वराज्य सार्वजनिक गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री. संतोष मजगे साहेब, यावर्षीचे अध्यक्ष श्री. धर्मराज चावरे, श्री. अंगदजी बालवाड, श्री. संकेतजी गिरी, श्री. महेश मोरे, श्री. गजानन सोमवंशी, श्री. बालाजी कांबळे साहेब, श्री. आकाश महाजन व श्री. अभि शौर्य यांची उपस्थिती होती. सर्वांनी एकत्रितपणे किल्ल्याच्या परिसरातील प्रशासनाच्या सहमतीने किल्ल्यामधील तहसील कचेरी विभाग, राणीचा महाल, राज दरबार परिसरातील कचरा व अस्वच्छता दूर करून स्वच्छता केली. कंधार किल्ला - इतिहासाचा अमूल्य ठेवाकंधारचा भुईकोट किल्ला हा नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांपैकी एक आहे. महाराष्ट्र शासनाच्या नोंदीनुसार हा किल्ला सुमारे २४ एकर परिसरात असून त्याभोवती सुमारे १०० फूट रुंद व २५ फूट खोल खंदक, दोन तटबंदी, ३२ बुरुज आणि चार प्रवेशद्वारे आहेत. प्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा उत्सव व्हावा, या उद्देशाने स्वराज्य सार्वजनिक गणेश मंडळाने हा उपक्रम राबविला. ऐतिहासिक किल्ले, गड-दुर्ग आणि सार्वजनिक वारसा स्थळे स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

गड-किल्ले आपला ऐतिहासिक वारसा आहेत; त्यांचे संवर्धन आणि स्वच्छता हीच खरी इतिहाससेवा! असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला..

## दुष्काळ जाहीर करा, मदत द्या; लोहाऱ्यात आज ट्रॅक्टर-बैलगाडी मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० सप्टेंबर -**

लोहारा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी आणि तालुक्यातील पाण्यावर स्थानिक शेतकरी व नागरिकांचा प्राधान्याचा हक्क असावा, या मागण्यांसाठी सोमवार, २१ सप्टेंबर रोजी शहरात ट्रॅक्टर-बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. बसस्थानकापासून तहसील कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असून, गावोगावी बैठका घेऊन शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तालुक्यात पावसाचा खंड, पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि वाढता शेतीखर्च या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. मोर्चातून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये दुष्काळी मदत, जनावरांसाठी दरमहा दहा हजार रुपये, ऊसाला फळबागांप्रमाणे अनुदान, सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि प्रत्येक एकरासाठी २०० चौरस फुटांचे सोकपिट देण्याची मागणी करण्यात येणार आहे.

तसेच पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील धरणे व तलावांमधील पाणी राखीव ठेवावे आणि माकणी धरणासह तालुक्यातील उपलब्ध पाणी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना प्राधान्याने मिळावे, अशी प्रमुख मागणी करण्यात येणार आहे. मोर्चानंतर तहसील कार्यालयात मागण्यांचे निवेदन देण्यात येणार असून, महिला, युवक, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डोळ्यादेखत सोयाबीन जळतेय, शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी!...

# पावसाअभावी सोयाबीन करपले; रोहित पवारांकडून कळंब तालुक्यात पाहणी

**▸▸ खरीप पिकांची दयनीय अवस्था... ▸▸ तातडीने दुष्काळ जाहीर करा... ▸▸ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**

जिल्ह्यात पावसाने प्रदीर्घ ओढ दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. पावसाअभावी शेतातील उभे सोयाबीन सुकून करपू लागले असून, हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यादेखत जळताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवार यांनी रविवारी रत्नापूर, चोराखळी, येरमाळा, हावरगाव, मस्सा व तेरखेडा परिसरातील शेतांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन सोयाबीन पिकाची पाहणी केली.



यावेळी पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती, पिकांचे नुकसान, उत्पादनातील संभाव्य घट आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. अनेक शेतांमधील सोयाबीन पाण्याअभावी सुकून करपल्याचे पाहणीदरम्यान दिसून आले. मशागत, बियाणे, खते व औषधांवर मोठा खर्च करूनही पाऊस न झाल्याने संपूर्ण हंगाम हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांनी पवार यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडत शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी केली.

पिकांचे नुकसान वाढत असतानाच शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितीही गंभीर होत असल्याचे यावेळी समोर आले. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या पीकविम्याची रक्कम अद्याप न मिळालेल्या शेतकऱ्यांना ती तातडीने अदा करावी, येत्या पाच दिवसांत चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक शुल्कात सवलत देऊन त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. पावसाने आणखी ओढ दिल्यास कळंब तालुक्यातील खरीप पिकांचे नुकसान वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने तातडीने नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, अविनाश जाधवर, गोविंद मुंडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी उपस्थित होते.

### 'कागदोपत्री आढावा नको; प्रत्यक्ष पंचनामे करा'...

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केल्यानंतर पावसाअभावी पिकांची दयनीय अवस्था स्पष्टपणे दिसत असल्याचे पवार यांनी सांगितले. केवळ कागदोपत्री आढावा घेऊन चालणार नाही. अधिकारी व संबंधित यंत्रणांना प्रत्यक्ष शेतात पाठवून नुकसानीचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

### तातडीने दुष्काळ जाहीर करा...

पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना आमदार रोहित पवार यांनी पिकांच्या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. डोळ्यादेखत शेतकऱ्यांचे सोयाबीन जळत आहे आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येत आहे. ही परिस्थिती अत्यंत वेदनादायी आहे. रत्नापूर परिसरातील सोयाबीनसह इतर खरीप पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# नळदुर्ग १५ दिवसांत 'डुक्करमुक्त' करण्याचा संकल्प

**▸▸ पहिल्याच दिवशी १०० हून अधिक डुक्कर पकडले; पोलिस बंदोबस्तात पालिकेची मोहीम सुरू**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० सप्टेंबर -**

नळदुर्ग शहरातील मोकाट डुकरांचा वाढता उपद्रव आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने शहर १५ दिवसांत 'डुक्करमुक्त' करण्याचा संकल्प केला आहे. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरपालिका प्रशासनाने यासाठी पुढाकार घेतला असून, १७ सप्टेंबरपासून शहरात डुक्कर पकडण्याची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी १०० हून अधिक डुक्कर पकडण्यात आले.



नळदुर्ग शहरात मोठ्या प्रमाणात डुकरांची संख्या वाढल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. डुकरांमुळे होणारी घाण, दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. मोकाट फिरणाऱ्या डुकरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती.

या पार्श्वभूमीवर पालिकेने डुक्कर पाळण्याचा व्यवसाय करणाऱ्यांना नोटिसा बजावून शहरातील डुकरांचा बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, संबंधितांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने शहरातील डुकरांची संख्या वाढत गेली. अखेर पालिका प्रशासनाने सोलापूर येथून डुक्कर पकडणारे पथक बोलावून कारवाई सुरू केली. बांधकाम समितीचे सभापती शशिकांत (पांडु) पुदाले यांच्या नेतृत्वाखाली पोलिस बंदोबस्तात ही मोहीम राबविण्यात आली. पहिल्याच दिवशी १०० हून अधिक डुक्कर पकडण्यात आले. कारवाईदरम्यान डुक्कर पकडण्याच्या मोहिमेत अडथळा आणण्याचे प्रयत्न झाल्याचेही पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

जोपर्यंत शहर डुक्करमुक्त होत नाही, तोपर्यंत मोहीम सुरूच राहणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### नागरिकांची कोंडवाडे हटविण्याची मागणी

रहीम नगर, भवानी नगर तसेच परिसरातील लोकवस्तीमध्ये डुक्कर बंदिस्त करण्यासाठी असलेल्या कोंडवाड्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रचंड दुर्गंधी व घाणीमुळे आरोग्य धोक्यात आले असून, पालिकेने लोकवस्तीतील डुकरांचे कोंडवाडे तातडीने हटवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तसेच लोकवस्तीमध्ये डुक्कर बंदिस्त करण्यासाठी उभारण्यात आलेले कोंडवाडे नागरिकांच्या तक्रारीनुसार जमीनदोस्त करण्याची कारवाईही करण्यात येणार आहे. डुक्कर पाळणाऱ्या व्यावसायिकांनी लोकवस्तीतील कोंडवाडे तातडीने हटवून शहराबाहेर स्थलांतरित करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले आहे.

# एक वही, एक पेन' उपक्रमाला २००७ बॅचचा हातभार

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० सप्टेंबर -**

लोहारा शहरातील किंग कोब्रा गणेश मित्र मंडळाच्या श्री गणेशाची आरती १९ सप्टेंबर रोजी शहरातील २००७ क्लासमेट बॅचच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी मंडळाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'एक वही, एक पेन' या सामाजिक उपक्रमास २००७ बॅचच्या सदस्यांनी हातभार लावत १५ डझन वह्या आणि ३० पॉकेट पेन असे सुमारे ५ हजार रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य भेट दिले.



गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यंदा जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन गणेश भक्तांनी दर्शनासाठी येताना हार, फुले व दुर्वा न आणता त्याऐवजी विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडणारी एक वही आणि एक पेन आणावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमातून जमा होणारे शैक्षणिक साहित्य गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत २००७ बॅचच्या सदस्यांनीही सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक साहित्याची भेट दिली. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी प्रकाश होंडराव, प्रवीण चिद्रे, गौतम माटे, राजू शेख, लक्ष्मण रोडगे, सचिन रोडगे, माजीद बागवान, सुशांत माशाळकर, दिनेश रणशूर, सूरज इमानदार, अमोल कडगावे, गोविंद बंगले, महेश चपळे, सदाम फकीर, मुशीर चाऊस, बसवराज माशाळकर, जुनेद खानापुरे, नितीन खराडे, दिनेश गरड, प्रशांत माळवदकर, अक्षय पोतदार, सुमित झिंगाडे, अमोल गुजकर, महेश खबोले, राजपाल वाघमारे, नयूम हेडे यांच्यासह मंडळाचे अध्यक्ष गगन माळवदकर, उपाध्यक्ष देवा महाजन, गोपाळ सुतार, खंडू शिंदे, दत्ता निर्मळे, किरण पाटील, महेश कुंभार, मुन्ना कुंभार, भीमाशंकर डोकडे, ईश्वर बिराजदार, शैलेश जट्टे, प्रशांत स्वामी, नाना पाटील, ओम पाटील, शंभू स्वामी आदी उपस्थित होते.

## जागर साहित्य पुरस्कारांची घोषणा; तीन साहित्यिकांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० सप्टेंबर -**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूरच्या वतीने देण्यात येणारे जागर साहित्य पुरस्कार २०२५-२६ जाहीर करण्यात आले. यंदाचा जागर साहित्य पुरस्कार प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांच्या 'अधले मधले दिवस' या ललित गद्य साहित्यकृतीला जाहीर झाला आहे.

शिक्षणमहर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे गुरुजी यांच्या स्मरणार्थ गद्य लेखनासाठीचा जागर पुरस्कार प्रा. सुरेश आडके यांच्या 'सुकाणू' या कादंबरीला, तर स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र खंडेराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पद्य लेखनासाठीचा पुरस्कार यामिनी दळवी यांच्या 'काजळकाठ' या कवितासंग्रहाला जाहीर झाला आहे.

शाखेचे अध्यक्ष अमर हंगरगेकर यांनी पुरस्कारांची घोषणा केली. यावेळी कार्यवाह विजय देशमुख यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

## भूममध्ये गांजा-दारूसाठ्यावर पोलिसांचा छापा; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**

अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करताना भूम पोलिसांनी पाथरुड ते पाटसांगवी रोडवरील हॉटेल सध्याद्री येथे छापा टाकून २४१ ग्रॅम गांजा आणि देशी-विदेशी दारूसाठा असा एकूण ३५ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी अरुण गोवर्धन जाधव (वय २७, रा. राळेसांगवी, ता. भूम) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जाधव हा हॉटेल सध्याद्री येथे विनापरवाना गांजा बाळगून तसेच देशी-विदेशी दारूचा साठा करून विक्री करीत असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान त्याच्या ताब्यातून २४१ ग्रॅम हिरवट-काळसर रंगाचा गांजा, अंदाजे १२ हजार ५० रुपये किमतीचा जप्त करण्यात आला. तसेच देशी





दारूच्या १८० एमएलच्या १३६ बाटल्या आणि ६५० एमएलच्या चार बाटल्या असा २३ हजार ७५० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी भूम पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४८७/२०२६ अन्वये कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम तसेच कलम ८(क), २०(ब) छज्झड लीं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते, सपोनि खांडे तसेच पोलीस अंमलदार कवडे, जाधव, चेडे, नाईकवाडी, किवंडे व मोटे यांच्या पथकाने केली.

## शेतकरी संघर्ष समितीचा २१ सप्टेंबरला येडशीत रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० सप्टेंबर -**

उद्ध्वस्त खरीप पिके, पाणीटंचाई व शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने २१ सप्टेंबर रोजी येडशी, ता. जि. धाराशिव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत समितीचे संयोजक संजय पाटील दुधगांवकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.



कोरडा दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत, पीक विम्याची २५ टक्के आगाऊ व संपूर्ण भरपाई, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपये अनुदान, खरीप नुकसानीचा नव्याने पंचनामा, शेतमजूर व महिलांना रोजगार, विद्यार्थ्यांचे शुल्क माफ करणे, पशुधनासाठी चारा-पाण्याची व्यवस्था आणि दिवसा आठ तास वीजपुरवठा या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच शेतीमालाला हमीभावाचा कायदा लागू करावा, अशीही मागणी आहे.

# येरमाळा बसस्थानकाचा दर्जा वाढतोय; सुविधा मात्र अपुऱ्या!

**▸▸ २४ तास नियंत्रण कक्ष व प्रवास आरक्षण सुविधा सुरू करण्याची नागरिकांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२० सप्टेंबर -**

दोन राष्ट्रीय महामार्गांवरील महत्त्वाचे बसस्थानक म्हणून येरमाळा बसस्थानकाची ओळख असताना प्रवाशांच्या मूलभूत सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. बसस्थानकातील नियंत्रण कक्ष चोवीस तास सुरू ठेवावा, तसेच मध्यवर्ती बसस्थानकाचा दर्जा लक्षात घेऊन प्रवाशांसाठी प्रवास आरक्षण सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.





याबाबत ग्रा.पं. लिपिक प्रितेश बारकुल, विशाल बारकुल यांच्यासह सुभाष बारकुल, प्रविण बारकुल, दिपक बारकुल, तानाजी बारकुल व भाऊसाहेब राऊत यांनी बसस्थानक नियंत्रकांकडे निवेदन दिले. येरमाळा बसस्थानकावर विविध जिल्ह्यांतून ये-जा करणाऱ्या प्रवाशांची मोठी वर्दळ असते. विशेषतः रात्रीच्या वेळी महिला प्रवासी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच भाविकांची संख्या लक्षणीय असते. मात्र, रात्री नियंत्रण कक्ष बंद असल्याने बसच्या वेळा, मार्ग आणि इतर चौकशीसाठी प्रवाशांची गैरसोय होते. आपत्कालीन परिस्थितीतही तातडीने मदत मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.

त्यामुळे नियंत्रण कक्ष २४ तास सुरू ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, येरमाळा बसस्थानक भविष्यात 'अ' दर्जाचे बसस्थानक म्हणून विकसित करण्याचा विचार परिवहन विभागाकडून सुरू असल्याचे आगारप्रमुख विजय घोलप यांनी सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर बसस्थानकात प्रवास आरक्षण सुविधा सुरू झाल्यास येरमाळा तसेच परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

वाढती संख्या लक्षात घेता नियंत्रण कक्ष २४ तास सुरू करणे व आरक्षण सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे नागरिकांच्या मागण्यांवर परिवहन विभागाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


## जाहीर प्रगटन

नगरपरिषद परंडा कार्यालय
परंडा
दि.१०/९/२०२६

**मालमत्ते संबंधी नाव बदलण्याचे सुचना पत्र**

**श्री. मिलिंद बापूसाहेब शिंदे,** हल्ली राहणार परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांनी या कार्यालयात कोर्ट हुकमनामा अधारे घर क्र. ११/४०७ नाव लावण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

वरील घराची चुर्तु:सीमा व लांबी खालील प्रमाणे. जागेची चुर्तु:सीमा पू.प. २०.१०/ द.उ. १०.०५.

**-जागेची चर्तु:सीमा-**

**पुर्वस** : देवगाव रस्ता
**दक्षिणेस** : आप्पासाहेब शिंदे
**पश्चिमेस** : खुली जागा
**उत्तरेस** : ताय्याप्पा शिंदे

वरील चुर्तु:सीमा आणि जागेची नाव नोंदणी करीता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, ज्या कोणास नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी, अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल. पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, परंडा**

## जाहीर प्रगटन

नगरपरिषद परंडा कार्यालय
परंडा
दि.१०/९/२०२६

**मालमत्ते संबंधी नाव बदलण्याचे सुचना पत्र**

**श्री. आप्पासाहेब बापूसाहेब शिंदे,** हल्ली राहणार परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांनी या कार्यालयात कोर्ट हुकमनामा अधारे घर क्र. ११/४०७ नाव लावण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

वरील घराची चुर्तु:सीमा व लांबी खालील प्रमाणे. जागेची चुर्तु:सीमा पू.प. २०.१०/ द.उ. १०.०५.

**-जागेची चर्तु:सीमा-**

**पुर्वस** : देवगाव रस्ता
**दक्षिणेस** : माकणीकर
**पश्चिमेस** : खुली जागा
**उत्तरेस** : मिलिंद शिंदे

वरील चुर्तु:सीमा आणि जागेची नाव नोंदणी करीता आहे. तरी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, ज्या कोणास नामांतराबाबत नाव नोंदणी हस्तांतरण बाबत तक्रार असेल तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आलेल्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत तक्रार दाखल करण्यात यावी, अन्यथा तक्रार नाही असे गृहीत धरून नामांतर करून दिले जाईल व नाव नोंदणी केली जाईल. पुन्हा कोणाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, परंडा**

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डेंग्यूला रोखण्यासाठी ॲबेटिंगची दुसरी फेरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० सप्टेंबर : शहर व जिल्ह्यात डेंग्यु सदृश्य आजार तसेच चिकन गुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे लातूर शहर महानगरपालिका प्रशासन सतर्क झाले आहे.

डासांची उत्पत्ती वाढल्यामुळे रुग्णसंख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने शहरात ॲबेटिंगची दुसरी फेरी सुरु केली आहे. ज्या भागांत डेंग्यु किंवा चिकन गुनियाचे रुग्ण आढळले आहेत, त्या परिसरात विशेष फवारणी केली जात आहे.



## विविध वृत्त.....

### गणरायाचा प्रसादही 'वृक्षरुपी'!।

### लातूरच्या वसुंधरा वृक्षरुपी गणेश मंडळाचा अनोखा उपक्रम



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० सप्टेंबर : गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या हातात यंदा प्रसादासोबत पर्यावरण संवर्धनाचा संकल्पही दिला जात आहे. लातूरच्या वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाने गणेशोत्सवात 'प्रसाद म्हणून फळरोप' देण्याचा अनोखा उपक्रम राबविला आ-हे. भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. लातूर शहरातील राजीव गांधी चौक परिसरात हा अनोखा पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा केला जातो आहे.

गणरायाच्या दर्शनासाठी मंडळात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला प्रसाद म्हणून फळाचे रोप देण्यात येत आहे. दररोज सुमारे १०० ते १२० भाविकांना प्रत्येकी

एक फळरोप देण्यात येते. हे रोप घरी किंवा उपलब्ध जागेत लावून त्याचे नियमित संगोपन करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. त्यामुळे गणेशोत्सवातून केवळ धार्मिक श्रद्धेचा संदेश न देता प्रत्यक्ष कृतीतून वृक्षलागवड आणि संवर्धनाचा विचार रुजविण्याचा प्रयत्न होत आहे. 'गणपती बाप्पाच्या नावाने एक झाड लावा आणि कुठे दुष्काळ.... वसुंधरा ते जगवा' हा संदेश या उपक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. भाविकांच्या हातून लावलेले प्रत्येक रोप भविष्यात मोठे झाड व्हावे आणि त्यातून पर्यावरणाला हातभार लागावा, हा या उपक्रमामागील उद्देश आ हे. विशेष म्हणजे, प्रसाद म्हणून मिळालेले रोप ही केवळ भेट न राहता भाविकांच्या घराशी आणि कुटुंबाशी जोडलेली पर्यावरणीय जबाबदारी ठरावी, अशी हे. संकल्पना मंडळाने पुढे आणली आहे.

वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे गणेशोत्सवाला सामाजिक आणि पर्यावरणीय संदेशाची नवी दिशा मिळत आहे. भक्तीच्या माध्यमातून वृक्षसंवर्धनाचा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरत आहे. दरम्यान, यंदाच्या गणेशोत्सवात मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेले अष्टविनायक दर्शन हेही भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. महाराष्ट्रातील अष्टविनायक मंदिरांच्या संकल्पनेवर आधारित आठ स्वतंत्र मंदिरांची प्रतिकृती तयार करण्यात आली असून, एकाच ठिकाणी अष्टविनायक दर्शनाचा अनुभव भाविकांना घेता येत आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक संदेशासोबत धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा हा उपक्रमही भाविकांचे लक्ष वेधून घेत आ

यंदाच्या गणेशोत्सवात वसुंधरा वृक्षरूपी गणेश मंडळाच्या वतीने भाविकांसाठी अष्टविनायक दर्शन हा विशेष उपक्रम ठेवण्यात आला आ-हे. महाराष्ट्रातील अष्टविनायकांच्या संकल्पनेवर आधारित आठ स्वतंत्र मंदिरांच्या प्रतिकृती मंडळ परिसरात साकारण्यात आल्या आहेत. त्यामुळे एकाच ठिकाणी अष्टविनायक दर्शनाचा अनुभव भाविकांना घेता येत आहे. या आठ मंदिरांची आकर्षक मांडणी आणि धार्मिक वातावरण भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. गणेशोत्सवात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी हा उपक्रम यंदाच्या उत्सवाचे एक प्रमुख आकर्षण ठरत आहे. भक्ती, संस्कृती आणि कलात्मक सादरीकरणाचा संगम घडविणाऱ्या या अष्टविनायक दर्शनाला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## फॅशन डिझायनर रुपाली बोराडे 'लातूर भूषण' पुरस्काराने सन्मानीत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० सप्टेंबर : फॅशन डिझायनिंग क्षेत्रात आपल्या कौशल्यपूर्ण कामातून स्वतंत्र ओळख निर्माण करतानाच महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या रूपाली अजयकुमार बोराडे-पाटील यांना प्रतिष्ठेच्या 'लातूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, जिल्हा शाखा लातूर यांच्या वतीने आयोजित 'लातूर भूषण पु-रस्कार सोहळा २०२६' मध्ये त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

येथील दयानंद सभागृहात झालेल्या या पुरस्कार सोहळ्यास जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजसेवा, शिक्षण, प्रशासन, कला संस्कृती-साहित्य, उद्योग व सहकार, वैद्यकीय सेवा, महिला सक्षमीकरण,

पत्रकारिता, अध्यात्म आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा यावेळी 'लातूर भूषण' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

या प्रसंगी परमपूज्य विद्यानंद सागर महाराज, पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे, खासदार डॉ. शिवाजीराव काळगे, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, पत्रकार संघाचे राज्य सचिव विश्र्वास आरोटे, वैभव स्वामी, निलेश सोमानी, अनिल सावंत, अशोक देडे यांच्यासह अशोक हनवते, मनीष हजारे, सुधाकर फुले, अफसर कारभारी, हरुन मोमीन, महादेव डोंबे, संतोष सोनवणे, श्रीधर स्वामी, लिंबराज पन्हाळकर, खय्युम शेख आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुशील सूर्यवंशी यांनी केले.

# लातूर स्थागुशा कडून ४६ किलो ८७५ ग्रॅम गांजाची ७ झाडे जप्त



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २० सप्टेंबर : लातूर जिल्ह्यात अमली पदार्थांची अवैध लागवड, विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या पथकाने निलंगा तालुक्यातील बुजरगवाडी शिवारातील शेतात छापा टाकून गांजाची ७ झाडे जप्त केली आहेत. सदर गांजाचे एकूण वजन ४६ किलो ८७५ ग्रॅम असून त्याची अंदाजे किंमत २३ लाख ४३ हजार ७५० रुपये आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.३० वाजता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अमर सुरेश केंद्रे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे बुजरगवाडी, ता. निलंगा येथील वाघंबर लिंबापूरे यांच्या शेतामध्ये गांजाची अवैध झाडे लावलेली आहेत.मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्दे शांवर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे शिरूर अनंतपाळचे प्रभारी अधिकारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अक्षय जाधव व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी पुढील कारवाईबाबत सूचना दिल्या त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार, शासकीय पंच तसेच आवश्यक तांत्रिक पथकासह बुजरगवाडी शिवारातील गट क्रमांक १४ मधील जनार्दन दत्तात्रय भोईमार यांच्या मालकीच्या शेतात पाहणी केली असता उसाच्या शेतामध्ये गांजाची झाडे लावलेली आढळून आली.

यावेळी कायदेशीर प्रक्रिया पार पाडून जप्त करण्यात आलेल्या ७ गांजाच्या झाडांचे एकूण वजन ४६ किलो ८७५ ग्रॅम भरले.जप्त गांजाची किंमत प्रति किलो ५० हजार रुपये या प्रमाणे एकूण २३ लाख ४३ हजार ७५० रुपये इतकी आहे.जप्त करण्यात आले आहे.

या प्रकरणात वाघंबर दिगंबर लिंबापूरे, वय ६० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. बुजरगवाडी, ता. निलंगा, जि. लातूर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.प्राथमिक माहितीनुसार, संबंधित शेतामध्ये गांजाची झाडे लागवड करून त्यांचा अवैधरीत्या वापर/विक्री करण्याच्या उद्देशाने लागवड करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून असून, याबाबत पुढील तपास पोलीस ठाणे शिरूर अनंतपाळ यांच्याकडून करण्यात येत आहे.

ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक अक्षय जाधव, पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, सफौ. सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, युवराज गिरी, नवनाथ हासबे, संजय कांबळे, चंद्रकांत डांगे, तूराब पठाण, मोहन सुरवसे, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, काकासाहेब बोचरे, संतोष खांडेकर, चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात अमली पदार्थांची अवैध लागवड, विक्री, वाहतूक व साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध पोलीस यंत्रणेकडून सातत्याने कारवाई करण्यात येत असून, अशा प्रकारच्या अवैध कृत्यांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील तीन आरोपी ताब्यात

## फॉर्च्यूनरसह हत्यारे जप्त ,स्थानिक गुन्हे शाखेची पळशी फाट्यावर पहाटे धडक कारवाई



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २० सप्टेंबर : खुनाच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. शिवाजी नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या खून प्रकरणी आरोपींकडून हत्यारे आणि त्यांनी उपयोगात आणलेली फॉर्च्युनरसह हत्यारेही जप्त केली आहेत.

लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल यांनी सदर गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध संदर्भात मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात सुधाकर बावकर पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग व्ही. माने यांचे पथक संबंधित गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान, गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे तीन आरोपी हे पळशी फाटा येथे फॉरच्यूनर वाहनासह थांबलेले असल्याची माहिती पथकास प्राप्त झाली. त्यानुसार पंचांना सोबत घेऊन पळशी फाटा येथे कारवाई करण्यात आली. पांढऱ्या रंगाची टोयटो फॉरच्यूनर क्रमांक एमएच ४४ टी ०२२१ या वाहनामध्ये तीन इसम आढळून आले. त्यांची खात्री करून त्यांना ताब्यात घेण्यात आले त्यांची नावे अल्ताफखान सरदारखान पठाण, वय ४१ वर्षे, , उमर मेहबुब शेख, वय २४ वर्षे, व खालेद हमीद शेख, वय ३९ वर्षे हे तिन्ही आरोपी परळी वैजनाथ येथील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातील फॉरच्यूनर वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये एक कोयत्यासदृश धारदार हत्यार व एक फोल्डिंग चाकू मिळून आला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्ती करण्यात आला. याशिवाय टोयटो फॉरच्यूनर, आरटीओ क्रमांक एमएच ४४ टी ०२२१ हे वाहनही जप्त करण्यात आले आहे. तिन्ही आरोपीना पुढील तपास व कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे हजर करण्यात आले आहे.

सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अंमलदार माधव बिल्लापटे, तुराब पठाण, गोविंद येलमटे, पाराजी पुठेवाड, तुळशीराम बरुरे यांच्या पथकाने केली.

## सहकारमंत्र्यांनी सहकार भवनच्या बांधकामाचा घेतला आढावा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० सप्टेंबर : महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी लातूर येथे त्यांच्या पुढाकारातून होत असलेल्या २५ कोटी रुपयांच्या सहकार भवनच्या बांधकामाची पाहणी केली. उपविभागीय अभियंता व सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन दर्जेदार काम करून घेण्यास सांगितले.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकारातून लातूर जिल्ह्याचे सहकार क्षेत्रातील विविध कार्यालय हे अनेक ठिकाणी असल्यामुळे अनेक नागरिकांची गैरसोय होत होती हे लक्षात घेऊन सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी २५ कोटी रुपयांच्या सहकार इमारतीसाठी निधी मंजूर करून आणले असून ते काम पूर्णत्वास जात असून या इमारतीत जवळपास विविध ११ कार्यालय समाविष्ट असून सध्या

इमारतीचे काम प्रगती पथावर असून याचाच आढावा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी घेतला व समाधान व्यक्त केले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक टेकाळे, विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा उपाधिबंधक विष्णू पोतंगले, कंत्राटदार नरेंद्र काळे, हेमंत जाधव, सतीश मिरचे आदी उपस्थित होते.

# मानाच्या आजोबा गणपतीची आ. संजय बनसोडे यांच्या हस्ते आरती

## श्री गणरायाला भावपूर्ण निरोप; उदगीरात सात दिवसांच्या श्री गणेशाचे शांततेत विसर्जन



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २० सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या सात दिवसांच्या मंगलमय पर्वाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली. शहरातील मानाच्या श्री आजोबा गणपतीची माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते विधिवत आरती करण्यात आली.

श्री गणरायाच्या चरणी शेतकरी, कष्टकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. शेतकऱ्यावरील संकट दूर करून प्रचंड असा पाऊस पडावा यासाठी श्री गणरायाकडे साकडे घातले असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

यावेळी गणरायाला भावपूर्ण निरोप देताना भक्तांच्या चेहऱ्यावर भक्तिभाव आणि मनात पुढील वर्षी लवकर येण्याची आस दिसून आली.

यावेळी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ.भारत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधिक्षक मंगेश चव्हाण,

माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, उपनगराध्यक्षा शितल शिंदे, आकाश सागर, बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, गटनेते प्रा.दिलीप मटके, डॉ.दिपक सोमवंशी, यमुनाजी भुजबळे, वसंत पाटील, नगरसेवक सचिन हुडे, नरसिंग शिंदे, संग्राम हुडगे, मनोज पुदाले, राजकुमार हुडगे, अमोल निडवदे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलंवडे, पो.नि. बी.डी भुसनुर, पो.नि.दिलीप गाडे, तहसिलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी दिपक मोरे, चेतन वैजापुरे, प्रा.मल्लेश झुंगास्वामी, उत्तरा कलबुर्गे, निकीता अंबरखाने, वर्षा कांबळे, प्रकाश बिरादार, वसंत पाटील, विरेंद्र अंबरखाने , संदिप बिरादार, अविनाश गायकवाड, अनिता बिरादार, आदी उपस्थित होते.

उदगीर शहर व परिसरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सात दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान विविध गणेश मंडळांच्या वतीने धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गणेशभक्तांनी श्रींचे दर्शन घेत आरती व पूजाअर्चा करून आशीर्वाद घेतले.

मानाच्या श्री आजोबा गणपतीची आरती माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी त्यांनी श्री गणरायाच्या चरणी नतमस्तक होत सर्व नागरिकांच्या सुख-शांतीसाठी प्रार्थना केली. गणेशोत्सव हा एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वाढविणारा उत्सव असून, नागरिकांनी उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले.

आरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात परिसर दुमदुमून सोडला. भाविकांनी भक्तिभावाने श्री गणरायाला निरोप दिला.

### शांततेत विसर्जन; प्रशासन व मंडळांचे सहकार्य

उदगीर शहरात सात दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन शांततेत पार पडले. गणेश मंडळे, भाविक आणि प्रशासन यांच्या समन्वयातून विसर्जन प्रक्रिया पार पडली. गणेशभक्तांनी पारंपरिक पद्धतीने श्रींची मिरवणूक काढून विसर्जनस्थळी नेले.

उत्सवादरम्यान सामाजिक सलोखा, शांतता आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यात आला. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गणरायाला भावपूर्ण निरोप दिला.

### भक्तिमय वातावरणात गणेशोत्सवाची सांगता

गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशभक्तांनी श्रींचे दर्शन घेतले आणि पुढील वर्षी पुन्हा येण्याचे साकडे घातले. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!' या जयघोषात सात दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता झाली.